
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com



# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, १० मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# रिधोरानजीक भीषण अपघात; एक ठार

## अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील दुर्घटनेने परिसरात हळहळ





■ प्रतिनिधी | मालेगाव ■

अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील रिधोरा गावाजवळ गुरुवारी (दि. ८ मे) रात्री ९ वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण कार अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्घटना रिधोरा येथील हॉटेल मामा भांजे समोर घडली. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य राबविले. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एमएच-३७-जी-६९३९ क्रमांकाची कार अकोल्याकडून मालेगावच्या दिशेने येत होती. रिधोरा गावाजवळील हॉटेल मामा भांजे समोर ही कार अचानक नियंत्रणाबाहेर जाऊन रस्त्यावर पलटी झालेल्या अवस्थेत आढळून आली. या भीषण अपघातात कारमधील अक्षय विजयराव घुगे (वय ३४, मूळ रा. कुरळा, सध्या रा. मालेगाव) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर त्यांच्यासोबत असलेले संदेश संजय लाहोटी (वय ३२, रा. मालेगाव) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मृत अक्षय घुगे व जखमी संदेश लाहोटी हे दोघेही मालेगाव तालुक्यातील परिचित शासकीय कंत्राटदार असल्याची माहिती समोर आली आहे. कामानिमित्त ते दोघे अकोला येथे गेले होते. तेथून मालेगावकडे परत येत असताना हा दुर्दैवी अपघात घडला. अपघात इतका भीषण होता की कारच्या पुढील भागाचा पूर्णतः चुराडा झाला. भरधाव वेगातील कार समोरील वाहनावर आदळल्याने हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज घटनास्थळी उपस्थित नागरिक व पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. अपघातानंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक इंगळे, हेड कॉन्स्टेबल मनीष राठोड व त्यांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना तातडीने रुग्णालयात हलविले तसेच मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. त्यानंतर अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला हटवून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

अक्षय घुगे यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनाने मालेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून अनेकांनी शोक व्यक्त केला आहे. स्थानिक नागरिकांकडून राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या अपघातांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

# काटेपूर्णा अभयारण्यात गांडूळ खत निर्मिती प्रकल्प; पाचही बिटमध्ये उपक्रम

## आगामी वृक्षारोपणासाठी होणार सेंद्रिय खताचा वापर

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

वाशिम-अकोला जिल्ह्यात पसरलेल्या काटेपूर्णा अभयारण्य येथे वन विभागाकडून आगामी पावसाळी वृक्षारोपण मोहिमेसाठी गांडूळ खत निर्मितीचा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. अभयारण्यातील वनोजा, येडशी, कासमार, पिंपळशेंडा आणि फेट्रा या पाचही बिटमध्ये गांडूळ खत प्रकल्प उभारण्यात आले असून, नैसर्गिक पद्धतीने सेंद्रिय खत निर्मिती केली जात आहे.

जंगलातील पाला-पाचोळा, गळलेली फुले तसेच इतर सेंद्रिय घटकांचा उपयोग करून खत तयार केले जात आहे. विभागीय वनाधिकारी यशवंत नागुलवार, उपवनसंरक्षक चेतन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे यांच्या नेतृत्वात वन कर्मचारी आणि वनमजूर प्रकल्पांची नियमित देखभाल करत आहेत. आगामी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वृक्षारोपणात या खताचा वापर करण्यात येणार असून त्यामुळे रोपांची वाढ, गुणवत्ता आणि जिवंत राहण्याचे प्रमाण वाढण्यास मदत होणार आहे.

वन विभागाच्या माहितीनुसार, अभयारण्यात सुमारे पाच टन गांडूळ खताची निर्मिती करण्यात येत असून त्याचे अंदाजे बाजारमूल्य दोन लाख रुपये आहे. जंगलातील दररोज निर्माण होणारा पालापाचोळा जाळण्याऐवजी त्याचा प्रभावी वापर करून सेंद्रिय खत तयार करण्यात येत आहे. हे खत अभयारण्यातील विविध रोपवाटिका आणि संरक्षण शिबिरांना पुरवले जात आहे.



> या उपक्रमामुळे केवळ कचरा कमी होत नाही, तर जमिनीची सुपीकताही वाढते. त्यामुळे वृक्षलागवडीतील रोपांचे जिवंत राहण्याचे प्रमाण आणि वाढ अधिक चांगली होण्यास मदत होणार आहे. आगामी पावसाळी वृक्षारोपण मोहिमेसाठी सध्या तयारी सुरू असून लागवडीच्या जागांचे जिओ-टॅगिंग करण्यात येत आहे.
>
> **अमित शिंदे,** वनपरिक्षेत्र अधिकारी काटेपूर्णा-सोहळ अभयारण्य

अभयारण्यात बिबट, कोल्हा, लांडगा, अस्वल, निलगाय, तरस, हरीण, चितळ तसेच विविध पक्षी प्रजातींचे अधिवास असलेल्या काटेपूर्णा अभयारण्यात या उपक्रमामुळे हरितक्षेत्र वाढीस चालना मिळणार असून पर्यावरणीय समतोल अधिक समृद्ध होण्यास मदत होणार आहे. वन विभागाकडून आगामी वृक्षारोपण मोहिमेची तयारीही वेगाने सुरू करण्यात आली असून, लागवडीसाठी जागांची निवड करून त्यांचे उझ्ए तंत्रज्ञानाद्वारे जिओ-टॅगिंग करण्यात येत असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे यांनी दिली.

शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पाला-पाचोळा, पिकांचे अवशेष तसेच इतर सेंद्रिय कचरा जाळण्याऐवजी त्याचा योग्य पद्धतीने उपयोग करून गांडूळ खत निर्मितीकडे वळणे आवश्यक आहे. अनेकदा शेतातील कचरा जाळल्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते, जमिनीतील सूक्ष्मजीव नष्ट होतात तसेच हवेचे प्रदूषण वाढते. याउलट, याच सेंद्रिय कचऱ्यापासून गांडूळ खत तयार केल्यास कमी खर्चात उत्कृष्ट दर्जाचे नैसर्गिक खत उपलब्ध होऊ शकते. असे आवाहन वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरास प्रतिसाद

## - २३४३ दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण
## - विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत

■ प्रतिनिधी | कारंजा ■

महसूल विभाग तहसील कार्यालय कारंजा व राजस्व मंडळ कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे' आयोजन गुरुवारी दि. ८ मे २०२६ रोजी स्थानिक महेश भवन येथे करण्यात आले. सकाळी ११ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम कारंजा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीमती सईताई डहाके यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच उपविभागीय अधिकारी कैलासजी देवरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. तहसीलदार रवि महाले यांनी शिबिरास मार्गदर्शन केले.



या शिबिराला विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये नगर परिषद कारंजाचे मुख्याधिकारी महेश वाघमोडे, पोलीस निरीक्षक दिनेशचंद्र शुक्ला (पो. स्टे. कारंजा शहर), पोलीस निरीक्षक प्रवीण शिंदे (पो. स्टे. कारंजा ग्रामीण), तालुका कृषी अधिकारी अश्विनी भोसले, सब रजिस्ट्रार धनंजय देशपांडे, उपअधीक्षक भूमिअभिलेख विनोद जाधव, उपनगराध्यक्ष फिरोज शेकुवाले, नायब तहसीलदार अनिल वाडेकर, विनोद हरणे, लक्ष्मण बनसोडे, निरीक्षक अधिकारी स्मिता नायगावकर, नगरसेवक तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय योजनांचे दाखले व प्रमाणपत्रे तात्काळ वितरित करण्यात आली. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत १२ प्रमाणपत्रे, श्रावण बाळ योजनेअंतर्गत १० प्रमाणपत्रे, शिधापत्रिका विभागामार्फत १० प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. पंचायत विभागाकडून १७२ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. महसूल विभागामार्फत सातबारा उतारे, फेरफार, ८-अ उतारे व उत्पन्न दाखले असे एकूण २१७ दाखले वितरित करण्यात आले.

तसेच पंचायत समिती कारंजा यांच्या वतीने घरकुल योजनेचे १७२ लाभार्थी प्रमाणपत्रे, नगर परिषद कारंजाकडून १८९६ विविध दाखले, महिला व बालकल्याण विभागाकडून ४, राज्य परिवहन महामंडळ कारंजाकडून १०, भूमिअभिलेख विभागाकडून ४ सनद, आरोग्य विभागाकडून ५ तसेच लघुपाटबंधारे विभागाकडून ३ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. सर्व विभाग मिळून एकूण २३४३ दाखले व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

शिबिरादरम्यान नागरिकांकडून प्राप्त झालेल्या २० तक्रारींची नोंद घेण्यात आली. आरोग्य विभागाकडून २५६ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली, तर २ नागरिकांची आधार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ अधिकारी महेश धानोरकर, ग्राम महसूल अधिकारी राहुल वरघट, अर्चना चिकटे, सुधीर धानोरकर, सुशील जवंजाळ, सुषमा डांगे, वर्षा मोडसे तसेच कारंजा मंडळातील महसूल सेवक नितीन डाखोरे, कृष्णा इंगळे, तेजस रोकडे, संतोष वायले, विनोद पंडित यांनी विशेष परिश्रम घेतले. याशिवाय कारंजा तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाला नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसीलदार विनोद हरणे यांनी केले, तर संचालन व आभार प्रदर्शन ग्राम महसूल अधिकारी

# शासकीय निवासी शाळेत प्रवेशप्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम तालुक्यातील सुरकुंडी येथील अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळेत शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ साठी प्रवेशप्रक्रियेला सुरुवात झाली आहे. ही शाळा महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येते.

या निवासी शाळेत इयत्ता ६ वी ते १० वी (सेमी इंग्रजी माध्यम) पर्यंतच्या वर्गांसाठी प्रवेश अर्ज मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# आज भव्य शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळा

## माजी आ. स्व. प्रकाश डहाके स्मृतीदिनानिमित्त आयोजन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शेती, हवामान बदल व पीक व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने कृषी उत्पन्न बाजार समिती कारंजाच्या वतीने शनिवार, दिनांक १० मे रोजी सकाळी ११ वाजता शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा बाजार समितीच्या यार्ड क्रमांक १ परिसरातील सभापती निवासस्थानाजवळ आयोजित करण्यात आली असून माजी आमदार तथा माजी सभापती लोकनेते स्व. प्रकाशदादा डहाके यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

कारंजा कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना इ.स. १८८६ मध्ये झाली असून राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची ऐतिहासिक बाजार समिती म्हणून तिची ओळख आहे. या बाजार समितीच्या प्रगतीत माजी सभापती तथा माजी आमदार स्व. प्रकाशदादा डहाके यांचे मोठे योगदान राहिले आहे. त्यांच्या कार्याचा वारसा जपत शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे ज्ञान, बदलते हवामान आणि उत्पादन वाढीसाठी आवश्यक माहिती उपलब्ध व्हावी या हेतूने या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार अनुपभाऊ धोत्रे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा मुख्य प्रतोद तथा अकोला पूर्वचे आमदार रणधीरभाऊ सावरकर राहणार आहेत.






















जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १६२ ■ रविवार १० मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# मुरूमाच्या लालसेसाठी टेकडीचा खून

## केळझरची हिरवी छाती पोखरणाऱ्यांवर प्रशासन मेहरबान

### दिवस-रात्र ब्लास्टिंगने परिसर हादरला

**सेलू । जनमाध्यम :** वर्धा–नागपूर महामार्गालगत उभी असलेली केळझरची ऐतिहासिक आणि नैसर्गिक टेकडी आज उत्खनन माफियांच्या विळख्यात तडफडत आहे. निसर्गाची हिरवीगार ओळख असलेली ही टेकडी आता दिवसाढवळ्या पोखरली जात असून, प्रशासनाच्या संशयास्पद मौनामुळे नागरिकांमध्ये संतापाचा ज्वालामुखी धगधगू लागला आहे. मुरूमासाठी निसर्गाचा बळी अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे.

महामार्गापासून अवघ्या ७० मीटर अंतरावर सुरू असलेले उत्खनन आता उघडपणे पर्यावरणाच्या विनाशाचे प्रतीक ठरत आहे. दररोज हजारो ब्रास मुरूम टेकडीच्या छातीतून उपसला जात असून, अवजड यंत्रांच्या आवाजाने संपूर्ण परिसर हादरत आहे. दिवस असो किंवा मध्यरात्र... ब्लास्टिंगचे स्फोट कानठळ्या बसवणारे ठरत आहेत. धुळीचे प्रचंड ढग हवेत पसरत असून, नागरिकांच्या श्वासात विष मिसळले जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, टेकडीच्या पायथ्याशी स्फोटकांचा वापर करून उत्खनन सुरू असतानाही संबंधित विभाग मात्र डोळ्यावर पट्टी बांधून बसल्याचा आरोप नागरिक करत आहेत. महामार्गालगत इतक्या मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू आहे आणि प्रशासनाला काहीच दिसत नाही का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

नागपूर–वर्धा–तुळजापूर महामार्गावरून भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांसाठीही हे उत्खनन धोकादायक ठरत आहे. टेकडीच्या पायथ्याशी होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एखादा मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. परिसरातील ग्रामस्थांच्या मते, सततच्या ब्लास्टिंगमुळे घरांना तडे जाण्याची भीती निर्माण झाली आहे. धुळीमुळे श्वसनाचे आजार वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, परिसरातील पर्यावरणीय समतोलही धोक्यात आला आहे. एकेकाळी हिरवाईने नटलेली टेकडी आता जखमी अवस्थेत उभी असल्याचे चित्र पाहून निसर्गप्रेमीही हळहळ व्यक्त करत आहेत. या सर्व प्रकारामागे उत्खनन माफियांचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. काही मोजक्या स्वार्थी घटकांच्या फायद्यासाठी संपूर्ण परिसराचा निसर्ग उद्ध्वस्त केला जात असल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्र झाली आहे. मात्र, प्रशासनाची भूमिका मात्र संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. 'मै भी चूप, तु भी चूप'च्या भूमिकेमुळेच उत्खनन माफियांचे फावते आहे, असा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

टेकडी वाचवण्यासाठी नागरिकांचा आक्रोश

केळझरची टेकडी ही केवळ मुरूमाचा ढिगारा नाही, तर परिसराच्या पर्यावरणीय समतोलाची ओळख आहे. पावसाचे नैसर्गिक जलसंधारण, जैवविविधता आणि हिरवाई टिकवून ठेवणाऱ्या या टेकडीचे अस्तित्वच आता धोक्यात आले आहे. आज टेकडी वाचवा, नाहीतर उद्या निसर्ग सूड उगवेल, असा इशारा पर्यावरणप्रेमी देत आहेत.

उत्खननाचा हा उघड खेळ तातडीने थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही आता दिला जात आहे.

## बोर नदीवरील पूरसंरक्षण भिंतीचे भूमिपूजन, सेलू येथे तालुकास्तरीय जनसंवाद कार्यक्रम

# जनसंवादाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना प्रत्यक्ष लाभ पोहोचविणार

## - पालकमंत्री डॉ. भोयर



**वर्धा जनमाध्यम :** शासनाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजना, उपक्रमाची माहिती व योजनांचा लाभ ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकांना थेट देणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हा, तालुका स्तरासोबतच गावस्तरावर जनसंवादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले. सेलू तालुका प्रशासन व जलसंपदा विभागाच्यावतीने सेलू येथील शिवमंदिरात जनसंवाद कार्यक्रम तसेच आपत्ती व्यवस्थापन, सौंदर्यीकरण अंतर्गत बोर नदीवरील पाच गावातील संरक्षण भिंतीच्या बांधकामाचे भूमीपूजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, माजी खासदार रामदास तडस, सेलू नगर पंचायतच्या अध्यक्षा स्नेहल देवतारे, सेलू तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष अशोक मुडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, अशोक कलोडे, ज्योती घंगारे, दामिनी डेकाटे, तहसिलदार शंकुतला पाराजे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता नितीनकुमार गुप्ता आदी उपस्थित होते.

जनसंवादाच्या माध्यमातून शासन राबवित असलेल्या योजनांची प्रत्यक्ष अमंलबजावणी आणि नागरिकांच्या समस्यांचे निराकरण होऊन त्यांना येणा-या अडचणी दूर होण्यास मदत होते. जिल्ह्यात विविध विकास कामे करीत असतांना ग्रामीण भागातील नागरिकांचा थेट संबंध पंचायत समितीशी येतो. जुन्या मोडकळीस आलेल्या पंचायत समितीच्या इमारतीमुळे नागरिकांना असुविधेचा सामन करावा लागत होता. यासाठी नवीन इमारत बांधन्यात आली असल्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी सांगितले. तहसिल कार्यालय इमारत बांधकाम, प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत, तालुका कृषि कार्यालय इमारत बांधकामास मंजूरी प्राप्त झाली असून लवकरच या इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात येणार असल्याचे पुढे बोलतांना श्री.भोयर म्हणाले.

रुपये ४५ कोटी खर्च करुन तालुका न्यायालय तसेच सेलू येथे नमो उद्यानाची निर्मिती करण्यात येणार आहे. यासाठी १ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. सोबतच वर्धा येथे नव्याने १०० एक्करवर कारागृहाची निर्मिती करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री म्हणाले. वर्धा व सेलू तालुक्याला पिण्याचे पाणी व सिंचनासाठी बोर व धाम प्रकल्पातील पाण्याचा वापर होत आहे. या प्रकल्पाच्या कॅनल दुरुस्ती, क्षमता वाढ व नुतणीकरणासाठी प्रती प्रकल्प १५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. बोर नदीवर ब्राम्हणी, घोराड, सेलू, बेलगाव व देरडा येथे पूरसंरक्षण भिंत बांधन्यात येणार असल्याने पावसाळ्यामध्ये पूर परिस्थितीत नदीकाठावरील गावांचे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होईल, असे डॉ.पंकज भोयर म्हणाले.

जनसंवादाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या व अडचणी दूर होण्यास मदत होऊन प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. हा शासनाचा स्तूत्य उपक्रम आहे. स्थानिक स्वराज्य संस्था विकासाचा रथ असून राज्य शासन स्थानिक स्वराज्य संस्थांना भरीव निधी उपलब्ध करुन देत आहे. यामुळे मोठा विकास होत असल्याचे रामदास तडस यावेळी म्हणाले. स्नेहल देवतारे यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले.

सर्वप्रथम पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते बोर नदीवर ब्राम्हणी, घोराड, सेलू, बेलगाव व देरडा येथील वर्धा नदीवर ५ कोटी ७० रुपये खर्च करुन बांधन्यात येणा-या संरक्षण भिंतीचे भूमीपूजन करण्यात आले. त्यानंतर जनसवांद कार्यक्रमात सेलू तालुक्यातील नागरिकांच्या प्रत्यक्ष तक्रारी व समस्याचे निवेदन स्विकारुन तालुका प्रशासनातील अधिका-यांना तक्रारीचे तात्काळ निराकरण करण्याच्या सुचना दिल्या.

यावेळी त्यांच्या हस्ते महसूल, कृषि, वन विभाग, आदिवासी विकास विभाग, बाल विकास विभाग, आरोग्य विभागाच्या विविध योजनेच्या लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला विविध विभागाचे विभाग प्रमुख, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अर्धवट राहिलेलं स्वप्न अखेर पूर्ण झालं

# वयाच्या ५५ व्या वर्षी संगीता काकूंनी जिंकली दहावीची लढाई

### संसार, संकटं अन् जिद्दीसमोर काळही हरला



**हिंगणघाट जनमाध्यम :** हातात पुस्तकाऐवजी संसाराची जबाबदारी, डोळ्यांत शिक्षणाचं अपूर्ण स्वप्न आणि आयुष्यभर संघर्षाची वाट... पण जिद्द जर मनात पेटलेली असेल तर वयही हार मानतं, याचं जिवंत उदाहरण म्हणजे हिंगणघाटातील सौ. संगीता सुधाकर खेडकर! वयाच्या तब्बल ५५ व्या वर्षी दहावीची परीक्षा उत्तीर्ण होत त्यांनी केवळ स्वतःचं स्वप्न पूर्ण केलं नाही, तर हजारो महिलांच्या मनात आशेचा दिवा पेटवला आहे.

नंदोरी रोडवरील प्रज्ञानगर संत तुकडोजी वार्ड येथील रहिवासी असलेल्या संगीता खेडकर यांचं शिक्षण लहान वयातच थांबलं. कमी वयात लग्न झालं आणि आयुष्य चुल-मुल, संसार, जबाबदाऱ्या आणि कुटुंबाच्या गरजांमध्ये अडकून पडलं. दिवसामागून दिवस जात होते, पण शिक्षणाचं अपूर्ण स्वप्न त्यांच्या मनात कायम धगधगत होतं.

परिस्थिती कठीण होती. घरची जबाबदारी, मुलाच्या प्रकृतीची चिंता आणि वाढतं वय... या सगळ्यांमध्ये अनेकजण हार मानले असते. पण संगीता काकूंनी हार मानली नाही. आपण शिकायचं, दहावी पास व्हायचं, हा निर्धार त्यांनी मनाशी बांधला आणि पुन्हा पुस्तक हातात घेतलं.

दिवसभर घरकाम आणि रात्री अभ्यास... असा संघर्ष सुरू झाला. अक्षरशः डोळ्यांत झोप नसताना त्यांनी अभ्यास केला. अनेकदा परिस्थितीने परीक्षा घेतली, पण त्यांनी स्वप्नाला तडा जाऊ दिला नाही. अखेर त्यांच्या मेहनतीला यश आलं आणि त्यांनी दहावीची परीक्षा उत्तीर्ण करून दाखवली.

त्यांच्या या यशाने परिसरात आनंदाचं वातावरण निर्माण झालं आहे. शिकण्यासाठी वय नसतं, जिद्द असली की यश तुमच्याच पायाशी येतं, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवलं. त्यांच्या या कामगिरीमुळे अनेक महिलांमध्ये नव्याने शिक्षण घेण्याची प्रेरणा निर्माण झाली आहे.

संगीता काकूंच्या यशाचं सर्वत्र कौतुक होत असून, प्रभागातील नागरिकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. नगरपरिषद शिक्षण सभापती सौ. पल्लवी बाराहाते यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला.

# दारूबंदीच्या वर्धेत दारू माफियांचा हैदोस

## पोलिसांचा मध्यरात्री धडाकेबाज छापा




### ५० पेट्या देशी दारूसह कार जप्त; साडेसात लाखांचा मुद्देमाल ताब्यात

**वर्धा जनमाध्यम :** दारूबंदी असलेल्या वर्धा जिल्ह्यात दारू माफियांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने शुक्रवारी मध्यरात्री धडक कारवाई करत मोठा दारूसाठा जप्त केला. सांवगी मेघे पोलीस ठाण्याच्या हद्दीत सालोड बायपास रोडवर सापळा रचून पोलिसांनी स्विफ्ट डिझायर कार अडवली. मात्र पोलिसांची चाहूल लागताच चालक रंजीत थुरवाल हा अंधाराचा फायदा घेत पसार झाला.

पोलिसांनी कारमधील अमोल सुभाष भागवत (रा. बोरगाव मेघे) याला ताब्यात घेतले. कारची झडती घेतली असता ५० प्लास्टिक चुगंड्यांमध्ये 'टॅगो पंच' कंपनीच्या देशी दारूच्या ९० एमएलच्या तब्बल ५ हजार शिश्या आढळल्या. या दारूसाठ्याची किंमत ३ लाख ५० हजार रुपये असून, कारसह एकूण ७ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत हा माल धुळे येथील अमोल पाटील याने पुरवल्याचे समोर आले. याप्रकरणी तिघांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपी फरार आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या नेतृत्वात पार पडली

# हैदराबादला कत्तलीसाठी नेणाऱ्या ४९ गौवंशाची सुटका



**समुद्रपूर जनमाध्यम:** नागपूर–हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर कत्तलीसाठी हैदराबादकडे नेण्यात येणाऱ्या ४९ गौवंशाची वर्ल्ड हिंदू फेडरेशन आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी सुटका केली. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी दोन ट्रक ताब्यात घेत गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ८ मे रोजी मध्यरात्री नागपूरकडून हैदराबादच्या दिशेने दोन ट्रकमधून मोठ्या प्रमाणात गौवंश नेला जात असल्याची माहिती वर्ल्ड हिंदू फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांना मिळाली. त्यानंतर संघटनेचे अध्यक्ष सुरज हिवरकर, उपाध्यक्ष अक्षय फुकट तसेच बजरंग दलाचे कार्यकर्ते शिवम भुते, सुरज करपे, प्रज्वल चौधरी, हिमांशू धोटे आणि चिनू लडके यांनी जाम परिसरात सापळा रचला.

संशयित ट्रक क्रमांक शप०४उण३०२६ व शप०६र्ण२४९१ यांची तपासणी केली असता पहिल्या ट्रकमध्ये २२ तर दुसऱ्या ट्रकमध्ये २७ असे एकूण ४९ गौवंश आढळून आले. जनावरांना अत्यंत अमानुष पद्धतीने कोंबून वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.

घटनेची माहिती मिळताच समुद्रपूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार रविंद्र रेवतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी दोन्ही ट्रक ताब्यात घेऊन गौवंशाची सुखरूप सुटका केली. त्यानंतर सर्व जनावरांना गौशाळेत रवाना करण्यात आले.

या प्रकरणी समुद्रपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# पोलीसांचा सेल्फी पाहून नागरिक निर्धास्त डिजिटल पोलिसिंगमुळे घरफोड्यांना लगाम

### चोऱ्या थांबवण्यासाठी कारंजा पोलिसांचा नवा फंडा ठरला फायदेशीर; डिजिटल पहाऱ्यामुळे नागरिक निर्धास्त



**कारंजा (घाडगे) जनमाध्यम :** एकेकाळी रात्रीचे सावट पसरले की कारंजा शहरातील नागरिकांच्या मनात भीतीचे काळे ढग दाटून यायचे. घराला कुलूप लावून बाहेर पडताना परत येईपर्यंत घर सुरक्षित असेल ना? हा प्रश्न प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसायचा. कारण शहरात घरफोड्या, चोरी आणि दरोड्यांनी अक्षरशः हैदोस घातला होता. बंद घरांवर चोरट्यांची नजर असायची आणि कष्टाने उभारलेला संसार एका रात्रीत उद्ध्वस्त व्हायचा. मात्र, आता परिस्थिती पालटली आहे. कारंजा पोलिसांनी चोरट्यांना रोखण्यासाठी काढलेला नवा डिजिटल फंडा गुन्हेगारांच्या छातीत धडकी भरवणारा ठरला आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर वसलेल्या कारंजा (घाडगे) शहरात काही महिन्यांपूर्वी चोरीच्या घटनांनी नागरिक त्रस्त झाले होते. वारंवार होणाऱ्या घरफोड्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत होती. पोलीस आहेत तरी कुठे असा प्रश्नही नागरिक करू लागले होते. अशा वेळी कारंजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रलाद मदन यांनी पुढाकार घेत आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत डिजिटल पोलिसिंग ची अनोखी संकल्पना राबवली आणि अवघ्या काही दिवसांत गुन्हेगारीवर जबर लगाम लावण्यात यश मिळवले.

पोलिसांनी शहरातील नागरिकांचा विशेष व्हॉट्सअ?प ग्रुप तयार केला. गावाबाहेर जाणाऱ्या नागरिकांनी आपली लोकेशन, मोबाईल क्रमांक आणि घर बंद असल्याची माहिती या ग्रुपवर द्यायची. त्यानंतर रात्री गस्तीवर असलेली पोलीस टीम संबंधित घराजवळ जाऊन प्रत्यक्ष पाहणी करते. परिसरात संशयास्पद हालचाल आहे का, याची तपासणी केली जाते.

विशेष म्हणजे, पोलीस कर्मचारी संबंधित घरासमोर उभे राहून सेल्फी काढतात आणि तो फोटो थेट व्हॉट्सअ?प ग्रुपवर शेअर करतात. बाहेरगावी गेलेल्या नागरिकांना आपल्या घरासमोर पोलीस उभे असल्याचे पाहून मोठा मानसिक आधार मिळतो. घर बंद असले तरी पोलिसांचा पहारा सुरू आहे, हा विश्वास नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे.

या डिजिटल पहाऱ्याचा थेट परिणाम चोरट्यांवर झाला आहे. बंद घरांवर डल्ला मारण्यासाठी फिरणाऱ्या चोरट्यांना आता पोलिसांच्या गस्तीची भीती सतावू लागली आहे. कधीही पोलीस येऊ शकतात, या धास्तीने अनेकांनी कारंज्याकडे पाठ फिरवल्याची चर्चा आहे. परिणामी चोरीच्या घटनांमध्ये मोठी घट झाली असून, नागरिकांनीही समाधान व्यक्त केले आहे.

काही दिवसांपूर्वी कारंजा परिसरातील तीन सराईत चोरांना पोलिसांनी अटक केली होती. चौकशीत त्यांनी अनेक घरफोड्यांची कबुली दिली. या कारवाईमुळे पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या उपक्रमामुळे पोलिस आणि नागरिक यांच्यातील नातेसंबंधही अधिक मजबूत झाले आहेत. परिसरात एखादी संशयित व्यक्ती दिसली की नागरिक तिचा फोटो किंवा माहिती तात्काळ व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठवतात आणि पोलीस काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचतात. कारंजा पोलिसांचा हा डिजिटल पॅटर्न आता केवळ उपक्रम राहिलेला नाही, तर तो नागरिकांच्या सुरक्षिततेचे कवच बनला आहे. तंत्रज्ञान, सतर्कता आणि लोकसहभाग यांच्या बळावर चोरट्यांना कसे गुडघे टेकवता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे कारंजा पोलिसांचा हा धडाकेबाज प्रयोग ठरत आहे.

# मायक्रोप्लास्ट कंपनी परिसरात भीषण आग;

## धुराच्या लोटांनी परिसर हादरला

**समुद्रपूर जनमाध्यम :** जाम येथील मायक्रोप्लास्ट पॉलीटेक्स कंपनी परिसर शुक्रवारी दुपारी अचानक धगधगत्या अग्नीकुंडात बदलला आणि काही क्षणांतच संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले. प्लास्टिक वेस्टेजला लागलेल्या भीषण आगीमुळे काळ्या धुराचे प्रचंड लोट आकाशात झेपावले होते. आग इतकी भीषण होती की, परिसरातील नागरिक घराबाहेर धावत आले आणि काही काळासाठी जाम परिसरात एकच खळबळ उडाली.

शुक्रवारी दुपारच्या सुमारास कंपनी परिसरातील प्लास्टिक वेस्टेजमधून अचानक धूर निघू लागला. काही क्षणांतच त्याने विक्राळ रूप धारण केले. प्लास्टिकचा मोठा साठा असल्याने ज्वाळा वेगाने पसरत होत्या. उष्णतेच्या लाटा आणि धुरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आग कंपनीत पसरली तर मोठा स्फोट होऊ शकतो, या भीतीने अनेकांची धावपळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट अग्निशामक दलाला तातडीने पाचारण करण्यात आले. माहिती मिळताच अग्निशामक अधिकारी गौरव गाणार यांच्या मार्गदर्शनाखाली सुनिल ढोळस, किशोर समर्थ, ओम लडी, वैभव ऐगंधवार आणि अमित साहारे यांच्यासह जवान घटनास्थळी दाखल झाले.

घटनास्थळी पोहोचताच जवानांसमोर मोठे आव्हान उभे होते. प्लास्टिक वेस्टेज आगीच्या भक्षस्थानी पडल्यामुळे ज्वाळा सतत भडकत होत्या. धुराचे प्रचंड लोट आणि वाढती उष्णता यामध्ये जवानांनी जीव धोक्यात घालून आगीवर पाण्याचा मारा सुरू केला. काही काळासाठी परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली होती.

दरम्यान, अग्निशामक दल घटनास्थळी पोहोचण्यास थोडा उशीर झाल्याची चर्चा परिसरात रंगली होती. मात्र, जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत जवळपास एक तासांच्या अथक परिश्रमानंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले आणि संभाव्य मोठा अनर्थ टाळला.



प्रवेश जाहिरात

शरद ग्रामिण विकास बहुउद्देशिय शिक्षण संस्था देवळी जि.वर्धा द्वारा संचालीत हजरत अबुबकर सिद्दीक (र.अ.) उर्दु अध्यापक विद्यालय डॉ.जाकिर हुसैन कॉलनी वर्धा, जिल्हा वर्धा (मुस्लिम अल्पसंख्याक) (कायम विना अनुदानीत)

व्यवस्थापन कोटा प्रवेश प्रक्रिया डी.एल.एड प्रथम वर्ष प्रवेश सूचना सन 2026-27 उर्दु माध्यमाच्या शैक्षणिक वर्षात डि.एल.एड. प्रथम वर्षाकरिता व्यवस्थापन कोटा 100 टक्के जागा.

शाखा निहाय आरक्षण

| शाखा निहाय | विज्ञान | कला | वाणिज्य / एम.सि.व्ही.सी | एकूण |
| --- | --- | --- | --- | --- |
| आरक्षण | 25 | 20 | 05 | 50 |

Online अर्ज दि .11/05/2026 ते 25/05/2026 ( www.maa.ac.in)

अर्ज स्विकृती दि. 11/05/2026 ते 26/05/2026
अर्ज छाननी दि. 01/06/2026 ,वेक लिस्ट प्रसिध्द करणे दि. 08/06/2026

गुणवत्ता यादी दि .10/06/ 2026

वेळ :–सकाळी 10 ते 5
ठिकाण– विद्यालयाचे कार्यालय , वर्धा
(सर्व सुटीचे दिवशी प्रवेश करिता कार्यालय सुरु राहील)

टिप :– प्रवेश घेण्याकरिता एच.एस.सी. मध्ये खुल्या संवर्गातील उमेदवारासाठी 49.50% व मागास वर्गासाठी 44.50 % गुण आवश्यक.एम.सि.व्हि.सी. मध्ये कृषी गटातील हर्टी कल्चर व क्राप्ट सायन्स आणि आरोग्य गटातील केंच अँड प्रिस्कूल मॅनेजमेंट विषय घेतलेले विद्यार्थी.
प्रवेश संदर्भात यानंतरच्या कार्यालयीन सुचना फलकावर प्रकाशित केल्या जाईल.

प्राचार्य 9922182474

सचिव 8788353967




जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ रविवार १० मे २०२६

# पश्चिम बंगालमध्ये शुभेंदु अधिकारी यांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालमध्ये तब्बल १५ वर्षांची तृणमूल काँग्रेसची सत्ता उलथवून लावत भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. या विजयाचे शिल्पकार मानले जाणारे शुभेंदु अधिकारी यांनी आज राज्याचे ९ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल आर. एन. रवी यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेन्द्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपचे अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. विधानसभा निवडणुकीत भाजपला २९४ पैकी २०७ जागांवर दणदणीत विजय मिळाल्यानंतर, विधिमंडळ पक्षात शुभेंदु अधिकारी यांची नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली होती. नुकत्याच झालेल्या २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत शुभेंदु अधिकारी यांनी भवानीपूर आणि नंदीग्राम या दोन्ही मतदारसंघांत विजय मिळवला. विशेष म्हणजे, भवानीपूर या ममता बॅनर्जी यांच्या बालेकिल्ल्यात त्यांनी त्यांचा १५,००० पेक्षा जास्त मतांनी पराभव केला. या विजयासह बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन झाले आहे. शुभेंदु अधिकारी यांच्यासोबत भाजपचे इतर महत्त्वाचे नेते जसे की दिलीप घोष, अग्निमित्रा पाल आणि निशिथ प्रामाणिक यांनीही मंत्रीपदाची शपथ घेतली. सोनार बांगला घडवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपले सरकार कटिबद्ध असेल, असे आश्वासन मुख्यमंत्री अधिकारी यांनी शपथविधीनंतर दिले.







## योगींनी सुवेंदुंना गमछा पांघरला; कोलकात्यात भाजप सरकारचा शपथविधी

पश्चिम बंगालमध्ये भाजपचे पहिले सरकार स्थापन झाले. सुवेंदू अधिकारी यांनी शनिवारी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. शपथविधीपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सुवेंदू यांनी रोड शो केला. या समारंभात मोदींनी पक्षाच्या कार्यकर्त्याच्या पायांना स्पर्श केला. तर, योगी आदित्यनाथ यांनी सुवेंदू यांना भगवा गमछा पांघरला. शपथविधी समारंभाच्या शेवटी, पंतप्रधान मोदींनी व्यासपीठावरून परेड ग्राउंडमध्ये उपस्थित लोकांना धन्यवाद दिले. यावेळी ते गुडघे टेकून बसले आणि जनतेला प्रणाम केला.

**वाकून प्रणाम-**सुवेंदू अधिकारी यांनी बांग्ला भाषेत देवाच्या नावाने शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर ते पंतप्रधान मोदींकडे गेले आणि वाकून त्यांना नमस्कार केला. पंतप्रधान मोदींनी त्यांची पाठ थोपटून त्यांना शुभेच्छा दिल्या.

**गमछा पांघरला-**सुवेंदू अधिकारी यांनी शपथ घेतल्यानंतर मंचावर उपस्थित असलेल्या सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचे अभिवादन केले. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांना भगवा गमछा पांघरला.

**आदिवासी वेशभूषेत शपथ घेतली-** पहिल्यांदाच आमदार झालेले क्षुदीराम टुडू आदिवासी वेशभूषेत शपथ घेण्यासाठी पोहोचले. त्यांनी गळ्यात भाजपचा गमछा आणि डोक्यावर पिवळा गमछा बांधला होता. व्यवसायाने शिक्षक असलेले क्षुदीराम रानीबांध मतदारसंघातून पहिल्यांदाच आमदार झाले आहेत.

**मंचापर्यंत रोड शो-**पंतप्रधान मोदींनी परेड ग्राउंडमध्ये रोड शो केला. ते ग्राउंडच्या प्रवेशद्वारापासून स्टेजपर्यंत खास तयार केलेल्या रथातून गेले. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष समिक आणि सुवेंदू अधिकारीही उपस्थित होते. त्यावेळी ग्राउंडवर सुमारे १ लाख लोक उपस्थित होते.

**कार्यकर्त्यांच्या पाया पडले-**शपथविधीपूर्वी मंचावर पंतप्रधान मोदींनी पश्चिम बंगाल भाजपच्या सर्वात ज्येष्ठ कार्यकर्त्यांपैकी एक असलेल्या माखनलाल सरकार यांच्या पायांना स्पर्श केला. ९८ वर्षांचे माखनलाल सरकार १९५२ मध्ये श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्यासोबत काश्मीरमध्ये तिरंगा फडकवण्यासाठी गेले होते, जिथे आंदोलनादरम्यान त्यांना अटक करण्यात आली होती.

## शपथविधी सुवेंदू अधिकारींचा, पण PM मोदी-DCM शिंदे भेटीची चर्चा

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालमध्ये भाजपाने ऐतिहासिक विजय मिळवल्यानंतर सुवेंदू अधिकारी यांचा शपथविधी अगदी थाटात पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपासह एनडीएतील अनेक मुख्यमंत्री, अनेक नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्रातून



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही या सोहळ्याला आवर्जून उपस्थिती लावली. या सोहळ्यात एका घटनेने लक्ष वेधले, ती म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पंतप्रधान मोदी यांची झालेली भेट. या सोहळ्यादरम्यान पंतप्रधान मोदी हे सर्व राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना अभिवादन करत पुढे सरकत असताना अचानक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याजवळ थांबत त्यांच्याशी चर्चा करताना दिसले. यावेळी त्यांच्यात नेमकी काय चर्चा झाली असावी, याची उत्सुकता सर्वांनाच होती. मात्र पंतप्रधान मोदी यांनी एकनाथ शिंदे यांच्या बाबतीत हेलिकॉप्ट प्रवासात झालेल्या या घटनेबाबतची बातमी कानावर आली असल्याचे सांगत एकनाथ शिंदे यांची आस्थेने विचारपूस केली. तसेच यापुढे विमानप्रवास करताना अधिक काळजी घेण्याचा सल्लाही दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याजवळ जाउन आस्थेने चौकशी केली. गुरुवारी खराब हवामानामुळे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे हेलिकाप्टर भरकटले होते. त्यानंतर या हेलिकाप्टरला जुहू येथील पवनहंस येथे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. पंतप्रधान मोदी यांनी एकनाथ शिंदे यांच्याकडे याबाबत विचारपूस केली.

## तमिळनाडूत 'थलपती' पर्व! राज्यपालांची मंजुरी

### विजय जोसेफ यांच्या शपथविधीचा मुहूर्तही ठरला!

**चेन्नई/वृत्तसंस्था :** तमिळनाडूमधील सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. टीव्हीकेचे विजय जोसेफ यांना १२० आमदारांचं पाठबळ मिळालं असून त्यांनी राज्यपालांची भेट घेउन सत्तास्थापनेचा दावा केला आहे. दरम्यान, उद्या दुपारी ३.१५ वाजण्याच्या सुमारास ते मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

**विजय जोसेफ यांना १२० आमदारांचं पाठबळ-** तमिळनाडूमध्ये २३४ सदस्यीय विधानसभेत सत्तास्थापनेसाठी ११८ संख्याबळाची आवश्यकता आहे. टीव्हीकेला १०८ जागा मिळाल्या असून दोन जागांवरून स्वत? विजय जोसेफ निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांनी एक मतदारसंघ सोडला असून टीव्हीकेकडे सध्या १०७ सदस्य संख्या आहे. त्यामुळे त्यांना ११ आमदारांच्या पाठबळाची आवश्यकता आहे. अखेर, विदुतलै चिरु तैगल कच्ची (VCK), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) (CPI-M) आणि काँग्रेस या पक्षांनी पाठिंबा दिला असून १२० आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र राज्यपालांना सुपूर्द केलं आहे. ५९ वर्षांनंतर विजय हे तमिळनाडूचे पहिले बिगर-द्रविडी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. मात्र, त्यांच्यासोबत मंत्रिमंडळात किती मंत्र्यांचा समावेश केला जाईल, याबाबत अद्याप अनिश्चितता आहे. सरकार स्थापनेचे निमंत्रण मिळवण्यासाठी गेल्या एका आठवड्यात विजय यांची राज्यपालांसोबतची ही चौथी भेट होती. यापूर्वीचे त्यांचे दोन प्रयत्न आमदारांच्या पाठिंब्याअभावी यशस्वी झाले नव्हते. तमिळनाडूमध्ये आज शपथविधी होणार होता. मात्र, विजय जोसेफ यांच्याकडे सत्तास्थापनेकरता पुरेसे पाठबळ



नसल्याने आजचा कार्यक्रम रद्द झाला. आज दिवसभर टीव्हीकेची पाठबळ मिळवण्याकरता धडपड सुरू होती. या घडामोडींनंतर टीव्हीकेच्या कार्यकर्त्यांनी आणि समर्थकांनी चेन्नईतील पक्षाच्या मुख्यालयाबाहेर फटाके फोडून जल्लोष केला.

दुसरीकडे, एनडीएचा मित्रपक्ष असलेल्या अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघम ने टीव्हीकेवर टीका करत त्यांच्यावर घोडेबाजाराचा आरोप केला आहे. या राजकीय घडामोडींमुळे तमिळनाडूमध्ये पुन्हा एकदा रिसार्ट पालिटिक्स सुरू झाले असून २०१६ मध्ये माजी मुख्यमंत्री जे. जयललिता यांच्या निधनानंतर असा प्रकार पाहायला मिळाला होता. टीव्हीकेला पाठिंबा देणा-या काँग्रेसच्या पाच आमदारांना हैदराबादला हलवण्यात आले आहे, तर टीव्हीकेच्या आमदारांना चेन्नईजवळील महाबलीपुरम येथील रिसार्टमध्ये ठेवण्यात आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, व्हीसीके उपमुख्यमंत्रीपदासह काही महत्त्वाची पदे मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे, मात्र कोणत्याही पक्षाने अद्याप अधिकृतपणे याला दुजोरा दिलेला नाही.

## होर्मुझ सामुद्रधुनीत युद्धाचा भडका!

### ■ नाकेबंदी फोडण्याचा प्रयत्न फसला

### ■ अमेरिकेचा इराणच्या दोन तेलवाहू जहाजांवर हल्ला

**तेलअवीव/वृत्तसंस्था :**होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये अमेरिका-इराण यांच्यातील तणाव आणखी वाढण्याची शक्यता आहे. आता अमेरिकन सैनिकांनी इराणच्या दोन तेलवाहू टँकर्सवर हल्ला करून ती निकामी केली. यासंदर्भात 'एपी' या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, या भागात रात्रभर दोन्ही बाजूंनी भीषण गोळीबार झाला. यातच, संयुक्त अरब अमिरातीनेही आपल्यावर इराणने क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ला केल्याचा दावा केला आहे. या ताज्या घडामोडीने मध्यपूर्व आशियात पुन्हा युद्ध पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



**अमेरिकेची नाकेबंदी तोडण्याचा प्रयत्न -** यासंदर्भात अमेरिकन लष्करी अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार, इराणच्या या टँकर्सने अमेरिकेची नाकेबंदी तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र हा प्रयत्न अमेरिकन सैनिकांनी यशस्वीपणे रोखला. यापूर्वी नौदलाच्या तीन जहाजांवरील हल्ले परतवून लावत अमेरिकेने होर्मुझमधील इराणी लष्करी तळांनाही प्रत्युत्तर दिले होते.अमेरिका आणि इस्रायलने २८ फेब्रुवारी रोजी इराणवर संयुक्त हल्ला चढवला होता. तेव्हापासूनच इराणने जगाची उर्जा पुरवठ्याच्या दृष्टीने महत्वाचा असलेला हा जलमार्ग (होर्मुझ समुद्रधुनी) बंद केली आहे. यामुळे जागतिक पातळीवर इंधनाचे दर अक्षरशः गगनाला भिडले आहेत.

## जालन्यात गुणरत्न सदावर्तेच्या ताफ्यावर मनसैनिकांचा हल्ला; शाईफेक करत सुपा-याही भिरकावल्या

**जालना/प्रतिनिधी :** राज्याच्या राजकारणात आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत राहणारे वकील ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या गाडीवर आज जालन्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) कार्यकर्त्यांनी हल्ला केला. या घटनेत मनसैनिकांनी सदावर्तेच्या गाडीवर आधी शाईफेक केली आणि त्यानंतर त्यांच्यावर सुपा-या फेकून मारल्याने परिसरात मोठा गोंधळ उडाला.

ॲड. गुणरत्न सदावर्ते हे जालन्यातील धनगर समाज बांधवांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि उपोषणकर्त्यांची भेट घेण्यासाठी आले होते. ते जालन्यात दाखल होताच, समृद्धी महामार्गावरून शहरात येत असताना काकडे पेट्रोल पंपाजवळ



आधीच दबा धरून बसलेल्या मनसे कार्यकर्त्यांनी त्यांचा ताफा अडवला.

कार्यकर्त्यांनी राज ठाकरे झिंदाबाद अशा घोषणा देत सदावर्तेच्या गाडीवर काळी शाई फेकली. शाईफेक केल्यानंतर आंदोलक थांबले नाहीत, तर त्यांनी सदावर्तेच्या दिशेने सुपा-या फेकून मारल्या. राजकीय वर्तुळात सुपारी देणे या शब्दाचा वापर एखाद्या करारासाठी किंवा कटासाठी केला जातो, त्यावरूनच उपरोधिकपणे हा प्रकार करण्यात आल्याची चर्चा आहे.

## नाशिकच्या TCS प्रकरणावरून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा भाजपाचा डाव

**मुंबई -** नाशिकमधील टीसीएस कंपनीतील अत्याचार आणि बेकायदा धर्मांतर प्रकरणातील अनेक दिवस फरार असलेली मुख्य संशयित निदा खान हिला ७ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली होती. ती नारेगाव कैसर कॉलनीतील एका फ्लॅटमध्ये कुटुंबीयांसह लपून राहत होती. दरम्यान, निदा खान हिला लपण्यामध्ये एमआयएमचा नगरसेवक मतीन पटेल याचा हात असल्याचे समोर आल्यानंतर भाजप तसेच शिंदेसेनेकडून त्याच्याविरोधात आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. तर निदा खानला झालेली अटक आणि नाशिकच्या टीसीएस प्रकरणावरून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा भाजपाचा डाव आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला




आहे. नाशिकच्या TCS प्रकरणी निदा खानला अटक केल्याच्या प्रश्नावर बोलताना काँग्रेस प्रदेशध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, या प्रकरणातील एफआयआर अद्याप सार्वजनिक केलेला नाही तो सार्वजनिक करावा. कायद्याने त्यांचे काम करावे पण या प्रकरणाच्या माध्यमातून धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा खेळ भारतीय जनता पक्ष करत आहे. एवढे दिवस पोलीस झोपा काढत होते का, याचे उत्तर द्यावे. या प्रकरणाला हवा देण्यात सरकारचा काही हात आहे का, हे उघड झाले पाहिजे. मी मारल्यासारखे करतो तू रडल्यासारखे करतो, हा तमाशा बंद करा, असे सपकाळ म्हणाले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवंडे यांच्यावरील शाईहल्ला, धक्काबुक्की व शिवीगाळ हा भ्याड हल्ला असून, हल्लेखोर वारकरी संप्रदायाच्या विचाराला माननारे नाहीत. या प्रकरणाला भाजपाची चिथावणी असून अशा हल्लेखोरांना भाजपा सरकार संरक्षण देत आले आहे.

## तहसीलदार ते जिल्हाधिकारी; अविनाश पाठकाचा 'खेळ' खल्लास

**बीड /प्रतिनिधी :** ज्या जिल्ह्यावर १५ वर्षे एकछत्री अंमल गाजवला, ज्या प्रशासकीय यंत्रणेला आपल्या ताटाखालचे मांजर बनवून ठेवले, त्याच सिस्टिमने अखेर तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यास अटक केली आहे. एका बनावट सहीच्या जोरावर सरकारी तिजोरीवर ७३ कोटींचा डल्ला मारणा-या पाठकाचा बीडमधील प्रदीर्घ सत्तेचा खेळ आता अखेर खल्लास झाला असून, कर्मा रिटर्न्सचा प्रत्यय संपूर्ण जिल्ह्याला येत आहे.

अविनाश पाठक याने बीड जिल्ह्यामध्ये तब्बल १५ वर्षे सेवा केली आहे. तहसीलदार पदापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास जिल्हा पुरवठा अधिकारी, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असा करत थेट जिल्हाधिकारी पदापर्यंत पोहोचला. जिल्ह्यातील प्रत्येक विभागावर आणि राजकारण्यांवर त्याची मजबूत पकड होती. मात्र, हेच प्रदीर्घ वास्तव्य आणि प्रशासनावरील पकड आता ७३ कोटींच्या भूसंपादन घोटाळ्याच्या रूपाने त्याच्या अंगलट आली आहे.

**असा झाला ७३ कोटींचा गेम-**बीड जिल्ह्यातून जाणारे विविध राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे मार्गांच्या भूसंपादनासाठी शेतक-यांना मोबदला दिला जातो. अविनाश पाठक २२ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी पदावरून बदली होउन गेले. मात्र, त्यानंतरही त्याने जुन्या तारखांचे बनावट आदेश काढले. ६८ कोटींचा मूळ मोबदला चक्क ३१० कोटी २० लाखांवर नेण्यात आला. यातून ७३ कोटी ४ लाख रुपये प्रत्यक्षात वाटले गेले. सरकारी रेकार्डमध्ये कोणतीही अधिकृत नोंद नसताना हे पैसे वाटले गेले, जणू काही संपूर्ण सिस्टिमच हायजॅक केली होती.



**कॉल रेकार्डिंग आणि तांत्रिक पुरावे-**तपास यंत्रणांच्या हाती अडीच हजारांहून अधिक काल रेकार्डिंग लागले आहेत. हस्ताक्षरतज्ज्ञांच्या अहवालात या सह्या पाठक याच्याच असल्याचे स्पष्ट झाले आहे. आयपीएस एम. व्यंकटराम यांच्याकडे तपास येताच हालचालींना वेग आला आणि ७ मे २०२६ रोजी पाठकांना लातूरमधून ताब्यात घेतले.

**बीड जिल्ह्यातून हे महामार्ग जातात-** बीड जिल्ह्यातून सध्या अनेक महत्त्वाचे दळणवळण प्रकल्प जात असून, जिल्ह्याचे जाळे राष्ट्रीय महामार्गांनी जोडले गेले आहे. यामध्ये धुळे-सोलापूर, जामखेड-अहमदपूर, पाथरडी-परळी, पैठण-पंढरपूर, शेगाव-पंढरपूर, कल्याण-विशाखापट्टणम आणि सुरत-चेन्नई या प्रमुख राष्ट्रीय महामार्गांचा समावेश आहे. यासोबतच नव्याने प्रस्तावित असलेला शक्तिपीठ महामार्ग देखील जिल्ह्यातून जाणार आहे. रस्ते मार्गांशिवाय अत्यंत महत्त्वाकांक्षी असा नगर-बीड-परळी हा रेल्वेमार्गही जिल्ह्यातून जात असून, या सर्व प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर भूसंपादन प्रक्रिया राबवण्यात आली आहे. यातही घोटाळा झाल्याचा संशय आता यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

## कमी गुण मिळाल्याने दहावीच्या 3 विद्यार्थ्यांची आत्महत्या

**मुंबई :** दहावीच्या परीक्षेचा निकाल ८ मे रोजी लागला. याही वर्षी मुलींनीच बाजी मारली. पण काही विद्यार्थ्यांना परिक्षा म्हटलं की, टेन्शन येतंच. पण यामुळे आत्महत्या हे खूप मोठं आणि चुकीचं पाउल अनेक विद्यार्थी उचलत आहेत.दहावीच्या बोर्ड परीक्षेचा निकाल लागण्याच्या तासभर आधी म्हणजे ८ मे २०२६ रोजी सकाळी संभाजीनगरमधील एका विद्यार्थ्याने गळफास



घेतला. मिळालेल्या माहितीनुसार, नापास होण्याच्या भीतीने सोहम ज्ञानेश्वर मोरे या विद्यार्थ्याने आपले जीवन संपवले. पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. दहावीच्या निकालानंतर आनंदाचं वातावरण असतानाच धाराशिवमधून एक हृदयद्रावक घटना घडली. अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्यामुळे एका विद्यार्थ्याने टोकाचं पाउल उचललं. धाराशिव जिल्ह्यातल्या भूम येथे राहणा-या आदित्य नितीन जाधव या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. आदित्य हा भूममधील रवींद्र हायस्कूल येथे दहावीत शिक्षण घेत होता. नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात त्याला ६३.६० टक्के गुण मिळाले होते. पण ते त्याच्या अपेक्षेपेक्षा कमी असल्याने त्याने राहत्या घरी साडीच्या मदतीने गळफास घेत आत्महत्या केली.

**नागपुरातील विद्यार्थिनीची आत्महत्या-**दहावीच्या निकालानंतर नागपूरही हादरले. एका विद्यार्थिनीने घरात गळफास घेतला. या सगळ्यामुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आणि मित्रपरिवार आणि शाळेतही शोककळा पसरली आहे. दहावी-बारावीचे रिझल्ट लागल्यानंतर विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव वाढत असल्याचे चित्र अनेकदा समोर येते. गुण कमी मिळाले म्हणजे आयुष्य संपत नाही, हे विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी समजून घेणे गरजेचे आहे. मानसिक तणावाच्या काळात मुलांशी संवाद ठेवणे आणि त्यांना भावनिक आधार देणे तितकेच महत्त्वाचे मानले जाते.

## दिल्लीत दहशतवादी हल्ल्याचा इशारा

### भाजप मुख्यालयाची सुरक्षा वाढवली

**नवी दिल्ली-**इंटेलिजन्स एजन्सींनी दिल्लीत दहशतवादी हल्ल्याचा अलर्ट जारी केला आहे. न्यूज एजन्सी पीटीआयने सूत्रांच्या आधारे ही माहिती दिली आहे. एजन्सीनुसार, भाजप मुख्यालय आणि आसपासच्या सरकारी इमारतींची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. एजन्सींना संशय आहे की, दीनदयाल उपाध्याय मार्गावरील कार्यालयांना आत्मघाती हल्ले, कार बॉम्बस्फोट, गोळीबार किंवा आयईडीद्वारे लक्ष्य केले जाउ



शकते. कोणताही धोका टाळण्यासाठी सुरक्षा दलांनी पाळत आणि प्रतिबंधात्मक उपाय वाढवले आहेत. पोलिस आणि सुरक्षा दलांनी अतिरिक्त जवानांची तैनाती, तपासणी आणि सीसीटीव्ही पाळत वाढवली आहे. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी बॅरिकेडिंग आणि वाहनांची रँडम तपासणी करण्यासोबतच, सुरक्षा एजन्सी कोणत्याही संभाव्य धोक्याला प्रतिबंध घालण्यासाठी समन्वयाने काम करत आहेत. बाम्ब निकामी करणारी पथके, स्निफर डॉग युनिट्स आणि जलद प्रतिसाद पथके हाय अलर्टवर ठेवण्यात आली आहेत. दिल्ली अग्निशमन सेवेलाही सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पोलिसांना संवेदनशील भागांमध्ये संशयास्पद हालचालींवर, बेवारस वस्तूंवर आणि उभ्या वाहनांवर कडक नजर ठेवण्यास सांगण्यात आले आहे. दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ १० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६.५२ वाजता दहशतवादी हल्ला झाला होता. दहशतवाद्याने धावत्या कारमध्ये स्फोट घडवला होता. या स्फोटात १३ लोकांचा मृत्यू झाला आणि २० हून अधिक लोक जखमी झाले होते.या स्फोटाचे धागेदोरे टेरर मॉड्यूलशी जोडलेले होते. ज्याचा खुलासा जम्मू-काश्मीर पोलिसांनी १ दिवसापूर्वी हरियाणातून केला होता. पोलिस सूत्रांनुसार, दहशतवादी ६ डिसेंबर रोजी, म्हणजेच बाबरी मशीद पाडल्याच्या वर्षदिनी, दिल्लीसह अनेक ठिकाणी स्फोट घडवू इच्छित होते. यासाठी त्यांनी ३२ गाड्यांची व्यवस्था केली होती. त्यात बॉम्ब आणि स्फोटके भरून स्फोट घडवले जाणार होते. यात ब्रेझा, स्विफ्ट डिझायर, इकोस्पोर्ट आणि आय२० सारख्या गाड्यांचा समावेश होता.

## DRDO कडून ऐतिहासिक कामगिरी!

### अत्याधुनिक 'अग्नी' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**भुवनेश्वर (ओडिशा):** भारतीय संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने शुक्रवारी संरक्षण क्षेत्रात एक मोठी झेप घेतली आहे. भारताने अत्याधुनिक अशा अग्नी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली असून, यामुळे देशाच्या सामरिक आणि संरक्षण क्षमतेत मोलाची भर पडली आहे. या क्षेपणास्त्राचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हे MIRV (Multiple Independently Targeted Re-entry Vehicle) तंत्रज्ञानाने सज्ज आहे. या प्रगत तंत्रज्ञानामुळे एकाच क्षेपणास्त्राद्वारे एकाच वेळी वेगवेगळ्या दिशांना असलेल्या अनेक लक्ष्यांवर अचूक मारा करणे शक्य होणार आहे. या चाचणीमुळे भारताची अण्वस्त्र प्रतिबंधक क्षमता अधिक मजबूत झाली आहे. एकाच वेळी अनेक शत्रू तळांना उद्ध्वस्त करण्याची क्षमता प्राप्त झाल्याने, जगातील मोजक्या बलाढ्य देशांच्या पंक्तीत भारताने आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. आधुनिक संरक्षण तंत्रज्ञानात स्वावलंबी होण्याच्या दिशेने हे एक ऐतिहासिक पाउल मानले जात आहे.





# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## रखडलेल्या खटल्यांचा महापूर

शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये, असे पूर्वीपासून म्हटले जाते. त्यात कोणतीही अतिशयोक्ती नसून एक सत्यता व दाहकता दडलेली आहे, हे आपणास कोर्टाची पायरी चढल्यावरच अनुभवाअंती समजते. तारीख पे तारीख या चित्रपटातील अभिनेते सनी देओल यांचा संवाद सिनेमागृहात टाळ्यांची दाद मिळत असली तरी त्यात किती वेदना दडल्या आहेत, असा टाहो का फोडावा लागतो, हे आपल्याला कोर्टातच गेल्यावर समजते. देशामध्ये ४ कोटी ८७ लाख २८ हजार २० खटले न्यायालयात न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यापैकी ३ कोटी ७६ लाख ६४ हजार ८७७खटले हे गुन्हेगारीबाबत असून अन्य १ कोटी १० लाख ६३ हजार खटले सामान्य स्वरूपातील आहेत. महाराष्ट्रात ६० लाख ६२ हजार ६४४ खटले न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यात ४२ लाख ६९ हजार ९७० खटले हे गुन्हेगारी क्षेत्राबाबत आहेत. १७ लाख ७२ हजार २७५ सामान्य खटले आहेत. महाराष्ट्र राज्यातील ६९ टक्के खटले हे वर्षभरापूर्वीचे असून ३१ टक्के खटले हे जुने आहेत. गुन्हेगारांना अथवा निर्दोष लोकांना जामीन मिळायलाही १५ ते २० वर्षे लागली आहेत. खटले रखडल्याने गुन्हेगारांना शिक्षा मिळत नाही. 'उशिरा मिळालेला न्याय म्हणजे न्याय नाकारल्यासारखाच असतो,' हे वाक्य भारतातील न्यायव्यवस्थेकडे पाहिले की अक्षरशः खरे वाटते. देशभरातील न्यायालयांमध्ये ४ कोटींहून अधिक खटले प्रलंबित आहेत. त्यात लाखो गुन्हेगारी प्रकरणे वर्षानुवर्षे निकालाच्या प्रतीक्षेत अडकून पडली आहेत. महाराष्ट्रातही परिस्थिती फार वेगळी नाही. लाखो खटले न्यायालयांच्या कपाटात धूळखात पडलेले आहेत. परिणामी गुन्हेगार मोकाट फिरत आहेत आणि निरपराध लोक वर्षानुवर्षे न्यायासाठी हेलपाटे मारत आहेत. देशातील ४ कोटी ८७लाखांहून अधिक खटल्यांपैकी ३ कोटी ७६ लाखांपेक्षा अधिक खटले गुन्हेगारी स्वरूपाचे आहेत. महाराष्ट्रात ६० अनुपस्थिती, लाखांहून अधिक खटले प्रलंबित असून त्यातील बहुतांश खटले गुन्हेगारी स्वरूपाचे आहेत. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे ६९ टक्के खटले हे वर्षभरापेक्षा जुने आहेत. काही प्रकरणे तर १५ ते २० वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर लाखो कुटुंबांच्या वेदना आहेत. भारतातील न्यायव्यवस्था आज तारखांच्या दलदलीत अडकली आहे. प्रत्येक सुनावणीला पुढची तारीख मिळते. वकीलांची अनुपस्थिती, सरकारी वकिलांची कमतरता, न्यायाधीशांची रिक्त पदे, पोलीस तपासातील त्रुटी, सरकारी यंत्रणेचा ढिसाळपणा आणि राजकीय हस्तक्षेप या सगळ्या गोष्टींनी न्यायव्यवस्था पोखरली आहे. न्यायालयात खटला दाखल करणे सोपे; पण निकाल मिळवणे म्हणजे आयुष्याची शिक्षा बनली आहे. खून, बलात्कार, भ्रष्टाचार, फसवणूक, आर्थिक घोटाळे यांसारखी गंभीर प्रकरणे वर्षानुवर्षे लांबतात. अशा परिस्थितीत सामान्य माणसाचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. निरपराध, गरीब आणि अशिक्षित आरोपी केवळ जामिनासाठी पैसे नसल्याने वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडलेले आहेत. एखाद्या छोट्या गुन्ह्यात अटक झालेला व्यक्ती १०-१५ वर्षे तुरुंगात राहतो आणि शेवटी निर्दोष सुटतो. पण तोपर्यंत त्याचे आयुष्य उद्ध्वस्त झालेले असते. त्याची नोकरी जाते, कुटुंब तुटते, समाजात बदनामी होते. निर्दोष सुटल्यावर सरकार त्याला काय परत देणार? हरवलेले आयुष्य? न्यायालयातील रखडलेले खटले हे केवळ न्यायव्यवस्थेचे अपयश नाही, तर लोकशाहीच्या मुळावर उठलेला प्रश्न आहे. कारण न्यायव्यवस्था ही लोकशाहीचा मुख्य आधारस्तंभ मानली जाते. जर न्यायच वेळेत मिळत नसेल, तर लोकांचा कायद्यावरील विश्वास संपतो. आणि ज्या समाजात कायद्यावरील विश्वास संपतो, तिथे अराजकता निर्माण होते. न्यायव्यवस्थेतील रिक्त पदे हा देखील मोठा प्रश्न आहे. देशात हजारो न्यायाधीशांची पदे रिक्त आहेत. एका न्यायाधीशावर शेकडो खटल्यांचा ताण आहे. मग तो प्रत्येक खटल्याला किती वेळ देणार? आज अनेक न्यायालयांमध्ये डिजिटल यंत्रणा सुरू झाली असली तरी ती पुरेशी प्रभावी नाही. ई-कोर्ट, ऑनलाइन सुनावणी, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग या सुविधा ग्रामीण भागात अजून प्रभावीपणे पोहोचलेल्या नाहीत. परिणामी सामान्य नागरिकाला कोर्टात जाण्यासाठी दिवसेंदिवस रांगा लावाव्या लागतात. अनेक वेळा एकाच तारखेसाठी पूर्ण दिवस वाया जातो. न्यायालयीन विलंबामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम होत आहे. व्यावसायिक वाद, जमीन प्रकरणे, कर प्रकरणे, उद्योगाशी संबंधित खटले वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होतो. उद्योगांना अडथळे निर्माण होतात. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांमध्ये तर न्यायालयांवर प्रचंड ताण आहे. अनेकदा एखाद्या खटल्याची पहिली सुनावणी होण्यासाठीच वर्षे उलटतात. न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराचाही प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. काही ठिकाणी दलालांची साखळी निर्माण झाली आहे. तारखा वाढवण्यासाठी, फाईल हलवण्यासाठी, कागदपत्रे मिळवण्यासाठी लोकांना पैसे मोजावे लागतात. न्याय हा विक्रीची वस्तू नसून सामान्य माणसाला पैशाशिवाय न्याय मिळणे कठीण झाले आहे. या परिस्थितीत केवळ सरकारलाच दोष देऊन उपयोग नाही. न्यायालयीन सुधारणांसाठी सर्वच यंत्रणांनी एकत्र काम करणे आवश्यक आहे. न्यायाधीशांची रिक्त पदे तातडीने भरली पाहिजेत. खटल्यांची वेळमर्यादा निश्चित केली पाहिजे. खोटे खटले दाखल करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. पोलीस तपास अधिक सक्षम झाला पाहिजे. न्यायालयीन प्रक्रिया सुलभ आणि वेगवान केली पाहिजे. फास्ट ट्रॅक कोर्टाची संख्या वाढवणे, तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर, ऑनलाइन पुरावे आणि डिजिटल व्यवस्थापन यांचा प्रभावी वापर केल्याशिवाय परिस्थिती सुधारणार नाही. तसेच लहान-सहान प्रकरणे लोकअदालती आणि मध्यस्थीच्या माध्यमातून निकाली काढली पाहिजेत. आज देशातील सामान्य माणूस न्यायालयाकडे आशेने पाहतो; पण त्याला मिळते ती फक्त तारीख. देशात कायद्याचे राज्य टिकवायचे असेल, तर न्यायव्यवस्थेतील ही सडलेली स्थिती बदलणे अत्यावश्यक झाले आहे. न्यायव्यवस्थेवर सर्वसामान्य जनतेचा विश्वास आपणास वृद्धिंगत करायचा असेल तर खटल्यांना गती मिळून निकाल लवकर लागावा, यासाठी प्रयत्न करावेच लागतील.

# स्त्रियांच्या सुरक्षेबाबत आपण इतर देशांकडून घ्यावयाचे धडे

**लैंगिक अत्याचार आणि बलात्कार हा जगभरातील समाजांसमोर उभा असलेला अत्यंत गंभीर आणि गुंतागुंतीचा प्रश्न आहे. कोणत्याही देशाची प्रगती केवळ आर्थिक किंवा तांत्रिक मापदंडांवर मोजली जात नाही; त्या समाजात महिलांना कितपत सुरक्षितता, सन्मान आणि न्याय मिळतो यावरही ती ठरते. विविध देशांमध्ये या गुन्ह्यांचे प्रमाण, त्यांची नोंद, तपासाची पद्धत आणि न्यायप्रक्रिया वेगवेगळी असली तरी एक गोष्ट समान आहे, या समस्येचे समाधान केवळ कठोर कायद्यांनी होत नाही, तर समाजाची मानसिकता, शासनाची कार्यक्षमता आणि न्यायव्यवस्थेची गती यांचा एकत्रित परिणाम त्यावर होतो.**



युरोपातील काही प्रगतीशील देशांकडे पाहिल्यास, स्वीडन हा देश अनेकदा चर्चेत येतो. तिथे बलात्काराच्या नोंदींचे प्रमाण तुलनेने जास्त दिसते, पण यामागे एक महत्त्वाचे कारण म्हणजे तिथली कायदेशीर व्याख्या खूप व्यापक आहे. 'संमती' (कन्सेंट) हा केंद्रबिंदू मानला जातो. स्पष्ट, स्वेच्छेची संमती नसल्यास ते गुन्हा समजले जाते. त्यामुळे अनेक घटना ज्या इतर देशांत नोंदवल्याच जात नाहीत, त्या तिथे नोंदवल्या जातात. त्याचप्रमाणे जर्मनी आणि फ्रान्स सारख्या देशांतही क्ष्मीटू चळवळीच्या पार्श्वभूमीवर कायद्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. या देशांमध्ये पोलीस तपासासाठी आधुनिक तंत्रज्ञान, फॉरेन्सिक सुविधा आणि प्रशिक्षित अधिकारी उपलब्ध असल्याने तपासाची गुणवत्ता अधिक चांगली असते. युनायटेड स्टेट्स मध्ये लैंगिक गुन्ह्यांबाबतची कायदेशीर चौकट राज्यागणिक वेगळी असली तरी एकंदरीत व्यवस्था कडक आणि संरचित आहे. तिथे पीडितांसाठी हेल्पलाईन्स, 'रेप क्रायसिस सेंटर्स', समुपदेशन आणि कायदेशीर मदत सहज उपलब्ध असते. कार्यस्थळांवर आणि शैक्षणिक संस्थांमध्ये लैंगिक छळाविरोधात स्पष्ट धोरणे आहेत. मात्र, अमेरिकेतही सर्व समस्या सुटल्या आहेत असे नाही. तक्रार नोंदवताना भीती, सामाजिक दबाव आणि न्यायप्रक्रियेतील गुंतागुंत ही आव्हाने तिथेही आहेत.

आशियाई देशांमध्ये परिस्थिती काहीशी वेगळी आहे. जपानमध्ये सार्वजनिक ठिकाणी गुन्ह्यांचे प्रमाण तुलनेने कमी मानले जाते, कारण तिथे सामाजिक शिस्त आणि कायद्याचा आदर मोठ्या प्रमाणात दिसतो. तरीही, अनेक प्रकरणे नोंदवली जात नाहीत याला 'अंडर-रिपोर्टिंग' म्हणतात. पीडितांना लाज वाटणे, सामाजिक कलंक आणि कुटुंबाचा दबाव यामुळे तक्रार करण्यास अडचणी येतात. साउथ कोरिया मध्ये अलीकडील काळात डिजिटल लैंगिक गुन्ह्यांवर कडक कारवाई करण्यात आली आहे, आणि सरकारने तांत्रिक उपाययोजना वाढवल्या आहेत. मध्यपूर्वेतील काही देशांमध्ये, जसे युनायटेड अरब एमिरेट्स, कायदे कठोर असले तरी सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा प्रभाव जास्त असतो. काही ठिकाणी पीडितांवरच पुरावे सादर करण्याची जबाबदारी अधिक येते, ज्यामुळे तक्रार नोंदवण्याचे प्रमाण कमी राहते. तरीही, अलीकडच्या काळात अनेक देशांनी कायद्यात सुधारणा करून महिलांच्या संरक्षणावर अधिक भर दिला आहे.

या सर्व उदाहरणांतून एक गोष्ट स्पष्ट होते कायद्यांची कठोरता पुरेशी नसते; अंमलबजावणी आणि न्यायप्रक्रियेचा वेग अधिक महत्त्वाचा असतो. विकसित देशांमध्ये 'सर्टन्टी ऑफ पनिशमेंट' म्हणजेच शिक्षा होण्याची खात्री जास्त असते. गुन्हा सिद्ध झाला की शिक्षा होते आणि ती तुलनेने लवकर होते. यामुळे गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती निर्माण होते. समाजाची भूमिका येथे निर्णायक ठरते. ज्या देशांत स्त्री-पुरुष समानतेबद्दल जागरूकता जास्त आहे, तिथे महिलांविषयी आदराची भावना अधिक दृढ असते. शाळांमध्ये लहानपणापासूनच 'कन्सेंट', लैंगिक शिक्षण आणि परस्पर सन्मान याबद्दल शिकवले जाते. यामुळे पुढील पिढीत सकारात्मक विचारसरणी विकसित होते. माध्यमे आणि सामाजिक चळवळी, जसे क्ष्मीटू, यांनीही महिलांना आवाज दिला आहे आणि अनेक देशांमध्ये कायदे बदलण्यास मदत केली आहे. सरकारच्या पातळीवर विविध उपाययोजना राबवल्या जातात विशेष पोलीस पथके, महिला हेल्पलाईन्स, आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली, आणि 'वन-स्टॉप सेंटर्स' जिथे पीडितांना वैद्यकीय, कायदेशीर आणि मानसिक आधार एकाच ठिकाणी मिळतो. तंत्रज्ञानाचाही मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो सीसीटीव्ही, डिजिटल पुरावे, फॉरेन्सिक तपास, आणि मोबाइल ॲप्सद्वारे मदत मागवण्याच्या सुविधा. यामुळे गुन्हे शोधणे आणि दोषींना शिक्षा देणे अधिक प्रभावी होते. आता भारताच्या संदर्भात पाहिल्यास, कायद्यांच्या बाबतीत भारत कमी नाही. पॉक्सो ॲक्ट, तसेच क्रिमिनल लॉ (अमेंडमेंट) ॲक्ट २०१३ यांसारखे कायदे अत्यंत कठोर आहेत. तरीही, काही महत्त्वाच्या बाबतीत आपण कमी पडतो. सर्वात मोठी समस्या म्हणजे अंमलबजावणीतील त्रुटी. पोलिस तपासात विलंब, पुरावे गोळा करण्यातील कमतरता, आणि न्यायालयीन प्रक्रियेत होणारा विलंब यामुळे प्रकरणे वर्षानुवर्षे चालतात. यामुळे गुन्हेगारांमध्ये कायद्याची भीती कमी होते.

दुसरी समस्या म्हणजे अंडर-रिपोर्टिंग. अनेक महिलांना आणि कुटुंबांना सामाजिक कलंक, भीती आणि दबावामुळे तक्रार नोंदवण्यास संकोच वाटतो. ग्रामीण भागात तर ही समस्या अधिक गंभीर आहे. तिसरा मुद्दा म्हणजे समाजाची मानसिकता. स्त्री-पुरुष समानतेबद्दल अजूनही अनेक गैरसमज आहेत, आणि काही ठिकाणी महिलांवरच दोष टाकण्याची प्रवृत्ती दिसते. चौथा मुद्दा म्हणजे न्यायप्रक्रियेचा वेग. फास्ट-ट्रॅक कोर्टांची संकल्पना असली तरी सर्व प्रकरणे जलदगतीने निकाली निघत नाहीत. साक्षीदार संरक्षण, पीडितांना समुपदेशन, आणि पुनर्वसन या बाबींमध्येही अजून सुधारणा आवश्यक आहे. पाचवा मुद्दा म्हणजे शिक्षण आणि जागरूकता. 'गुड टच-बॅड टच' शिकवणे आवश्यक आहे, पण त्याबरोबरच मुलांमध्ये लहानपणापासून स्त्रियांचा आदर, मर्यादा आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रगतीशील देशांचा अनुभव सांगतो की महिला सुरक्षिततेसाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. मजबूत कायदे, प्रभावी अंमलबजावणी, जलद न्याय, तांत्रिक साधनांचा वापर, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजातील सकारात्मक मानसिकता. भारतात कायदे आहेत, पण त्यांची अंमलबजावणी, न्यायप्रक्रियेचा वेग आणि सामाजिक दृष्टिकोन यामध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. केवळ संताप व्यक्त करून थांबण्याऐवजी दीर्घकालीन बदल घडवण्यावर भर दिला, तरच महिलांसाठी सुरक्षित आणि सन्मानजनक समाज निर्माण होऊ शकतो.

**अनिरुद्ध निमखेडकर**

# नव्या सरकारपुढील 'पहिले १०० दिवस' आणि आव्हाने

पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासात २०२६ ची विधानसभा निवडणूक ही एक मैलाचा दगड ठरली आहे. 'कमळ' फुलवून भाजपने पहिल्यांदाच स्वबळावर सत्ता काबीज केली असून, सुवेंदू अधिकारी यांनी राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. या निवडणुकीत भाजपने २०७ जागा जिंकून निर्विवाद बहुमत मिळवले, तर ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले. २०१६ मध्ये केवळ तीन जागा असणाऱ्या भाजपने २०२१ मध्ये ७७ जागांपर्यंत मजल मारली आणि २०२६ मध्ये थेट सत्तेचे सोपान गाठले. या यशामागे तृणमूलच्या निवडणूक तंत्राचा सखोल अभ्यास आणि अचूक नवी रणनीती कारणीभूत ठरली आहे. मात्र, आता खऱ्या परीक्षेला सुरुवात झाली आहे. सत्तारूढ भाजप सरकारसमोरील पहिले १०० दिवस अत्यंत महत्त्वाचे आणि आव्हानात्मक असणार आहेत.



कायदा आणि सुव्यवस्था: निवडणुकीनंतर होणारा हिंसाचार थांबवणे आणि राज्यात शांतता प्रस्थापित करणे हे सरकारपुढील पहिले उद्दिष्ट असावे लागेल. गेल्या निवडणुकीनंतर झालेल्या हिंसाचारात अनेक कार्यकर्त्यांना जीव गमवावा लागला होता. त्यामुळे प्रशासनावर पकड मिळवून गुन्हेगारांवर वचक बसवणे आणि राज्यात कायद्याचे राज्य पुन्हा प्रस्थापित करणे अनिवार्य आहे.

प्रशासकीय फेररचना: प्रशासकीय यंत्रणेमध्ये खोलवर रुजलेली 'तृणमूलची साखळी' मोडून काढणे हे सर्वात मोठे आव्हान असेल. निष्पक्ष प्रशासन चालवण्यासाठी सरकारी यंत्रणेचे राजकीयीकरण थांबवावे लागेल. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिलेल्या आश्वासनानुसार, बेकायदेशीर घुसखोरी रोखण्यासाठी तातडीने कठोर पावले उचलणे आणि नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) लागू करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित आहे.

आर्थिक स्थिती आणि विकास: राज्याच्या रिक्त तिजोरीची स्थिती सुधारणे हे कठीण काम आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना थकीत महागाई भत्ता देण्याचे आश्वासन पूर्ण करावे लागेल. 'डबल इंजिन' सरकारचा फायदा घेत केंद्राकडून जास्तीत जास्त निधी मिळवून प्रलंबित विकास प्रकल्प मार्गी लावणे आवश्यक आहे. विशेषतः रखडलेला मनरेगा निधी आणि १०० दिवसांच्या कामाच्या योजना नव्या स्वरूपात प्रभावीपणे राबवाव्या लागतील.


औद्योगिक पुनरुज्जीवन: सिंगूर आंदोलनामुळे टाटा मोटर्सचा नॅनो प्रकल्प राज्याबाहेर गेल्याने बंगालच्या औद्योगिक प्रतिमेला मोठा तडा गेला होता. गुंतवणूकदारांचा हरवलेला आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी 'बेंगॉल ग्लोबल बिझनेस समिट' सारख्या उपक्रमांतून मोठ्या उद्योगपतींना आकर्षित करावे लागेल. युवा पिढीसाठी रोजगार निर्मिती आणि उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण करणे, हेच या सरकारचे खरे यश ठरेल. थोडक्यात सांगायचे तर, पश्चिम बंगालमधील हे सत्तापरिवर्तन केवळ राजकीय बदल नसून ती जनतेच्या आकांक्षांची अभिव्यक्ती आहे. पहिल्या १०० दिवसांतील सरकारचे निर्णय, प्रशासकीय शिस्त आणि औद्योगिक धोरण यावरच बंगालच्या भविष्यातील विकासाची दिशा ठरेल. हिंसाचारमुक्त समाज, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात सुवेंदू अधिकारी यांचे सरकार यशस्वी ठरले, तरच खऱ्या अर्थाने 'सोनार बांग्ला'चे स्वप्न साकार होऊ शकेल. हे पहिले १०० दिवस राज्याच्या प्रगतीचा पाया रचण्यासाठी अत्यंत निर्णायक सिद्ध होतील.'

**अविनाश देशपांडे**

# आसाममध्ये भाजपाची हॅटट्रिक !

आसाम विधानसभा निवडणुकीत भाजपाने काँग्रेसचा पराभव करून आपल्या विजयाची हॅटट्रिक साधली आहे. २०१६ आणि २०२१ मधील विधानसभा निवडणुकीत सत्ता काबीज करणाऱ्या भाजपाने या खेपेस लागोपाठ तिसऱ्यांदा विजय मिळवला आहे. भाजपाच्या या प्रचंड यशाचे श्रेय प्रामुख्याने मुख्यमंत्री हिमंत विश्व शर्मा यांना द्यावे लागेल. भाजपाच्या नेतृत्वाखालील आघाडीने या खेपेस विधान सभेच्या एकूण १४० जागांपैकी १०२ जागा जिंकून, मोठे यश मिळवले. १०२ जागांपैकी ८२ जागा एकट्या भाजपने जिंकल्या आहेत तर आघाडीतील घटक पक्ष असलेल्या आसाम गण परिषद आणि बोडो पिपल्स फ्रंट यांनी प्रत्येकी १० जागा जिंकल्या आहेत. गेल्या खेपेस भाजपाच्या नेतृत्वाखालील आघाडीला ७५ जागांवर विजय मिळाला होता. त्यापैकी भाजपाला ६० जागांवर तर आसाम गण परिषदेला ९ जागांवर विजय मिळाला होता.

या खेपेस कॉंग्रेसप्रणीत आघाडीमध्ये अखिल गोगोई यांच्या रायजोर दलाचा समावेश होता मात्र परफ्यूम किंग बद्रूद्दिन अजमल यांच्या नेतृत्वाखालील ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट या पक्षाने आघाडीपासून फारकत घेऊन स्वबळावर निवडणूक लढवली होती. कॉंग्रेसप्रणीत आघाडीला या खेपेस फक्त २१ जागांवर विजय मिळाला. यापैकी १९ जागांवर कॉंग्रेस विजयी झाली तर दोन जागांवर, अखिल गोगोई यांच्या रायजोर दलाचा विजय झाला. २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीला (महाजोत) ५० जागांवर विजय मिळाला होता. त्यावेळी बद्रूद्दिन अजमल यांच्या नेतृत्वाखालील ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट हा पक्ष आघाडीत सामील होता. महाजोतने जिंकलेल्या ५० जागांपैकी २९ जागांवर कॉंग्रेसचे उमेदवार विजयी झाले होते, तर ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटला १६ जागांवर विजय मिळाला होता. या खेपेला कॉंग्रेसच्या गेल्या खेपेच्या तुलनेत १० जागा कमी झाल्या आहेत तर स्वबळावर लढणाऱ्या ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट या पक्षाला या खेपेस फक्त दोनच जागांवर विजय मिळाल्याने, त्यांच्या गेल्या खेपेच्या तुलनेत १४ जागा कमी झाल्या आहेत.




ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटची आजवरची ही सर्वात खराब कामगिरी आहे. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटचे सर्वेसर्वा बद्रूद्दिन अजमल यांचा, कॉंग्रेसचे उमेदवार रकिबूल हुसेन यांनी सुमारे दहा लाख बारा हजार इतक्या रेकॉर्ड ब्रेक मतांनी पराभव केला होता. ज्या धुब्री मतदार संघातून बद्रूद्दिन अजमल यांचा पराभव झाला, त्या मतदार संघातून अजमल हे लागोपाठ तीन वेळा विजयी झाले होते. तेंव्हा ही गोष्ट स्पष्ट झाली होती, ती म्हणजे अजमल यांच्या पक्षाला पाठिंबा देणारा आसाममधील मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात कॉंग्रेसकडे वळला आहे. त्याचा परिणाम म्हणजे या खेपेला अजमल यांच्या पक्षाला केवळ दोन जागांवरच विजय मिळाला. या उलट कॉंग्रेसचे या खेपेस जे १९ उमेदवार विजयी झाले आहेत, त्यापैकी १८ विजयी उमेदवार मुस्लिम समाजातील आहेत. कॉंग्रेसने २० मुस्लिम उमेदवार उभे केले होते, त्यापैकी १८ उमेदवार विजयी झाले याचा अर्थ, या खेपेस आसाममधील मुस्लिम समाजाने कॉंग्रेस पक्षाला एकगठ्ठा मतदान केले. भाजपला पराभूत करण्यासाठी, आसाममधील मुस्लिम समाजाने जाणीवपूर्वक कॉंग्रेसला भरभरून मतदान केले असावे. विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे या निवडणुकीत काँग्रेसने उभ्या केलेल्या ७९ बिगर मुस्लिम उमेदवारांपैकी फक्त एकच उमेदवार विजयी झाला. यावरुन या निवडणुकीत हिंदू - मुस्लिम मतांचे ध्रुवीकरण किती मोठ्या प्रमाणात झाले हे पुरेसे सिद्ध झाले आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंत विश्व शर्मा यांनी आपल्या निवडणूक प्रचारात राज्यातील विकास कामांवर जोर दिला होता. तसेच त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ज्या विविध जनकल्याणकारी योजना सुरू केल्या, त्याचा मोठा फायदा भाजपाला या निवडणुकीत झालेला दिसत आहे. कॉंग्रेसने ही निवडणूक पुरेशा गांभीर्याने घेतल्याचे जाणवले नाही. भाजपाच्या प्रचारासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा हे अनेक वेळा आसाममध्ये गेले, मात्र कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी आसाममध्ये फक्त दोनच दिवस प्रचार केला. कॉंग्रेसच्या नेतृत्वा खालील आघाडीतील रायजोर दल या घटक पक्षाचे सर्वेसर्वा अखिल गोगोई यांनी कॉंग्रेसवर टिका करताना असे म्हटले आहे की कॉंग्रेसकडे नियोजनाचा अभाव होता. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष गौरव गोगोई यांचा निवडणुकीत झालेला पराभव हा कॉंग्रेसकरता मोठाच धक्का मानावा लागेल. एवढेच नव्हे तर कॉंग्रेस पक्षाचे विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवव्रत सैकिया यांचा निवडणुकीत झालेला पराभव हा खूपच धक्कादायक आहे. आसाममध्ये या खेपेसही कॉंग्रेसला पराभव पत्करावा लागेल, असा अंदाज बऱ्याच चाचण्यांमधून व्यक्त करण्यात आला होता. मात्र इतका मोठा पराभव होईल असे वाटले नव्हते. निवडणुकीच्या तोंडावर पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष भुपेन बोरा आणि बडे नेते प्रद्युत बोरदोलोई हे कॉंग्रेसचा त्याग करून भाजपात सामील झाले. त्यामुळे पक्षाचे फार मोठे नुकसान झाले. हे दोघेही मासबेस असलेले नेते होते. या मोठ्या पराभवाने आसाम मधील कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांचे मनोबल निश्चितपणे खच्ची झाले असणार. आसाममध्ये पक्षांतर्गत संघर्ष बरेच दिवस पहायला मिळाला आहे. अशा परिस्थितीत पक्षात फूट पडू नये म्हणून पक्ष नेतृत्वाला बरीच काळजी घ्यावी लागेल. गौरव गोगोई यांचे नेतृत्व अपयशी ठरल्याचे निवडणुक निकालावरून दिसून आले आहे. अशा परिस्थितीत पक्षाला नवसंजीवनी देण्यासाठी पक्ष नेतृत्वाला संघटनेमध्ये आमुलाग्र बदल करावे लागतील.

**अभय गोखले**

# २०० कोटींच्या रस्त्याचा 'धुळधाण' प्रकल्प

## ठेकेदारांच्या मनमानीने नागरिक त्रस्त शासनाचा पैसा वा-यावर?


## यवतमाळ–जोडमोहा 37 किमी सिमेंट रस्त्याचे काम संथगती-ने,डेडलाईन जवळ तरी अवघे 10 टक्के काम पूर्ण

**जनमाध्यम** । प्रतिनिधी

**यवतमाळ** : यवतमाळ ते जोडमोहा दरम्यान उभारण्यात येत असलेला ३७ किलोमीटरचा सिमेंट रस्ता प्रकल्प सध्या दिरंगाई, निकृष्ट कामकाज आणि ठेकेदारांच्या मनमानीमुळे गंभीर वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. सुमारे २०० कोटी रुपयांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प परकीय अर्थ सहाय्यातून राबविण्यात येत असला तरी प्रत्यक्षात कामाचा वेग अत्यंत संथ असून नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहायला मिळत आहे. फिलिपिन्स स्थित आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यातून साकारल्या जाणाऱ्या या प्रकल्पाची मुदत जवळ आली असतानाही अवघे दहा टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे "हा प्रकल्प जनतेच्या सुविधेसाठी की ठेकेदारांच्या फायद्यासाठी?" असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत.

स्थानिक नागरिक आणि प्रत्यक्ष पाहणीतून समोर आलेल्या बाबींमुळे या कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नव्याने टाकण्यात आलेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्याला आवश्यक त्या प्रमाणात क्युरिंग न केल्याने अनेक ठिकाणी रस्ता उखडण्यास सुरुवात झाल्याची चर्चा आहे. पायाभरणीसाठी दर्जेदार मुरूमाऐवजी मातीचा वापर करण्यात आल्याचा आरोप होत असून काही ठिकाणी जुना डांबरी रस्ता न उखडताच त्यावर थेट सिमेंट काँक्रीटचा थर टाकण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे भविष्यात या रस्त्याची टिकाऊ क्षमता धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीतून होणाऱ्या या कामात जर निकृष्ट साहित्याचा वापर होत असेल, तर संबंधित यंत्रणा नेमकी काय पाहत होती, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

या प्रकल्पावर देखरेख ठेवण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट यंत्रणेवरही आता टीकेची झोड उठत आहे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी नियंत्रण ठेवण्याऐवजी केवळ कागदी अहवालांवर भर दिला जात असल्याची चर्चा असून त्यामुळे




ठेकेदारांना मोकळे रान मिळाल्याचा आरोप होत आहे. कामाची डेडलाईन, गुणवत्ता आणि सुरक्षेचे निकष धाब्यावर बसवले जात असताना प्रशासनाकडून प्रभावी हस्तक्षेप होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.

रस्त्याचे काम रडतखडत सुरू असल्याने परिसरात प्रचंड धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या धुळीचा सर्वाधिक फटका लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रस्त्याकाठच्या व्यापाऱ्यांना बसत आहे. श्वसनविकार, ॲलर्जी आणि डोळ्यांच्या तक्रारी वाढत असल्याचे नागरिक सांगत आहेत. धुळीमुळे दुकानांमध्ये ग्राहक फिरकत नसल्याने व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. दुसरीकडे, जड यंत्रसामग्रीच्या सततच्या हादऱ्यांमुळे अनेक घरांच्या भिंतींना तडे गेल्याच्या तक्रारीदेखील पुढे येत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी आणि सुरक्षेशी थेट खेळ सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांनी या प्रकरणात कठोर भूमिका घेतल्याची माहिती समोर आली आहे. कामातील विलंब आणि निकृष्ट दर्जाबाबत गुणवत्ता नियंत्रण अधिक कडक करण्यात आले असून संबंधित ठेकेदारांना तांत्रिक निकषांचे पालन करण्याबाबत तंबी देण्यात आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, विहित मुदतीत काम पूर्ण न करणे आणि गुणवत्तेशी तडजोड करणे या कारणांमुळे तीन ठेकेदार कंपन्यांवर तब्बल तीन कोटी रुपयांपेक्षा अधिक दंडात्मक कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. परकीय कर्जातून उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पात सुरुवातीपासूनच दिरंगाई, निकृष्ट काम आणि प्रशासनाची ढिसाळ देखरेख दिसून येत असल्याने भविष्यात या रस्त्याची अवस्था काय होणार, असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्चूनही नागरिकांना धूळ, त्रास आणि असुरक्षितता मिळत असेल, तर जबाबदार अधिकाऱ्यांवर आणि संबंधित ठेकेदार कंपन्यांवर कठोर कारवाई होणार का, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# 'मनरेगा' विहीर योजनेत भ्रष्टाचाराचा आरोप

**जनमाध्यम** । प्रतिनिधी

**पांढरकवडा** : पंचायत समिती अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'मनरेगा' विहीर योजनेत गंभीर अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष अश्विन मुरलीधर ठाकरे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी ग्रामीण विकास विभागाच्या प्रधान सचिवांना निवेदन सादर करून उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. शासनाच्या या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना विहिरी मंजूर करून सिंचन सुविधा उपलब्ध करून देणे हा असला, तरी प्रत्यक्षात काही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनानुसार, विहीर मंजुरीसाठी शेतकऱ्यांकडून १० ते १५ हजार रुपयांपर्यंत लाचेची मागणी केली जात असून, ठराविक ठेकेदारांकडूनच कामे करून घेण्यासाठी दबाव टाकला जात आहे. स्वतः काम करणाऱ्या शेतकऱ्यांना तांत्रिक कारणे पुढे करून त्रास दिला जात असल्याचेही




नमूद करण्यात आले आहे. तसेच, विहिरीचे काम पूर्ण झाल्यानंतरही मस्टर काढण्यात अडथळे निर्माण केले जात असून, अनेक प्रकरणांमध्ये मस्टर दीर्घकाळ प्रलंबित ठेवण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिणामी, अनेक शेतकऱ्यांचे 'वर्क कोड' सिस्टिममधून वगळले गेले असून ते शासनाच्या अनुदानापासून वंचित राहत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यापूर्वीही या ठिकाणी कोट्यवधी रुपयांचा घोटाळा उघडकीस आल्याचा उल्लेख करत, संबंधित प्रकरणाची तात्काळ व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच बाधित शेतकऱ्यांचे 'वर्क कोड' पुन्हा सक्रिय करून त्यांना न्याय मिळवून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# - वेचक-

## राज इंग्लिश मिडीयम स्कूलची शाश्वती वानखडे एसएससीत चमकली

**जनमाध्यम** । प्रतिनिधी



**यवतमाळ** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या एसएससी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, राज इंग्लिश मिडीयम स्कूलची विद्यार्थिनी शाश्वती विनायक वानखडे हिने 91.60 टक्के गुण मिळवत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे. तिच्या उल्लेखनीय यशामुळे शाळेसह शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शाश्वतीने पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून ते इयत्ता दहावीपर्यंतचे संपूर्ण शिक्षण राज इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये पूर्ण केले. नियमित अभ्यास, योग्य नियोजन, शिक्षकांचे मार्गदर्शन तसेच चिकाटी आणि जिद्दीच्या बळावर तिने हे यश संपादन केले. आपल्या यशाचे श्रेय तिने शाळेचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि पालकांना दिले आहे. तिच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने पालकांसमवेत तिचा सत्कार करण्यात आला तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

## आदर्श इंग्रजी माध्यम शाळेची कृतिका पवार एसएससीत उज्वल यशाची मानकरी

**जनमाध्यम** । प्रतिनिधी



**यवतमाळ** : "शिक्षण, संस्कार, सफलता" या ब्रीदवाक्याला साजेशी कामगिरी करत आदर्श इंग्रजी माध्यम शाळा, भोसा येथील विद्यार्थिनी कृतिका पवार हिने एसएससी परीक्षेत 89.20 टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. "ज्ञान - शिस्त - यश" या मूल्यांचा अंगीकार करत कृतिकाने सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर हे यश मिळविले. विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखत तिने विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. कृतिका पवार हिच्या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने तिचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, "यश आमचा अभिमान" अशी भावना व्यक्त करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.




## श्री शारदा ज्ञानपीठ माध्यमिक शाळेचा शालांत परीक्षेत १०० टक्के निकाल

**जनमाध्यम** । प्रतिनिधी

**पांढरकवडा** : येथील केशरबाई चाहल स्मृती प्रतिष्ठानद्वारे संचालित श्री शारदा ज्ञानपीठ माध्यमिक शाळेचा शालांत परीक्षेचा निकाल यंदाही उत्कृष्ट लागला असून शाळेने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेतील एकूण ७१ विद्यार्थ्यांपैकी सर्व ७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकालाची टक्केवारी १००% इतकी नोंदविण्यात आली आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे २ विद्यार्थी, ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे १२ विद्यार्थी तसेच ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे ७ विद्यार्थी आहेत. एकूण २१ विद्यार्थी प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून ५० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. शाळेतून कु. स्वरा संजय समृतवाड हिने ९१.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. चंचल गजानन राठोड हिने ९१.२० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. कृतिका मोरेश्वर शेंडे हिने ९० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजितसिंह चाहल, सचिव ॲड. कु. अनुप्रीत चाहल, मुख्याध्यापक राहुल देवतळे, शाळेचे व्यवस्थापक तनवीर शेख तसेच सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## पॉवर हाऊस परिसरातून दुचाकी चोरी

**जनमाध्यम** । प्रतिनिधी

**पांढरकवडा** : येथील बोथ मार्गावर असलेल्या पॉवर हाऊस समोरून कुणीतरी अज्ञात चोरट्याने दुचाकी पळविली. ही घटना ७ मे रोजी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. अक्षय नागोरावजी खंडारे रा. पाहपळ ता. केळापूर असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी पांढरकवडा पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# पीक विमा आणि ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचा रास्ता रोको

## मंगरूळ येथील डेक्कन साखर कारखान्यासमोर आ.बाळासाहेब मांगुळकर यांच्या नेतृत्वात आंदोलन

**जनमाध्यम** । प्रतिनिधी

**यवतमाळ** : जिल्ह्याचा पीक विमा योजनेत तातडीने समावेश करण्यात यावा तसेच डेक्कन शुगर प्रा. लि. मंगरूळ यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे थकीत ऊस बिल त्वरित अदा करावे, या प्रमुख मागण्यांसाठी गुरुवारी नागपूर–तुळजापूर महामार्गावरील मंगरूळ येथील डेक्कन साखर कारखान्यासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला असून परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

आंदोलनात शेतकरी, युवक काँग्रेस पदाधिकारी आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत शासन आणि कारखाना प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलना दरम्यान कारखान्याच्या अडेलतट्टू भूमिकेबाबत संताप व्यक्त करण्यात आला.आंदोलनकर्त्यांनी दिलेल्या



निवेदनात म्हटले आहे की, सन २०२५ मध्ये यवतमाळ जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले होते. जिल्हा ओला दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आला असतानाही शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ मिळालेला नाही. अनेक शेतकऱ्यांनी उसने पैसे घेऊन पीक विम्याचे हप्ते भरले, मात्र प्रत्यक्ष मदत मिळाली नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. तसेच डेक्कन शुगर प्रा. लि. मंगरूळ यांनी तीन ते चार महिन्यांपूर्वी ऊस खरेदी करूनही अनेक शेतकऱ्यांचे पैसे अद्याप थकीत असल्याचा आरोप करण्यात आला. पेरणी व सिंचनाचा हंगाम जवळ आला असूनही शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे न मिळाल्याने त्यांच्यात तीव्र नाराजी आहे. यावेळी रवी ढोक सभापती, कुणाल जतकर तालुकाध्यक्ष युवक काँग्रेस, सय्यद जुनेद उपसरपंच वाई, ॲड. अनिल देशमुख शहराध्यक्ष काँग्रेस यवतमाळ, अतुल राऊत तालुकाध्यक्ष, बाळू राठोड, वैभव काळे उपसरपंच, चंदू भारती, शेख अकील, सय्यद रहमान, विठ्ठल मेश्राम, अंकुश भराडे, राहुल काळे, निखिल जगताप, मोबीन शेख, गोपाल राठोड, विक्की शिवणकर, निलेश तोरकडे, प्रतीक आडे, विकास राठोड, शुभम शेंडे, सय्यद जियाउद्दीन, हेमंत औजाडे, फारुख भाई आदी उपस्थित होते.

# टिपेश्वरच्या जंगलात रिसॉर्ट राज ?

## उच्च न्यायालयाचा दणका राज्य सरकारला नोटीस

**जनमाध्यम** । प्रतिनिधी

**पांढरकवडा** : महाराष्ट्रातील महत्त्वाच्या वाघ अधिवासांपैकी एक असलेल्या टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य परिसरातील कथित बेकायदेशीर रिसॉर्ट, ॲग्रो-टुरिझम प्रकल्प आणि इको-सेंसिटिव्ह झोन (ESZ) नियमांच्या उल्लंघन प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गंभीर दखल घेत राज्य सरकार, वन विभाग आणि संबंधित रिसॉर्ट चालकांना नोटीस बजावली आहे. न्यायालयाने २४ जून २०२६ पर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. सामाजिक कार्यकर्ते अंकित नैताम यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि न्यायमूर्ती राज डी. वाकोडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. ॲड. सिद्धार्थ लोढा व ॲड. तेजल आग्रे यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली, तर राज्य सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील पी. पी. पेंडके यांनी कामकाज पाहिले. याचिकेनुसार, टिपेश्वर परिसरात आवश्यक पर्यावरणीय आणि वन परवानग्यांशिवाय अनेक रिसॉर्ट व व्यावसायिक बांधकामे उभारण्यात आली आहेत. वन विभागाला माहिती असूनही कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही बांधकामांना नोटिसा देण्यात आल्या असल्या तरी एफआयआर, पाडकाम किंवा कठोर कारवाई झालेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाघांच्या नैसर्गिक मार्गांवर वाढत्या व्यावसायिक अतिक्रमणामुळे वन्यजीवांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अलीकडेच एका रिसॉर्ट परिसरात वाघ शिरल्याची घटना घडल्याने परिस्थितीचे गांभीर्य अधोरेखित झाले आहे. "ॲग्रो टुरिझमच्या नावाखाली जंगल विकण्याचा उद्योग सुरू आहे. प्रशासनाने तात्काळ कारवाई केली नाही तर व्यापक जनआंदोलन उभारले जाईल," असा इशारा अंकित नैताम यांनी दिला आहे.

# आर्या इंटरनॅशनल स्कूल मुकूटबनचा दहावीच्या निकालात दबदबा

**जनमाध्यम** । प्रतिनिधी

**झरीजामणी** : ज्ञानदा बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था मुकूटबन संचालित आर्या इंटरनॅशनल स्कूलने दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत तालुक्यात सलग पाचव्यांदा प्रथम येण्याचा मान मिळविला. ८ मे रोजी जाहीर झालेल्या निकालात झोयापरवीन तन्वीर अहमद हिने ९५.८० टक्के गुणांसह तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर युग प्रवीण बघेले याने ९४ टक्के गुण मिळवत द्वितीय स्थान मिळविले. प्रतीक संदीप कांदसवार, गौरव प्रकाश कापनवार आणि आलेमीनजिया मुजीब शेख यांनी ९०.२० टक्के गुण मिळविले. प्रतीक कांदसवार याने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष प्राविण्य प्राप्त केले. तसेच इतर विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संचालक मंडळ, शिक्षक व पालकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# आज झरी जामणी येथे काँग्रेसचा कार्यकर्ता मेळावा

## खासदार, प्रतिभाताई धानोरकर करणार मार्गदर्शन

**जनमाध्यम** । जगदीश गोर्लेवार

**झरीजामणी** : आगामी राजकीय घडामोडी आणी संघटनात्मक बांधणीच्या पार्श्वभूमीवर झरी जामणी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने रविवार, १० मे २०२६ रोजी भव्य 'काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा सायंकाळी ५:०० वाजता टाकळी येथील संदिप बुर्रेवार यांच्या फार्म हाऊसवर संपन्न होणार असून, या माध्यमातून काँग्रेस तालुक्यात मोठे शक्ती प्रदर्शन करणार आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा क्षेत्राच्या खासदार, प्रतिभा धानोरकर राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून वणी चे माजी आमदार, वामनराव कासावार उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रफुल मानकर आणि झरी जामणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजीव कासावार यांची देखील विशेष उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्याचे मुख्य आयोजक तथा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदिप उर्फ लक्ष्मण भाऊराव बुर्रेवार यांनी कार्यकर्त्यांना एकजूट होण्याचे आवाहन केले आहे. ते म्हणाले की, काँग्रेस पक्षाची ध्येयधोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी हा मेळावा अत्यंत महत्त्वाचा आहे. परिवर्तनाची लाट निर्माण करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने आपले योगदान देणे आवश्यक आहे. तरी झरीजामणी तालुक्यातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, विविध सेलचे अध्यक्ष, प्रतिनिधी आणि निष्ठावान कार्यकर्त्यांनी या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून काँग्रेसचे हात बळकट करावेत, असे आवाहन बुर्रेवार यांनी केले आहे. या मेळाव्यात आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण रणनीती आखली जाण्याची शक्यता असल्याने संपूर्ण तालुक्याचे लक्ष याकडे लागले आहे.

# दारिद्र्यावर मात करत कार्तिके राठोड दहावीत उत्तीर्ण

**जनमाध्यम** । प्रतिनिधी



**यवतमाळ** : जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही उल्लेखनीय यश मिळवू शकतात, हे किन्ही येथील कुमार कार्तिके विजय राठोड यांनी सिद्ध करून दाखवले आहे. यवतमाळ शहरापासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर असलेल्या किन्ही गावातील महात्मा फुले माध्यमिक विद्यालयात इयत्ता दहावीत शिक्षण घेणाऱ्या कार्तिके यांनी कोणतीही खासगी ट्युशन न लावता ७६.८० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. अत्यंत गरीब परिस्थितीत शिक्षण घेत असतानाही त्यांनी अभ्यासातील सातत्य कायम ठेवले. कठोर परिश्रम, चिकाटी आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेतील शिक्षक, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# नाईक कुटुंबियांचा कोट्यवधी रुपयाच्या नगर परिषद सार्वजनिक जागेवर अतिक्रमण

## तक्रारकर्ते काँग्रेस गटनेते डॉ. मोहम्मद नदीम यांची पत्रकार परिषदेत माहिती!

**जनमाध्यम** । प्रतिनिधी

**पुसद**: नगरपरिषद हद्दीतील गांधी नगर प्रभाग क्रं.अंदाजे 5 कोटीची जागा स्वतः सौ.अनिताताई मनोहर नाईक यांनी विक्री केली. नगर परिषद हद्दीतील शेत सर्वे नंबर 132 मधील गांधी नगर ले आउट मधील रस्ता आणि खुली जागा अंदाजे 20 ते 25 कोटी किमतीची सार्वजनिक जागेवर अतिक्रमण केलेले आहे त्यातील 4 ते 5 कोटीची जागा स्वतः अनिता मनोहर नाईक यांनी बेकायदेशीर कागद पत्र तयार करून विक्री केलेली आहे अशी माहिती डॉ. मोहम्मद नदीम गटनेता काँग्रेस नगर परिषद यांनी दिनांक 8 मे 2026 रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे.

ते पुढे म्हणाले की अनिताताई मनोहरराव नाईक यांनी केलेल्या फसवणूकी बद्दलची तक्रार पोलिसांना देण्यात आलेली आहे पोलिसांकडे त्यांनी सबंधित सर्व कागदपत्रे दिलेले आहे, शासकीय पातळीवर इतर आवश्यक कागद पत्राची पाहणी करून पोलीसांनी कार्यवाही करावी अशी मागणी केलेली आहे.

सौ.अनिता नाईक यांनी विकलेल्या



सार्वजनिक जागेवर 2023 साली तत्कालीन मुख्याधिकारी किरण सुकलवाड यांनी बांधकाम परवानगी दिलेली आहे. बांधकाम परवानगी अर्जदार यांनी सुद्धा आवश्यक कागद पत्रे सादर केलेली नसतांना परवानगी देण्यात आलेली आहे, प्रसासकीय सन 2021ते 2025 पर्यंत काळ होता तेव्हा या परवानगी बाबत माहिती मिळताच ही बाब मुखाधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिल्या नंतर सदर परवानगी अनावदानाने दिल्या गेली आहे असे लेखी स्वरूपात तत्कालीन मुख्याधिकारी यांनी दिली आहे. मुख्याधिकाऱ्याची या बेजवाबदार पणाची तक्रार सुद्धा जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या कडे केली आहे. जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणावर चौकशी सुद्धा सुरु केली आहे. नाईक कुटुंबियांनी सत्तेचा दुरुपयोग करून अतिक्रमण केलेली जागा आणि रस्ता त्वरित मोकळा करून द्यावा, आणि जागा नगर परिषदेने ताब्यात घावी. या आशयाचे निवेदन मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षा पुसद यांच्या कडे सादर केलेले आहे. सार्वजनिक जागेचे रक्षण करणे हे नगराध्यक्षाचे कर्तव्य आहे तेव्हा सार्वजनिक रस्ता आणि कोट्यावधी रुपयाची सार्वजनिक जागा त्वरित नगर परिषदेने घ्यावी असे आवाहन डॉ. मोहम्मद नदीम यांनी केले आहे. अतिक्रमण करणारे त्यांच्याच कुटुंबियांतील असल्याने त्यांना जागा रिकामी करून घेणे अडचणीचे होणार नाही आणि ते लवकरच जागा नगर परिषदेच्या ताब्यात घेतील असे एक पत्रकाराच्या प्रश्नला उत्तर देताना डॉ. मोहमद नदीम यांनी सांगितले. 30 ते 35 कोटीची सार्वजनिक मलमत्ता आहे या कडे नगर परिषदेने गंभीर लक्ष द्यावे व प्रशासनाने जागा ताबडतोब ताब्यात घ्यावी असे आवाहन डॉ. मोहम्मद नदीम यांनी केले. या वेळी पत्रकार परिषदेत शहराध्यक्ष झिया शेख, नगरसेवक ॲड. वसीम अहेमद,नगरसेवक जब्बार लाखे, तहेसीन अहेमद, मसूद मिर्झा, गाझी ओसामा, इर्शाद कुरेशी, फिरोज खान इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयातील आरोग्य व्यवस्था कोलमडली

## सक्षमचा कंत्राट संपल्यामुळे ४४ कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवा समाप्तीचे दिले पत्र

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय मध्ये सक्षम फॅसिलिटी सर्व्हिस कंपनी कडून गेल्या ४-५ वर्षापासून ४४ कर्मचारी विविध पदावर कार्यरत आहे.गेल्या ६ मे रोजी सक्षम कंपनी कडून अकोला मंडळांचे उपसंचालक यांना दिलेल्या पत्राद्वारे नियुक्त कंत्राटी ४४ कर्मचाऱ्यांना सेवा बंद करण्याचे निर्देश दिले.यानंतर त्या ४४ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांची भेट घेतली.

यावेळी त्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली.आणि राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याशी मोबाईल द्वारे आ.



प्रवीण तायडे यांनी संपर्क साधला.आणि याबाबत संपूर्ण माहिती देत आगामी काळात अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय मध्ये आरोग्य व्यवस्था कोलमडू नये यासाठी ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी केली.आणि त्या ४४ कंत्राटी कर्मचाऱ्यांना नवीन कंपनी कडे समाविष्ट करण्याचे आश्वासन राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आमदार प्रवीण तायडे यांना दिले.एकीकडे अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय मध्ये गेल्या ५-६ वर्षापासून टेक्निशियन, स्वीपर,परिचारिका ,कक्षसेवक आदी पदावर कंत्राटी पद्धतीने ४४ कर्मचारी कार्यरत आहे .यामुळे जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय मध्ये मेळघाट सह अचलपूर व विविध भागातून रुग्ण मोठ्या प्रमाणात येतात.यामुळे ते ४४ कंत्राटी कर्मचारी आपआपली जबाबदारी पार पाडत असताना सक्षम कंपनी कडून आलेल्या या पत्रामुळे त्या ४४ कर्मचाऱ्यांना मोठा धक्का बसला.सेवा बंद चे आदेश या ४४ कर्मचाऱ्यांना सक्षम कंपनी चा पत्राद्वारे मिळाल्याने आज ७ मे रोजी आमच्या प्रतिनिधीने अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय ची पाहणी केली . यामध्ये त्या ४४ कंत्राटी कर्मचाऱ्यां अभावी आरोग्य व्यवस्था कोलमडल्याचे चित्र आहे .यासंदर्भात कोणता निर्णय शासन स्तरावरून लेखी स्वरूपात घेतला जाणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.यावेळी सामाजिक कार्यकर्ते गजानन फिसके,कंत्राटी कर्मचारी ऋषिकेश उन्हाळे,शुभम घरडे,अक्षय बुंदेले,मृणाल सोनार,संदीप चव्हाण आदी कंत्राटी कर्मचारी उपस्थित होत.

अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय चे वैद्यकीय अधीक्षक गावंडे यांच्याशी या संदर्भात आमच्या प्रतिनिधीने प्रतिक्रिया घेण्याचा मोबाईल द्वारे संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.

या संदर्भात राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि अमरावती जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मोबाईलद्वारे संपर्क साधून या प्रकाराची माहिती दिली आणि अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय मध्ये आरोग्य व्यवस्था विस्कळीत होऊ नये यासाठी त्या ४४ कंत्राटी कर्मचाऱ्यांना नवीन कंपनीकडे समाविष्ट केले जाणार असल्याचे आश्वासन राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. त्या ४४ कंत्राटी कर्मचाऱ्यांचा हक्कासाठी आम्ही सदैव कटीबद्ध आहे.

**-आ.प्रवीण तायडे,** अचलपूर मतदारसंघ.

या संदर्भात कंत्राटी कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव उपसंचालक आरोग्य विभागाकडे सादर केला आहे.

**-विनोद पवार,** जिल्हा शल्यचिकित्सक अमरावती.

# आगग्रस्त भागाला आ. बच्चू कडू यांनी दिली भेट

**अचलपूर -** परतवाडा येथील लक्कड बाजार मध्ये भर उन्हाळ्यात प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीने दुकानदाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या आगीत अनेक दुकाने आणि त्यातील लाखो रुपयांचे लाकडी साहित्य जळून खाक झाल्याने दुकानदारावर आर्थिक नुकसानीचे डोंगर कोसळले आहे. या घटनेची माहिती मिळताच राज्याचे माजी



राज्यमंत्री आणि शिवसेनेचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली.आणि दुकानदारांशी संवाद साधून आढावा घेतला. यावेळी शिवसेनेचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांनी त्या दुकानांची पाहणी केली. ठोस आर्थिक पाठबळ त्या दुकानदारांना देणे आवश्यक असल्याचे विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांनी यावेळी नमूद केले.पंचनाम्यात कोणतीही त्रुटी राहू नये आणि प्रत्येक लहान-मोठ्या व्यापाऱ्याला न्याय मिळावा, अशी आग्रही भूमिका विधानपरिषद आमदार बच्चूभाऊ कडू यांनी मांडली. यावेळी अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड,माजी नगरसेवक बल्लू जवंजाळ,नगरसेवक मनोज नंदवंशी, नितीन आखुड,अंकुश जवंजाळ,विजय थावाणी,दीपक भोंगाळे, भास्कर मासोदकर,भूषण गडेकर आदी कार्यकर्ते,दुकानदार उपस्थित होते.

# जुनी धोकादायक विद्युत लाईन बदलून नवीन पोलवर सुरक्षित केबल

**अचलपूर-** शहरातील विलायतपुरा दानाखोरी परिसरात गेल्या अनेक वर्षापासून जीर्ण झालेल्या विद्युत तारांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या समस्येची गंभीर दखल घेत भाजपा ओबीसी मोर्चा चे महेश देशमुख यांनी आ.प्रवीण तायडे यांच्या कडे सातत्याने पाठपुरावा केला आणि आ.प्रवीण तायडे यांनी महावितरण विभाग अचलपूर चे अधिकारी यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली आणि त्यानंतर नवीन पोल वर सुरक्षित केबल बसविल्याने ही समस्या मार्गी लागलेली आहे. अचलपूर मतदारसंघाचे आ.प्रवीण तायडे यांच्या माध्यमातून या परिसरात जुनी धोकादायक विद्युत लाईन बदलून नवीन पोलवर सुरक्षित केबल बसविण्याचे महावितरण अचलपूर कार्यालयाकडून काम पूर्ण करण्यात आले.या कामामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# महावितरणने वर्षभरात केला ६,४२२ वीज चोरांचा पर्दाफाश

## परिमंडळ वीज चोरीमुक्त होणार-साळुंके

**अमरावती/का.प्र.**

वीज चोरी विरोधात महावितरणने कंबर कसली आहे. गेल्या वर्षभरात राबविलेल्या धडक मोहिमेत अमरावती परिमंडळात एकुण ६ हजार ४२२ वीज चोरांचा पर्दाफाश केला असून, संबंधितांवर एकूण २० कोटी ७५ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. वीज चोरीमुळे सुरळीत वीज पुरवठ्यावर परिणाम होत असल्याने परिमंडळ वीज चोरीमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यामुळे यापुढे वीज चोरी विरूद्धची मोहीम आणखी तीव्र करण्याचे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिले आहे.

**प्रत्येक महिन्याला किमान २४०० वीज चोरी पकडण्याचे उद्धिष्ठ :-** वीज चोरीला आळा घालण्यासाठी परिमंडळातील प्रत्येक विभागाला दरमहा किमान ३०० प्रकरणे उघडकीस आणण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक विभागाने दरमहा ३ कोटी रुपयांचे महसूल वीज चोरीतून



वसूल करणे अपेक्षित आहे. परिमंडळाअंतर्गत अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांत प्रत्येकी चार असे एकूण आठ विभाग कार्यरत असून, या सर्व विभागांना मिळून दरमहा २,४०० प्रकरणांवर कारवाई करावी लागणार आहे.

**२२३ भरारी पथकाच्या माध्यमातून होणार कारवाई :-** या मोहिमेसाठी परिमंडळात एकूण २२३ पथके कार्यरत करण्यात आली आहेत. यामध्ये २१० शाखा कार्यालयांची पथके, ८ विभागीय पथके, सुरक्षा व अंमलबजावणी विभागाची ३ पथके तसेच स्काडा विभागाची २ पथके यांचा समावेश आहे.

**भरारी पथकाचीही मदत घेणार :-** मोहिमेला अधिक गती देण्यासाठी इतर जिल्ह्यांतील भरारी पथकांचीही मदत घेण्यात येणार आहे. याबाबत उपसंचालक सुरक्षा व दक्षता विभाग नागपूर परिक्षेत्र यांना पत्र देवून नागपूर परिक्षेत्रातील इतर जिल्ह्यातून भरारी पथक पाठविण्याची मागणी केली आहे.

**वीज चोरी हा दंडनीय गुन्हा :-** वीज चोरी हा दंडनीय गुन्हा असून अनधिकृत वीज वापरामुळे यंत्रणेवर अतिरिक्त भार पडतो आणि परिणामी वीज पुरवठ्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे नागरिकांनी वीज चोरी टाळावी तसेच कारवाईसाठी आलेल्या पथकांना सहकार्य करावे. मोहिमेत अडथळा आणणाऱ्यांविरोधातही गुन्हा दाखल करण्यात येईल, असे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिले आहे.

## चिखलदरा तालुक्यातील विकासकामांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

# मडकी येथे पर्यटन विकासासह जलसंधारणावर भर

**अमरावती/का.प्र.**

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी चिखलदरा तालुक्यातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. नुकत्याच झालेल्या दौऱ्यादरम्यान त्यांनी सुरू असलेल्या कामांचा दर्जा तपासून सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. मडकी (ता. चिखलदरा) येथे जिल्हा वार्षिक योजना आदिवासी उपाययोजना अंतर्गत सुरू असलेल्या सिमेंट नाला बांधकामाची पाहणी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केली. यावेळी त्यांनी जलजीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या विहीर व पाण्याच्या टाकीची तसेच अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनांची सविस्तर माहिती घेतली. मडकी येथील भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक सरपंच व ग्रामस्थांशी संवाद साधताना महत्त्वपूर्ण सूचना



दिल्या. जलसंधारणाची कामे केवळ पाणी साठवण्यापुरती मर्यादित न ठेवता, त्यांचा उपयोग पर्यटन वाढीसाठी आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी करावा, जेणेकरून पर्यटकांना आकर्षित करून स्थानिक रोजगार वाढवता येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

तसेच यावेळी मौजे कोहाणा येथे मृद व जलसंधारण विभागामार्फत सुरू असलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या (K.T. Weir) कामाचीही पाहणी करण्यात आली. हे काम तांत्रिक निकषांनुसार आणि दर्जेदार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले की, सर्व विकासकामे ही नियोजनबद्ध आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन असावीत. जलसंधारणाच्या दर्जेदार कामांमुळे भूजल पातळीत वाढ होऊन त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना सिंचनासाठी होईल. पाणीटंचाई दूर करण्यासोबतच ही ठिकाणे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाल्यास परिसराचा आर्थिक कायापालट होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या पाहणी दौऱ्यात जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, अभियंता व कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात जलसंधारणाच्या कामांना गती

## ५९७ कामांना प्रशासकीय मान्यता

**अमरावती-** पाणी टंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी आणि जिल्ह्याची सिंचन क्षमता वाढवण्यासाठी राज्य शासनाच्या निर्णयानुसार 'जलयुक्त शिवार अभियान २.०' अमरावती जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पावसाचे पाणी अडवणे, भूजल पातळी वाढवणे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आणि जमिनीचा पोत सुधारणे या त्रिसूत्रीवर भर देण्यात येत असून या उन्हाळ्यात विविध यंत्रणांमार्फत मोठ्या प्रमाणावर कामांचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष निधीतून जिल्ह्यातील विविध यंत्रणांना ५९७ कामांसाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यामध्ये भूजल सर्वेक्षण यंत्रणेमार्फत ६०३ कामांसाठी ५ कोटी १५ लाख रुपये, मृद व जलसंधारण विभाग (जिल्हा परिषद) अंतर्गत ११ कामांसाठी १ कोटी ६९ लाख रुपये, तर मध्यम व लघु पाटबंधारे विभाग अचलपूर अंतर्गत ४ कामांसाठी १ कोटी २८ लाख रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यावर्षी अभियानाला अतिरिक्त प्रोत्साहन देऊन जास्तीत जास्त कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. पाणी साठवणुकीच्या नवीन सुविधा निर्माण झाल्यामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होणार असून, याचा थेट फायदा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढवण्यासाठी होणार आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी अमरावती जिल्हा प्रशासन आणि संबंधित विभाग पूर्ण तत्परतेने हे अभियान राबवित आहेत.

# शिक्षक प्रशिक्षणाच्या तारखा पुढे ढकलल्या

## राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या प्रयत्नाला यश

**अमरावती/का.प्र.**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणेचे संचालक डॉ. हेमंत कुमार वसेकर यांनी निर्गत केलेल्या पत्रानुसार इयत्ता दुसरी, तिसरी व चौथीच्या नवीन अभ्यासक्रम शिक्षक प्रशिक्षणाच्या तालुकास्तरीय तारखा जनगणनेच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी दिली आहे.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी सांगीतले.

२०२७ च्या जनगणनेसाठी कुटुंब गणनेचे काम १६ मे ते १४ जून पर्यंत केले जाणार आहे. जनगणनेच्या कामकाजासाठी राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळातील जवळपास सर्वच शिक्षकांच्या सेवा अधिग्रहित करण्यात आलेल्या आहे.

दरम्यान राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने याच कालावधी दरम्यान शिक्षकांच्या प्रशिक्षणाची नियोजन केले होते. शिक्षकांचे प्रशिक्षण हे जनगणनेच्या कालावधीत येत असल्याकारणाने शिक्षक प्रशिक्षण पुढे ढकलावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडे केली होती.

**जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून केली मागणी**

जनगणना कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या सभेमध्ये निर्णय होवून प्रशिक्षणाचा कार्यक्रम पुढे ढकलला.याबाबत राज्याच्या मुख्य प्रधान जनगणना संचालकांकडे सुद्धा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने पत्र देऊन आणि राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे जनगणनेच्या कालावधीतील प्रशिक्षण पुढे ढकलण्याबाबत मागणी करण्यात आली होती. या संबंधाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणेचे अधिकारी आणि राज्य जनगणना कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या सभेमध्ये निर्णय होऊन शिक्षक प्रशिक्षणाचा तालुकास्तरीय कार्यक्रम सद्यास्थितीत पुढे ढकलला.

**शिक्षण राज्यमंत्र्यांनी दिले होते निर्देश**

२९ एप्रिल रोजी मंत्रालयात शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचे अध्यक्षतेत झालेल्या बैठकीत सुद्धा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी जनगणनेच्या कालावधीतील नवीन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण आणि वरिष्ठ निवड समितीचे प्रशिक्षण पुढे ढकलण्याची मागणी केली होती.

राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी याबाबत शिक्षण विभागाला प्रशिक्षण कार्यक्रमात बदल करण्याची निर्देश दिले होते.

## संक्षिप्त



### नवीन प्रार्थना मंदिराचा लोकार्पण सोहळा उत्साहात

**तिवसा-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत दापोरी खुर्द येथे ग्रामजयंतीचे औचित्य साधून नवनिर्मित प्रार्थना मंदिराचा उद्घाटन सोहळा ३० एप्रिल २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. सर्वधर्मीय प्रतीकांचा आणि 'श्रीगुरुदेव की जय'चा जयघोष करत या सोहळ्याने ग्रामस्थांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण केले.कार्यक्रमाचे उद्घाटन भूवैकुंठ गुरुकुल, गुरुकुंज मोझरी येथील संचालक रविदादा मानव यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून भूवैकुंठ गुरुकुलच्या संचालिका छायाताई रवी मानव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार मंचाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अमर वानखडे आणि स्मिता अमर वानखडे उपस्थित होते. ग्रामस्थांची मोठी उपस्थिती या सोहळ्याला दापोरी खुर्द व परिसरातील गुरुदेव प्रेमींनी आणि ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हनुमान मंदिर समिती आणि श्री गुरुदेव सेवा मंडळ, दापोरी खुर्दच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शन आणि राष्ट्रवंदनेने करण्यात आली.

### महाराणा प्रताप यांची शौर्यगाथा नवपिढीने अभ्यासा-प्रमोद पोकळे

**तिवसा-** अत्यंत अवघड परिस्थितीत शत्रूंच्या आक्रमणांना झुंज देत मातृभूमीवर निस्सीम प्रेम करणारे मेवाडचे राजे, महाराणा प्रतापसिंह यांचे संपूर्ण जीवन म्हणजे संघर्ष, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे ज्वलंत व प्रेरणादायी उदाहरण असून त्यांच्या जीवनातील धैर्य, चिकाटी, आत्मविश्वासाचा संदेश आजच्या आधुनिक युगातील लहानसहान अडचणींना खचून जाणाऱ्या नवपिढीने अभ्यासावा, असे कथन सुसंस्कार शिबिरातील शिबिरार्थ्यांशी संवाद साधताना दूरदर्शन व आकाशवाणी लोक-कलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी केले. तालुक्यातील गुरुकुंज-मोझरी लगतच्या दासटेकडी येथील राष्ट्रसंत अध्यात्म केंद्रात सुरू असलेल्या सर्वांगीण सुसंस्कार शिबिरात 'ओळख सुंदर जीवनाची' या विषयांतर्गत शिबिरार्थ्यांशी संवाद साधताना पोकळे गुरुजी बोलत होते. राष्ट्रप्रेम यांच्या शौर्यगाथेची शिकवण जाणीवपूर्वक ध्यानात घ्यावी, असेही पोकळे गुरुजी म्हणाले. सुमारे २१ दिवसपर्यंत चालणाऱ्या या शिबिरात विदर्भातील १०३ विद्यार्थी पहाटे ४:३० ते रात्री ९:३० पर्यंतच्या आदर्श दिनचर्येत सुसंस्कारांचे आदर्श धडे प्रशिक्षित व सेवाभावी शिक्षकांकडून घेत आहेत. संपूर्ण लोकसहकार्यावर चालविल्या जाणाऱ्या या शिबिरात आचार्य हरिभाऊ वेरूळकर गुरुजींच्या नेतृत्वाखाली शिबिराचे यशस्वीतेसाठी शिक्षक रवींद्र ढवळे, रुपेश मोरे, कुणाल खडसे, मयुर इंगळे, सागर मेहकरे, देवागुरू जांभुळे, गणेश दरवरे, नयन प-हाड, पुष्कर गुडधे, कुलदीप बोधाने, चेतन पारधी, कुंदन गुडधे, छगन मोरे तर व्यवस्थापनाची जबाबदारी रवींद्र वानखडे सांभाळत आहेत.

# आज व्हीसीएतर्फे 'बॉलर्स की खोज' ट्रायल्स

## श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रिकेट मैदानावर सकाळी ८ वाजता होणार निवड चाचणी

**अमरावती-** विदर्भ क्रिकेट असोसिएशन (व्हीसीए) तर्फे विदर्भातील जिल्हा शहरांमध्ये राबविण्यात येणाऱ्या 'बॉलर्स की खोज' या अभिनव प्रकल्पांतर्गत अमरावती येथे खुल्या निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात आले आहे. १० मे २०२६ रोजी सकाळी ८ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रिकेट मैदानावर या ट्रायल्स पार पडणार असून, प्रतिभावान गोलंदाजांचा शोध घेऊन त्यांना प्रोत्साहन व प्रशिक्षण देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. विशेष म्हणजे ही निवड चाचणी पूर्णतः निःशुल्क आहे.ही संपूर्ण मोहीम आगामी विदर्भ प्रीमियर लीग (व्हीपीएल) सीझन २ च्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात येत आहे. माजी भारतीय क्रिकेटपटू तसेच व्हीपीएल गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. प्रशांत वैद्य, बीसीसीआयच्या माजी निवड समितीचे अध्यक्ष चेतन शर्मा, माजी राष्ट्रीय निवडकर्ता सुब्रतो बॅनर्जी तसेच व्हीसीएच्या वरिष्ठ, कनिष्ठ व महिला निवड समित्यांचे सदस्य या ट्रायल्सवर देखरेख करणार आहेत. मुले व मुली अशा दोन्ही गटांतील इच्छुक गोलंदाजांना आपली गुणवत्ता सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पुरुष गटासाठी वयोमर्यादा १६ ते २५ वर्षे तर महिला गटासाठी १५ ते २३ वर्षे ठेवण्यात आली आहे. निवड झालेल्या खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण शिबिरासाठी आमंत्रित करण्यात येणार असून, त्यांना विशेष प्रशिक्षकांकडून कोचिंग, फिटनेस मार्गदर्शन तसेच वरिष्ठ व्यावसायिकांचे मार्गदर्शन मिळणार आहे. अंतिम निवड झालेल्या गोलंदाजांना १ ते १५ जून २०२६ दरम्यान होणाऱ्या व्हीपीएल सीझन २ मध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.ट्रायल्ससाठी सहभागी खेळाडूंनी पांढऱ्या रंगाचा क्रिकेट गणवेश तसेच वैध वयाचा पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सर्व इच्छुक गोलंदाजांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन व्हीसीए जिल्हा समिती अध्यक्ष नितेश उपाध्याय, अमरावती जिल्हा क्रिकेट संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे तसेच व्हीसीए जिल्हा संयोजक डॉ. दीनानाथ नवाथे यांनी केले आहे.

# श्री चंद्रशेखर उर्फ चंदूभाऊ देशमुख यांचे निधन



**अमरावती-** मराठा फ्रेन्डस् क्लबचे माजी सचिव, काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी अध्यक्ष, क्रीडाक्षेत्रात भरीव योगदान देणारे, उत्कृष्ट मंच संचलक चंद्रशेखर उर्फ चंदु भाऊ देशमुख (CP) यांचे ९ मे रोजी सकाळी निधन झाले असुन त्यांची अंत्ययात्रा दुपारी ठिक ४.०० वाजता त्यांचे राहते घरून- (प्रेरणा कॉलनी ८/० राधा नगर) येथुन निघाली. त्यांच्यावर हिंदू स्मशानभूमी येथे अंत्य संस्कार करण्यात आले.

# माझ्या आठवणीतले स्व.प्रकाशदादा....

स्व. प्रकाशदादा सन २००९ मध्ये आमदार झाले. त्याच दरम्यान मी कारंजा लाड येथे वन विभागात रुजू झालो. कारंजा शहराच्या मध्यभागी वनविभागाची अंदाजीत २ ते ३ हजार कोटी रुपये किंमत असलेली २५० एकर जमिन वर्षानुवर्षांपासून पडून होती. भविष्यात अतिक्रमण किंवा इतर कारणाने गिळंकृत होण्याची दाट शक्यता असल्यामुळे कारंजा शहराकरीता एक सुंदर वनपर्यटन केंद्र निर्माण करण्याची संकल्पना मनामध्ये रुजली. स्व. प्रकाश दादा यांची त्वरीत भेट घेऊन प्रकल्प निर्माण करण्याबाबत कल्पना मांडली. दादांनी अत्यंत आनंदाने प्रस्ताव मान्य करुन तात्काळ निधी उपलब्ध करुन दिला. वनपर्यटन प्रकल्पाचे दादाच्या शुभहस्ते २०१० मध्ये भुमीपुजन करुन कामास वेगाने सुरुवात केली. केवळ ३ वर्षात प्रकल्प पूर्ण करुन प्रकाशदादा यांच्याच शुभहस्ते लोकार्पण करण्यात आले.कारंजा येथील वनपर्यटन केंद्र राज्यातील पहीला एक नाविण्यपूर्ण यशस्वी प्रयोग ठरला.

निवृत्तीनंतर मी अमरावतीला स्थायीक झालो. १० मे २०२१ ला दादांच्या निधनाची अत्यंत दुःखद बातमी कळली. कोरोना असल्यामुळे इच्छा असूनही अत्यंसंस्काला जाऊ शकत नव्हतो. प्रकल्पाच्या संपूर्ण कामाला फक्त प्रकाश दादांनीच निधी उपलब्ध करुन दिल्याने प्रकाश दादांचे कायमस्वरुपी



वनपर्यटन लोकार्पण प्रसंगी स्व.प्रकाश दादांचे स्वागत करताना वनाधिकारी अशोक कविटकर.

नाव राहावे हा विचार मनात आला. दादांच्या अंत्यसंस्काराला ना. दिलीप वळसे पाटील साहेब नक्कीच येणार याची जाणीव मला होती. त्यामुळे कारंजा वनपर्यटनाला स्व. प्रकाशदादांचे नाव देण्यासंबधीचे निवेदन अमरावतीला तात्काळ तयार करुन कारंजातील प्रतिष्ठीत नागरीकांच्या सहया घेऊन निवेदन कारंजा येथे ना. दिलीप वळसे पाटील साहेबांना सादर केले. ना. दिलीप वळसे पाटील साहेबांनी स्वतः वैयक्तीक लक्ष घालून शासनाकडून तात्काळ प्रस्ताव मंजूर करुन घेतला.

वनपर्यटन केंद्र निर्माण करण्याकरीता लोकमतचे तालुका प्रतिनिधी स्व. दिवाकरराव इंगोले, विवेक चांदूरकर, निलेशजी हेडा, डी.एफ.ओ. प्रकाश महाजन, वनपाल अशोक थोरात, स्व. दिनेश हरणे व गजानन थेर यांनी भरीव सहकार्य केले. मागील १२ वर्षापासून परीसरातील विद्यार्थी, जेष्ठ नागरीक हजारोच्या संख्येने दररोज पर्यटन केंद्राचा आनंद घेत आहे.

स्व. प्रकाशदादा आज जरी आपल्यात नसले तरी स्व. प्रकाश दादा निसर्ग पर्यटन केंद्राच्या रुपाने आपणास प्रकाश दादांची सदैव आठवण देत राहील, यात कुठलीही शंका नाही. स्व. प्रकाश दादांना पाचव्या पुण्यस्मरणार्थ भावपुर्ण श्रध्दांजली.

**अशोक कविटकर**
वनअधिकारी (निवृत्त) ह.
मुक्कामः अमेरिका (टेक्सास)
व्हॉटसअॅप नं.
९४२३१२५१३५

# निस्वार्थी प्रेम, निस्वार्थी माया म्हणजे आई

ज्यांना ज्यांच्या कामासाठी, योगादानासाठी कायम दुर्लक्ष केले जाते, अशा मातांचा सन्मान आणि गौरव करणारा दिवस म्हणजे 'मदर्स डे.'असला की, तिच्या कर्तृत्वाचा आणि तिच्या निस्वार्थी योगदानाचा हा उत्सव साजरा करण्याचा हा दिवस. या दिवशी तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचाही दिवस. मराठीत फ. मु. शिंदे नावाच्या कवीने आपल्या आई कवितेत आईचं ममत्व सांगताना, म्हटलं आहे आई एक नाव असतं, घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं. या दोनच ओळीतून त्यांनी आईचं ममत्व आणि महत्व सांगितलं आहे. आई म्हणजे जगातील एक सर्वश्रेष्ठ असं नातं आहे, ज्या नात्याची तुलना कशाबरोबरही केली जाऊ शकत नाही.



निस्सीम प्रेमाच्या, मायेच्या आईसाठीच मानवी नातेसंबंधातील आणि जगातील वेगळ्या नात्यातील एक नातं माझं आईचं. आई आणि मुलांचं नात्याचे बंध म्हणजे अमूल्य प्रेमाची ठेव. आणि हीच ठेव ती आपल्या मुलांमध्ये आणि आपल्यामध्ये ठेवत असते. आईची माया, प्रेम तिच्या मुलांच्यावरील मायेची तुलना जगातील कुठल्याच, कोणत्याच गोष्टीशी होऊ शकत नाही. आईच्या पोटी एकदा मुलं जन्माला आलं की, मग तिचं सगळं आयुष्य मुलासाठीच देऊन टाकते, तेही कोणताही स्वार्थ न ठेवता. या अशा निस्सीम प्रेमाच्या, मायेच्या आईसाठीच, तिचा गौरव करण्यासाठीच जगभरात साजरा केला जातो तो म्हणजे मदर्स डे.आपल्या आईविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी म्हणून मातृदिन अख्या जगात साजरा केला जातो. मात्र सगळ्या जगात एकाच दिवसात मातृदिन साजरा केला जातो असं नाही. कधी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी साजरा करतात. भारतात मात्र या वर्षी ८ मे रोजी मदर्स डे साजरा केला जात आहे. जगातील प्रत्येक मुलाला हा डे विशेष असतो. कारण आताच्या सगळीच मुलं या दिवशी आपल्या आईचा गौरव, आणि सन्मान तर याच दिवशी करतात. इतर दिवशी त्यांच्या कामाकडे, त्यांच्या कष्टाकडे, त्यांच्या योगदानाकडे दुर्लक्ष केले जात असले तरी आजच्या दिवशी मात्र आईसाठी त्यांची मुलं आनंदाचा महोत्सवच साजरा करतात.भारतीय संस्कृतीत मातांना नेहमीच अनन्यसाधारण असे स्थान मिळाले आहे. तरी, मातृदिन साजरा करण्याची कल्पना मात्र १९ व्या दशकाच्या प्रारंभी मांडण्यात आली.

मदर्स डे पहिल्यांदा १९०८ मध्ये मदर्स डेबद्दल मिळालेल्या माहितीबद्दल असे सांगितले जाते की, मदर्स डे पहिल्यांदा १९०८ मध्ये युनायटेड स्टेट्समधील अॅना जार्विस नावाच्या महिलेने तिच्या आईच्या सन्मानार्थ साजरा केला होता. जिचे तीन वर्षांपूर्वी निधन झाले होते. अॅनाने चालू केलेली ही परंपरा युनायटेड स्टेट्समधील अनेक भागांमध्ये करण्यास सुरुवात केली. त्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी या दिवसाबद्दल १९१४ मध्ये या कार्यक्रमाला राष्ट्रीय सुट्टी जाहीर केली होती.प्रत्येक मुलाची इच्छा आपल्या आईसाठी एक दिवस तरी काढावा, तिला आनंदात ठेवावे, तिला हॉटेलमधील जेवूखाऊ घालावे अशी आता प्रत्येक मुलाची इच्छा असते. मदर्स डे निमित्त मात्र आईसाठी भेटवस्तू देणे, आणखी भेट देऊन तिला खूश करणे, आनंदी करणे असं प्रत्येक आईच्या मुलाला वाटत असते.

**महादेव कांबळे**

# आई म्हणजे प्रेमसागर

आई म्हणजे प्रेम, माया, वात्सल्याचा सागर आहे. आईच्या उपकारांची महती अपार आहे. तिच्या उपकारांची परतफेड कुणीच करू शकत नाही, हे माहीत असूनही आईविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संपूर्ण जगात मातृ दिन साजरा केला जातो. फूल ना फुलाची पाकळी म्हणून काही भेटवस्तू देत आईच्या उपकारांची परतफेड करण्याचा हा केवीलवाणा प्रयत्न म्हणजे जागतिक मातृ दिन होय.

मे महिन्याचा दुसरा रविवार हा पाश्चिमात्य देशात मदर्स डे म्हणून साजरा केला जातो. मातृ दिनाचा इतिहास खूप प्राचीन आहे. १६ व्या शतकापासून इंग्लडमध्ये एक मोठा समुदाय प्रभू येशूची आई मदर मेरीचा सन्मान करत असे. अमेरिकेचे राष्ट्रपती वूडरो विल्सन यांनी १९१४ मध्ये मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मदर्स डे साजरा करण्याचे जाहीर केले. तेव्हापासून अमेरिकेत मातृ दिन साजरा केला जात आहे. अमेरिकेत साजरा करणारा मदर्स डे हल्ली सर्वत्र साजरा केला जात आहे. मातेला प्रणाम करण्याचा, तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणाचा हा दिवस. मात्र,आईवरचे प्रेम व्यक्त करणासाठी एक दिवस पुरेसा आहे का? भारतीय संस्कृतीत आई ही संकल्पनाच अशी आहे की, तिच्यासाठी एखादा दिवस साजरा करणे ही औपचारिकताच ठरेल. शिवाय ही संकल्पना इतकी व्यापक आहे की, ती आपण मोजमाप करता येत नाही. भारतीय संस्कृतीत आईला ईश्वराचे रूप



मानले आहे. कोणतेही कार्य करण्याच्या आधी सर्वप्रथम आईचा आशीर्वाद घेतला जातो. आई ही हृदयातून आलेली प्रेमळ साद आहे.तिच्या पदराखाली वाटणारी सुरक्षिता दुसरीकडे कुठेही मिळत नाही. ममता, माया आणि खरा आपलेपणाचा चिरंतन ओलावा, अनेक समस्यांवरचा एकच उपाय आई होय. रडणारे बाळ आईकडे दिले की लगेच शांत होते. बाळाला हाताला धरून चालायला शिकवणारी आईच जन्म घेणाऱ्या प्रत्येकाची पहिली गुरू असते. तीच मुलांना लहानाचे मोठे करून त्यांच्यावर संस्कार करते. मुलांच्या सर्व चुकांवर पांघरूण घालणारी आईच असते. मुलांना जिवापार जपणारी, सुख-दु:खांत पाठीशी उभी असते ती फक्त आई. आई आपल्या श्वासात वास करत असते. दूर असली तरी मुलांच्याच काळजीत अललेलं एक नातं म्हणजे आई.आई सकाळी उठल्यापासून आपल्या पिलांसाठी राबत असते. एक वेळेस स्वत: उपाशी राहील; पण आपल्या पिलांना पोटभर खाऊ खातल्याशिवाय तिला चैन पडत नाही. मुलांना काय हवे, काय नको याची काळजी घेणारी ती असते. स्वत: जळत दुसऱ्यांना प्रकाशात ठेवण्याचे काम ती करते. व्यक्तिमत्त्व घडवणाऱ्या आईचे ऋण आपण कधीच फेडू शकत नाही; परंतु नवकाळात आता आई म्हणणारे फार कमी आहेत. आईची जागा आता मम्मीने घेतली आहे. आई या शब्दात जितके प्रेम आहे, ते मम्मी या शब्दात असेलच असे नाही. कितीही आधुनिकीकरण झाले, तरी जगात आईची प्रतिमा कधी न बदलणारी आहे.

## आई



आई या जगी असे एक
न संपणारी किमयाई

तीची अमृततुल्य महती
शब्दात न बांधल्या जाई

तिला वर्णिन्या फिकी पडते
आकाशाची अथांग निळाई

तिला विस्तृत करण्यास
थीटी पडते सागर गहराई

अशांत मना शांत करण्या
ती तरल, सुखद अंगाई

घर उजळण्या अंधारातही
ती दिव्य नंदादीप होई

प्रेम, वात्सल्य, करुणेची
ती असते गर्द वनराई

नतमस्तक होऊनी मी
विनम्र होते तिच्या ठाई

**राजश्री खाजोने**
चांदूर बाजार, जि.अमरावती
९६६५६८०६३९

# आईविना जग नाही;वडीलांविना आधार नाही!

प्रेम व निस्वार्थ मायेचा वटवृक्ष म्हणजेच माय! आईचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारला मातृदिन (मदर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी मातृदिन १० मे २०२६ रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते.या जगात माय-बापा शिवाय कोणीही मोठा नाही. आई-वडील,माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही. कारण आई-वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी व जीवजंतू या शब्दाशी निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती, संस्कार, संस्कृती, जडणघडण,रहनसहण, खानपान सर्वत्र दिसून येते.ज्याप्रमाणे आई - वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची(मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात.ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही हेही तितकेच सत्य आहे.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते. आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई-वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.आईचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजे.परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी मातृदिनला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात यात यत्किंचितही फरक नाही.फक्त जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात त्यामुळे मुल-मुली यांच्या केसालाही धक्का लागणार नाही याची काळजी नेहमी घेऊन तत्परता दाखवित असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात १९०८ साली अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली व अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत.मातृत्व दिन (मदर डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन(फादर डे)साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला सुध्दा तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी,आत्या इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी-पप्पा



अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे आई-वडिलांच नात. वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते पदोपदी मुलांची काळजी घेऊन जोपासना करते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल आईला कळत-नकळत कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की आकाश पाताळ एक करते.परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यानंतरच जेवण करीत असते. आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न-भूतो- न- भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक-तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते.कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच आहे त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे 'आई विना जग नाही आणि वडीलां विना आधार नाही'आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणी-ना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात.म्हणजेच वडील तीथे नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक मातृदिन दीसुन येईल.माझ्यामते मातृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा?दररोज साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई- वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.मातृदिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृतीच जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व अॅटी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी, आजोबा,काका, काकु,मामा,मामी, मावशी,आत्या इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे.त्यामुळे अंकल-अॅन्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे.त्याचबरोबल मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मानच अवश्य होईल असे मला वाटते.सध्याच्या काळात काही मुल-मुली आई-वडिलांची सेवा करण्यास असमर्थ दिसून येतात अशा परिस्थितीत आई-वडिलांना वृध्दाश्रमाच्या खाईत लोटतात हेही आई-वडिलांच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल.परंतु असे व्हायला नको असे मला वाटते.आई या शब्दाला इतके महत्त्व आहे की,' स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी'यावरून आपण समजू शकतो की आई या शब्दात किती मोठी अफाट माया व शक्ती आहे.आपण १० मे ला मातृदिन (मदर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने दिवसेंदिवस हवामानात बदल होत आहे.याकरीता जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.

**रमेश लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९,

# ...थोडक्यात...

## सनदी लेखापालांनी वितरित केलेत पशु पक्षी पात्र



**अकोला :** इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया स्थानीय शाखेच्या वतीने विशेष कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला अकोला विकासाचे चेअरमन सीए धीरज चांडक तसेच चीफ कोऑर्डिनेटर सीए कुशल गोयनका यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमात मॅनेजमेंट कमिटी सदस्य आर्यन तारापुरे, वंश माहेश्वरी, देवांश कासट,तन्वी राखडे, युग जैन, जानवी कारिया,रोहित कृपलानी उपस्थित होते.त्यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम पार पडला.या निमित्ताने भीषण गर्मीत पशु-पक्ष्यांच्या दाणा -पाणी साठी पात्र उपलब्ध व्हावे यासाठी हे पात्र वितरित करण्यात आलेत. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षण व प्राणीमात्राप्रती संवेदनशीलता जपण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळला.

## जानकीबाई चौधरी डिजिटल इंग्लिश स्कूलचा निकाल



**अकोला :** दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचलित जानकीबाई चौधरी डिजिटल इंग्लिश स्कूल चा दहावी परीक्षेचा निकाल ९६.१० टक्के लागला आहे. सदर शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम स्थान तनु कुलकर्णी हिने पटकावले असून तिला ९०.४० टक्के गुण मिळालेत. द्वितीय स्थान गगन राठी ८९ टक्के व तृतीय साहिल साबळे ने ७१.८० टक्के गुण प्राप्त केले आहे. अशाच पद्धतीने शाळेच्या इतर विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे बीजीई सोसायटी अकोला चे अध्यक्ष अँड. मोतीसिंह मोहता,सचिव डॉ.पवन माहेश्वरी, डॉ. नानासाहेब चौधरी,सौ देवयानी चौधरी, व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य व शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अश्विनी देशपांडे यांनी अभिनंदन केले.

## कोठारी कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांनी राखली विजयाची परंपरा कायम, शाळेचा १०० टक्के निकाल

**अकोला :** माध्यमिक शालांत परीक्षा,एस एस सी मार्च २०२६ च्या निकालात १०० टक्के उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखत यंदाही श्री. ब्रिजलाल बियाणी विद्यानिकेतन व्दारा संचालित निशू नर्सरी आणि कोठारी कॉन्व्हेंटने भरघोस यश प्राप्त केले आहे.शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजली वडे यांच्या मार्गदर्शनात चालत असलेल्या कोठारी कॉन्हेंटच्या दहावीची परिक्षा दिलेल्या ८५ विद्यार्थ्यांपैकी ४८ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त करुन विशेष प्राविण्य यादीत येण्याचा बहुमान पटकावला आहे तर २६ विद्यार्थ्यांना ७५ ते ९० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत ११ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.कु. स्वरा गुल्हाने हिने ९८.६० टक्के मिळवून प्रथम कमांक पटकविला, तर कु सृष्टी बियाणी हीने ९८.२० टक्के मिळवून दुसरा कमांक पटकविला तर कु. रिया टीकार हीने ९७.८० टक्के मिळवून तिसरा कमांक पटकविला तसेच कु. जान्हवी दलाल हिने ९७.२० टक्के मिळवून ४ था कमांक तर कु. जानवी बालानी, चि. उत्कर्ष भटकर, चि. अनय कचोलिया, कु. स्वरा राउत यांनी ९६.४० टक्के प्राप्त करुन ५ वा कमांक पटकविला. गणित या विषयात २ विद्यार्थ्यांनी, सायन्स या विषयात ३ विद्यार्थ्यांनी, संपूर्ण संस्कृत विषयात ८ विद्यार्थ्यांनी पैकीच्या पैकी गुण प्राप्त केले आहेत.या प्रसंगी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजली वडे आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे अभिनंदन शाळेचे अध्यक्ष कमलकिशार बाहेती, सचिव अनिल भूतडा, कार्यकारी सदस्य विजय रांदड व इतर सदस्यगण यांनी शुभेच्छा देवून कौतूक केले आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजली वडे यांनी या प्रसंगी सर्व शिक्षकवृंदाचे व विद्यार्थ्याचे त्यांच्या अथक परीश्रमांचेच हे फळ आहे या शब्दांत कौतुक व अभिनंदन केले.

## महानगरात आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस दिन उत्साहात साजरा



**अकोला :** गतिमंद,मतिमंद व दिव्यांग बालकांसाठी सातत्याने होमिओपॅथी उपचार प्रणाली द्वारे नियमितपणे शिबिरे आयोजित करून अशा वर्गाच्या सुदृढ आरोग्यासाठी रेड क्रॉस सोसायटी कटिबद्ध राहणार असल्याचे प्रतिपादन रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ किशोर मालोकार यांनी केले. स्थानीय सुभाष चौक येथील रेडक्रॉस सोसायटी कार्यालयात आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ मालोकार मार्गदर्शन करीत होते.ते पुढे म्हणाले,होमिओपॅथी मध्ये समूळ रोग उच्चाटन करणारा गुणधर्म असून अशा शिबिरात एमडी होमिओपॅथी असणारे डॉ रजत मालोकार नियमितपणे रुग्ण सेवा करणार असून अशा वर्गाच्या पालकांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. मानवतेसाठी रुग्णसेवा ही संकल्पना घेऊन वाटचाल करण्यामध्ये डॉ तज़ीन सय्यद यांच्या अध्यक्षतेत झालेल्या सभेत आता महिला होमिओपॅथ आपली उपस्थिती दर्शविणार असल्याची माहिती दिली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# २ तासांत जबरी चोरीचा छडा; आरोपी जेरबंद

## एमआयडीसी पोलिसांची धडाकेबाज कारवाई, २.३२ लाखांचा मुद्देमाल जप्त



■ प्रतिनिधी | अकोला ■

एमआयडीसी पोलिसांनी अवघ्या दोन तासांत जबरी चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावत एका आरोपीला अटक केली असून एका विधी संघर्षग्रस्त बालकालाही ताब्यात घेतले आहे. आरोपींकडून मोबाईल, चाकू व गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा तब्बल २ लाख ३२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी विक्रमकुमार सुरेश दुबे (वय ३१, रा. बिहार) हे ८ मे रोजी दुपारी येवता टी-पॉईंट परिसरात उभे असताना काळ्या रंगाच्या टीव्हीएस अपाची मोटारसायकलवर आलेल्या युवकाने त्यांना 'लेबन कंपनीकडे सोडतो' असे सांगून गाडीवर बसविले. काही अंतर गेल्यानंतर आरोपीने चाकूचा धाक दाखवत त्यांच्या खिशातील १३ हजार रुपये किमतीचा मोबाईल हिसकावून घेतला व साथीदारासह पसार झाला.

या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत गुप्त बातमीदार व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी मंगेश उत्तमराव वावगे (वय २१) याला अटक केली. तसेच एका विधी संघर्षग्रस्त बालकाचाही सहभाग निष्पन्न झाला.

अटक आरोपींकडून रेडमी ८ए कंपनीचा मोबाईल, लोखंडी चाकू व गुन्ह्यात वापरलेली टीव्हीएस अपाची मोटारसायकल असा एकूण २ लाख ३२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सहाय्यक पोलीस अधीक्षक इशानी आनंद व उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या डीबी पथकातील पोलीस हेड कॉन्स्टेबल विजय अंभोरे व पोलीस कॉन्स्टेबल भूषण सोळंके यांनी पार पाडली. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल विजय अंभोरे करीत आहेत.

## शालांत परीक्षेत भारत विद्यालय पुन्हा अव्वल

■ प्रतिनिधी | अकोला ■

आपल्या यशाची व उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत भारत विद्यालयाने या वर्षीही आपल्या यशाची कमान चढतीच ठेवली आहे. विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून यात कु. पिहू सचिन राठोड हिने ९६.६० टक्के गुण घेउन प्रथम क्रमांक प्राप्त केला.

कु. सानिका दिनकर मोहळे हया विद्यार्थीनीला ९६.४० टक्के गुण मिळून तिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. चि. रोहित देवेंद्र फुटाणे याने ९६.२० टक्के गुण घेवून तृतीय क्रमांक पटकाविला. सत्र २०२५-२६ या वर्षात ९० टक्क्याच्यावर ३३ विद्यार्थी असून त्यांनी शाळेचे नावलौकिक केले. शालांत परीक्षा एस.एस.सी. मार्च २०२६ ला शाळेतून परीक्षेला बसलेल्या एकूण २५८ विद्यार्थ्यांपैकी संपूर्ण २५८ विद्यार्थी पास झाले.भारत विद्यालय ही अकोला जिल्हयातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य अशी शाळा म्हणून विख्यात आहे. शिक्षणातच नव्हे तर इतर क्षेत्रात ही शाळा अग्रक्रम ठरणारी म्हणून ओळखली जाते.यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष अनिल पिंपरखेडे, जेष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र पाठक, कनिष्ठ उपाध्यक्ष तथा कोषाध्यक्ष अविनाश नानोटी, सचिव रविंद्र अभ्यंकर तसेच सदस्य निशिकांत पुजारी,अनिरुध्द खरे, समीर थोडगे, शाळेचे मुख्याध्यापक संजय द. घोगरे,उपमुख्याध्यापक योगेश ल. मल्लेकर, पर्यवेक्षिका सौ. देवयानी खेडकर तसेच १०वीचे वर्ग शिक्षक संदीप ठाकरे, सौ. राजश्री नागे, सौ. मोहिनी काणे, कु. अनुराधा कोंडोलीकर तसेच सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन केले.

## जिजाऊ कन्या विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक अकोला एज्युकेशन सोसायटी अकोला द्वारा संचालित रामदास पेठ येथील जिजाऊ कन्या विद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा या वर्षी सुद्धा कायम आहे. यावर्षी सुद्धा एसएससी बोर्ड परीक्षेत जिजाऊच्या विद्यार्थीनी बाजी मारली आहे. परीक्षेसाठी एकूण ७३मुली प्रविष्ट झाल्या होत्या,त्या पैकी १६मुली प्राविण्य श्रेणीत, ३० मुली प्रथम श्रेणीत, १८ मुली द्वितीय श्रेणीत तर ७ मुली पास श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.शाळेतून प्रथम येण्याचा मान मिळवलेला आहे कु. चैताली अवारे हिने ४३९ गुण प्राप्त केले असून तिच्या गुणांची टक्केवारी ८७.८० टक्के आहे. शाळेतून द्वितीय क्रमांकाची मानकरी कु. वैष्णवी गजरे व दिव्या खंडारे ठरल्या असून त्याना ४२२ गुण प्राप्त झाले आहेत.त्यांच्या गुणांची एकूण टक्केवारी आहे ८४.४० टक्के तर शाळेतून तिसरा येण्याचा मान कु. मनस्वी इंगळे हिने मिळविला असून तिला एकून ४१७गुण प्राप्त झाले असून तिच्या गुणांची टक्केवारी ८३.४० टक्के आहे. वरील चारही विद्यार्थिनी अतिशय सामान्य कुटुंबातील असून घरच्या परिस्थितीची जाणीव असणाऱ्या आहेत.अतिशय हलाखीच्या परिस्थितीत अभ्यास करून त्यांनी हे यश मिळवले आहे. ह्या संपूर्ण यशाचे श्रेय त्या त्यांचे आई वडील तसेच शाळेतील गुरुवर्य ह्यांना देतात. कुठलेही यश मिळवण्यासाठी घरातील परिस्थिती श्रीमंत असावी असे नसून मिळेल त्या गोष्टींमध्ये समाधान मानून सुद्धा यश मिळवता येते हे या विद्यार्थिनींनी दाखवून दिले. कारण पैशाच्या श्रीमंती पेक्षा ज्ञानाची श्रीमंती ही केव्हाही मोठी! त्यांची वर्षभर घेतलेली मेहनत हेच त्यांच्या यशाचे गमक आहे. आज त्यांनी केवळ स्वतःचेच नाही तर सोबतच कुटुंबाचे व शाळेचे सुद्धा नाव मोठे केले आहे. या तीनही विद्यार्थिनींना शाळेच्या मुख्याध्यापिका मेधा देशपांडे, वर्गशिक्षिका सौ रसिका मोहरील तसेच शाळेतील सर्व विषय शिक्षक व इतर शिक्षकांचे संपूर्ण मार्गदर्शन लाभले. ह्या विद्यार्थिनी आपल्या यशासाठी शाळेतील इतर विद्यार्थिनींच्या नेहमीच आदर्श राहतील.त्यांच्या यशासाठी अकोला एज्युकेशन सोसायटी अकोला चे अध्यक्ष अँड राजेश्वर देशपांडे, कार्याध्यक्ष विलास देशपांडे, सचिव शार्दूल दिगंबर, शाळा समितीचे अध्यक्ष प्रा के आर जोशी, सहसचिव पातुरकर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले पुढील भविष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

## नोएल स्कूलच्या शिरपेचात आणखी एक शंभर टक्के निकालाचा मानाचा तुरा



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिद्द असेल तर रस्ता सापडतो चिकाटी असेल तर डोंगरही हालतो निश्चय ज्याचा पक्का मनामध्ये यशाचा सुवर्ण कळस त्याच्या हाती लागतो. अशाच युद्ध आणि चिकाटीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी आजचे यश मिळवले आहे.

नोएल स्कूलने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आपली शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली. या निकालासाठी स्कूलच्या संचालिका तसेच नोएल इंग्लिश हाय स्कूलच्या प्राचार्या आदरणीय अर्पणा डोंगरे मॅडम यांचे सक्षम नेतृत्व आणि शिस्तबद्ध व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी वेळोवेळी केलेले मोलाचे मार्गदर्शन याचा मोलाचा वाटा आहे.

यावर्षी एकूण १८७ विद्यार्थी परीक्षेला बसले होते बेस्ट ऑफ फाईव्ह नुसार शाळेचा सरासरी निकाल खालील प्रमाणे ९० टक्के च्या वर ५४ विद्यार्थी ७५ टक्के च्या वर ८९ विद्यार्थी ६०टक्के च्या वर ३९ विद्यार्थी ५०टक्के च्या वर ५ विद्यार्थी गुणानुसार पहिले तीन विद्यार्थी खालील प्रमाणे प्रथम क्रमांक प्रणव दिलीप डोंगरे ९८.८० टक्के द्वितीय क्रमांक वर तीन विद्यार्थी १) वेदिका विलासराव देशमुख ९८टक्के २) श्रावणी नितीन पाटील ९८टक्के ३) श्रेया त्रिशूल पाटील ९८टक्के तृतीय क्रमांकावर तीन विद्यार्थी १) गौरी रामदास धुळे ९७.८०टक्के २) पियुष नाना बोरकर ९७.८०टक्के ३) गौरव राजेंद्र पोटे ९७.८०टक्के विषयनिहाय गुणवंत विद्यार्थी खालील प्रमाणे इंग्रजी इंग्रजीमध्ये ९५ गुण मिळवणारे विद्यार्थी १) श्रावणी नितीन पाटील २) गौरी योगेश सुगंधी ३ ) श्वेता वीरेंद्रकुमार गवई ४) राजे सत्यपाल जगदाळे हिंदी विषयात ९७ गुण मिळवणारी १) श्रेया त्रिशूल पाटील मराठी विषयात ९८ गुण मिळवणारी वेदिका विलासराव देशमुख गणित विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळवणारे विद्यार्थी १) प्रणव दिलीप डोंगरे २) गौरी रामदास धुळे ३) अनुश्री नारायण झाडोकार विज्ञान या विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळवणारे विद्यार्थी १) त्रिशा लीलाधर मनवर २) श्रेया त्रिशूल पाटील ३) मैथिली अभिजीत हंगरगेकर सामाजिक शास्त्र या विषयात ९९ गुण मिळाले विद्यार्थी १) श्रेया त्रिशूल पाटील २) मैथिली अभिजीत हंगरगेकर ३ ) प्रणव दिलीप डोंगरे ४) गौरी रामदास धुळे विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने हे यश संपादन केले आहे. त्याचबरोबर या उत्कृष्ट निकालाचे श्रेय स्कूल चे संचालक श्री अनोश मनवर सर, हाय स्कूलच्या प्राचार्या अर्पणा डोंगरे मॅडम, श्री अनुल मनवर सर यांना जाते.

शाळेच्या या उत्कृष्ट निकालासाठी शाळेच्या प्राचार्य अर्पणा डोंगरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या शिक्षिका सौ. उज्वला घोगरे, सौ.अल्का पाटील, सौ.श्वेता पाटील, सौ सुनीता कांबळे, सौ. सोनल शर्मा, सौ.प्राची मंगरूळकर, सौ. पुष्पलता चोपडे, सौ वैशाली देशमुख, ? सौ जेनिस गवळी, तृप्ती देशमुख, श्री आकाश बुलुकले एवं क्रीडा शिक्षक कल्पना दास, श्री नारायण बतुले, रुपाली देशमुख, नितिन भरने, निलेश लखाडे, ललित शिंदे यांनी श्रम घेतले. या निकालासाठी सोनाली देशपांडे यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. पालकांच्या सहकार्यामुळे विद्यार्थी हे यश संपादन करू शकले. सर्व पालक व विद्यार्थ्यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन.

## संशोधन अधिकारी अनिल देव यांचा निवृत्तीनिमित्त गौरव

**अकोला :** जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयातील सहायक संशोधन अधिकारी अनिल रामदास देव हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. कार्यालयातर्फे त्यांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेबद्दल गौरव सोहळा आयोजिण्यात आला.



जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एस. एन. साळुंके अध्यक्षस्थानी होते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे (मुलींची) प्राचार्य एस. आर. ठोकरे उपस्थित होते. श्री. देव यांनी कार्यालयीन कामकाजात घेतलेले परिश्रम व विविध उपक्रम राबविण्यात दिलेले योगदान यांचा श्री. साळुंके यांनी आपल्या भाषणात गौरवपूर्ण उल्लेख केला. श्री. ठोकरे यांनीही त्यांच्या कार्यकाळातील उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करत कार्यालयात सुरू करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. श्री. देव यांनी सर्वांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सांख्यिकी सहायक एन. टी. राखोंडे, मुख्य लिपीक एम. यू. बुटे, किरणताई घोगरे, मनोहर बदरखे यांनीही मनोगत व्यक्त केले.

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६२५/२०२६ — प्रोसेस नं. ५३१२/२०२६
चौ.ता. ०९/०६/२०२६ — दिनांक : १७/०४/२०२६

**अर्जदार :** १. मुकिंदा बसंता उर्फ वसंता इंगळे रा. तामसी, ता. जि. अकोला. २. बाबुराव बसंता उर्फ वसंता इंगळे रा. तामसी, ता. जि. अकोला. ३. श्रीमती बेबी गौतम डोंगरे रा. खरप (ढोर), ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. ४. कुसुम गोपाल गोपनारायण रा. येवता, ता. जि. अकोला. ५. गिता विलास सरदार रा. गोरेगाव (पुं.म.) ता. मुर्तिजापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. नंदाबाई वसंता इंगळे २. वसंता श्रावण इंगळे
**पत्ता :-** रा. तामसी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नंदाबाई वसंता इंगळे यांचे दि. ०५/१०/२०१५ रोजी व तसेच मयत वसंता श्रावण इंगळे यांचे दि. १८/०४/२०१७ रोजी राहत्या घरी तामसी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**संदर्भ :** श्रीमती कस्तुराबाई ज किसनराव शेगावकर, रा. कान्हेरी (सरप), ता. बार्शिटाकळी जि. अकोला यांनी वडिलोपार्जीत मालमत्ता घर रजि. क्रं. ४९६, न.भु.पा.कं. ६०७, शिट नं.५, प्लॉट क्रं. ६०७, क्षेत्रफळ चौ.मी.१६३.३०, हक्काचा मुळधारक, वर्ग १९८१.

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार राजरतन किसनराव शेगावकर, रा. कान्हेरी (सरप), ता. बार्शिटाकळी, जि. अकोला यांच्या मालकी हक्क व ताब्यातील स्थावर मालमत्ता विकण्याचा सौदा उपरोक्त कस्तुराबाई शेगावकर या आमच्या पक्षकाराच्या आई असून उपरोक्त घर हे आमचे पक्षकाराचे वडिल सेवानिवृत्त किसन अंबुजी शेगावकर (मयत) यांनी स्वकष्टार्जीत घर आमच्या आईच्या नावाने विकत घेवुन ठेवलेले आहे. सदर घर/मालमत्तेत आम्ही कायदेशीर वारस म्हणुन दोन भाऊ, दोन बहिणी व आई असा समावेश आहे. आमचे पक्षकाराचे भाऊ व बहिणी या आपआपल्या स्वकष्टार्जीत घरी राहत असून तर काही भाड्याच्या घरामध्ये अकोला व बुलढाणा येथे राहत आहेत. आमच्या पक्षकाराच्या आई या उपरोक्त ठिकाणी आमच्या पक्षकारासोबतच राहत आहेत. असे असतांना सुध्दा त्यांनी उपरोक्त मालमत्ता/घराचा दुसऱ्याला विकण्याचा सौदा, करण्याचा घाट घातलेला आहे. सदर घर

ग्रामपंचायत कान्हेरी (सरप) हद्दीतील असून घर कं.४९६, न.भु.कं. ६०७, शिट नं.५, प्लॉट नं. ६०७ क्षेत्रफळ चौ.मी. १६३.३० अशा स्वरुपाचे असून सहा खोल्या, दोन संडास बाथरूम, तसेच चार खोल्यावर स्लॅब असून दोन खोल्यावर टिनपत्रे आहेत तसेच स्लॅब वर एक रूम व संडास बाथरूम आहे त्यास चर्तुसिमा पुर्वेस -प्रेमकिशोर जैयस्वाल यांचे घर, पश्चिमेस- सम्यक समबुध्द विहार, उत्तरेस- रस्ता आणि दक्षिणेस - सर्व्हिस गल्ली, येणेप्रमाणे आहे.

वरील वर्णनाचे घर आमचे पक्षकाराच्या पुर्व सम्मतीशिवाय सदर घर कोणीही सदर वर्णनांकीत मालमत्तेसंबंधी अधिकार हक्क, गहाण, बोजा, नोंदणीकृत दस्ताऐवज, खरेदी-विक्री अथवा इतर कोणतेही कायेदशीर व्यवहार करू नयेत. तसे केल्यास व त्यास आमचे पक्षकाराची पुर्व सम्मती न घेतल्यास आमचे पक्षकार सदर व्यवहारास बांधील राहणार नाही व कोणाचाही उजर ऐकुन घेतला जाणार नाही करीता ही जाहीर नोटीस.

अकोला
दिनांक :- २४.०४.२०२६

**अॅड. एन. एस. तायडे,**
अकोला
**पक्षकार -** राजरतन किसनराव शेगावकर
(मो. नं.९८२२४१४४९७)

### जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) मूर्तिजापूर, जि. अकोला यांचे न्यायालय (श्री तांबोळी साहेब)**

आर. एम. जे. सी. क्रमांक १५४/२०२६ — प्रोसेस नं.१३६१/२०२६
चौ.ता. २०/०६/२०२६ — दिनांक : ०६/०५/२०२६

**अर्जदार :** १. विजय गौतम डोंगरे, वय ३३ वर्ष, २. बेबीताई गौतम डोंगरे, वय ६३ वर्ष, १ व २ रा. खरप (ढोरे), ता. मुर्तिजापुर, जि. अकोला ३. सोनु उल्हास सदांशिव, वय ३७ वर्ष, रा. सोनखास (पातुर नंदापुर), ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. रविना अजय डोंगरे, वय ३२ वर्ष, २. खुशी अजय डोंगरे, वय ०८ वर्ष, ३. सानवी अजय डोंगरे, वय ०६ वर्ष, ४. रूचीता अजय डोंगरे, वय ०२ वर्ष, सर्व रा. व्दारा बाळु वानखडे, रा. अन्वी (मिर्झापुर), ता. जि. अकोला

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मयत गौतम राजाराम डोंगरे व अजय गौतम डोंगरे, रा. खरप (ढोरे), ता. मुर्तिजापुर, जि. अकोला यांचे वारस आहे. उपरोक्त नमुद अर्जदार मिळकतीचे कायदेशीर वारसदार आहे. या व्यतिरीक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याकरीता चौकशी तारीख दि. २०/०६/२०२६ ही ठेवण्यात आलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर प्रकरणांत कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप घ्यावयाचा असेल तरी त्यांनी २०/०६/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी विद्यमान न्यायालयात हरकत / आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप नाही असे समजुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक ०६/०५ २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली आहे.

मुर्तिजापूर.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, मुर्तिजापूर

### जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापूर**
**दयानंद मारूती वाघमारे यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.**

प्रोसेस क्रं. १०/१/२६ — दि. २१/०४/२०२६

दिवाणी किरकोळ अर्ज/११४/२०२६
पद्मा रामहरी शेळके वि. सानिका नागोराव इंगोले
पुढिल तारिख : २०-०६-२०२६

**अर्जदार :** १. सौ. पद्मा रामहरी शेळके वय अं३८वर्ष धंदा शेती रा. बोरगांव वैराळे ता. बाळापूर जि. अकोला २. श्रीमती दुर्गा महादेव इंगोले वय अं५८वर्ष धंदा घरकाम रा. मरोडा कावसा ता. अकोट जि. अकोला ह.मु. बोरगांव वैराळे ता.बाळापूर जि.अकोला ३. सौ. रुख्मा प्रदीप पवार वय अं ३५ वर्ष धंदा घरकाम रा. पांगरी ता.जि.बीड

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** - सानिका नागोराव इंगोले

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत महादेव पांडुरंग इंगोले हे दिनांक १६.०२.२०२५ रोजी मौजे बोरगांव वैराळे ता. बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमूद अर्जदार यांना मयत महादेव पांडुरंग इंगोले यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २०.०६.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २१.०४.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायिक)
दिवाणी न्यायालय क स्तर, बाळापुर

# 'फी भरा आणि भविष्य घडवा' सरकारी शाळांकडे पाठ फिरवत पालकांचा खासगी शिक्षणाकडे कल

## रिकामे बाक, बंद होण्याच्या उंबरठ्यावर शाळा; जिल्हा परिषद शिक्षण व्यवस्थेची शोकांतिका

**वर्धा/ रवींद्र लाखे**

एकेकाळी ग्रामीण महाराष्ट्राच्या प्रगतीचा दीप मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदांच्या शाळा आज अक्षरशः ओस पडत चालल्या आहेत. ज्या शाळांनी लाखो गोरगरीबांच्या लेकरांना शिक्षणाची दारे खुली केली, त्याच शाळांकडे आता पालकांनी पाठ फिरवल्याचे भयावह चित्र समोर आले आहे. दुसरीकडे लाखोंची फी आकारणाऱ्या 'सेल्फ फायनान्स' खासगी शाळांमध्ये मात्र प्रवेशासाठी झुंबड उडत आहे. राज्याच्या शिक्षण व्यवस्थेतील ही दरी दिवसेंदिवस अधिक भीषण होत असून, 'मोफत शिक्षण' या संकल्पनेलाच आता ग्रहण लागल्याची चर्चा सुरू झाली आहे.

राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार, यंदाच्या शैक्षणिक वर्षात जिल्हा परिषद आणि सरकारी शाळांमधील तब्बल १ लाख ३० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची पटसंख्या घटली आहे. ग्रामीण महाराष्ट्राचा आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद शाळांमध्येच सुमारे १ लाख ३४ हजार विद्यार्थ्यांनी घट झाली. महानगरपालिका, नगरपालिका आणि शिक्षण विभागाच्या शाळांमधील विद्यार्थीसंख्याही घसरली आहे. एका वर्षात सरकारी शिक्षण व्यवस्थेतील तब्बल १ लाख ३६ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी कमी झाल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.याउलट, खासगी अनुदानित आणि 'सेल्फ फायनान्स' शाळांनी मात्र भरारी घेतली आहे. विशेष म्हणजे, स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये तब्बल ७ लाख ८९ हजार विद्यार्थ्यांची वाढ झाली आहे. वाढत्या फीचा बोजा, कर्ज काढून



भरले जाणारे प्रवेश शुल्क, महागडी पुस्तके आणि चकचकीत सुविधा असूनही पालकांचा ओढा खासगी शिक्षणाकडे झपाट्याने वाढत आहे. पैसे मोजा आणि दर्जेदार शिक्षण घ्या हा नवा फॉर्म्युला आता महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेवर अधिराज्य गाजवत असल्याचे चित्र आहे.विशेष म्हणजे, सर्वाधिक धक्का विनाअनुदानित शाळांना बसला आहे. या शाळांमधील तब्बल ५ लाख ९१ हजार विद्यार्थी कमी झाले आहेत. अनुदानाचा अभाव, वाढलेला आर्थिक ताण आणि स्पर्धात्मक खासगी शाळांच्या बाजारात टिकून राहण्यासाठी सुरू असलेली धडपड यामुळे अनेक विनाअनुदानित संस्था अक्षरशः कोलमडण्याच्या मार्गावर आहेत.

दरम्यान, सरकारी शाळांची पडझड ही केवळ आकड्यांची बाब राहिलेली नाही, तर ती सामाजिक वास्तव बनली आहे. इंग्रजी माध्यमाचा वाढता मोह, डिजिटल शिक्षणाचे आकर्षण, वातानुकूलित वर्गखोल्या, स्मार्ट बोर्ड, सीसीटीव्ही, स्पोकन इंग्रजी आणि आक्रमक जाहिरातबाजी यामुळे सर्वसामान्य पालकही खासगी शाळांकडे धावत आहेत. फी जास्त म्हणजे शिक्षण चांगले हा समज समाजात इतका खोलवर रुजला आहे की, अनेक कुटुंबे कर्ज काढून मुलांना खासगी शाळेत शिकवत आहेत.

दुसरीकडे सरकारी शाळांमधील शिक्षकांवर जनगणना, निवडणुका, पोषण आहार, सर्वेक्षण अशी अशैक्षणिक कामांची जबाबदारी टाकली जात असल्याने अध्यापनासाठी मिळणारा वेळ कमी होत आहे.

सेमी इंग्रजीचे फलक लावले गेले, पण दर्जेदार प्रशिक्षण आणि आधुनिक साधनसामग्रीचा अभाव कायम राहिल्याने सरकारी शाळा खासगी शाळांच्या स्पर्धेत मागे पडत असल्याची टीका शिक्षण तज्ज्ञांकडून होत आहे. वर्ध्यासारख्या ग्रामीण जिल्ह्यांमध्येही हेच वास्तव अधिक तीव्रतेने जाणवत आहे. गावोगावी जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये रिकामे बाक वाढत आहेत, तर खासगी इंग्रजी शाळांच्या बस सकाळी रस्त्यावर धावताना दिसत आहेत. गरीबांच्या लेकरांसाठी उभारलेली शिक्षण व्यवस्था आता श्रीमंतीच्या बाजारपेठेत हरवत चालल्याची संतप्त भावना पालक आणि शिक्षकांमधून व्यक्त होत आहे.आज प्रश्न फक्त पटसंख्येचा नाही... प्रश्न आहे ग्रामीण महाराष्ट्राच्या भवितव्याचा सरकारी शाळा वाचल्या नाहीत, तर उद्या शिक्षण हा हक्क राहणार नाही;

तो फक्त पैशाने विकत घेण्याचा व्यवहार ठरेल, अशी भीती आता उघडपणे व्यक्त होऊ लागली आहे.

## विदर्भ साहित्य संघ, वर्धा शाखेचे आयोजन

### आज दोन पुस्तकांचा लोकार्पण सोहळा




**वर्धा/जनमाध्यम**

विदर्भ साहित्य संघ, वर्धा शाखेद्वारे रविवार, दि. १० रोजी राहुल राऊत 'सुगतो' लिखित अ कप ऑफ टी आणि आर्कीटेक्ट निखिल अवथनकर लिखित ए स्केचर्स बुक या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

स्थानिक निसर्ग सेवा समितीच्या ऑक्सिजन पार्कमध्ये सकाळी ८ वाजता आयोजित या कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक व सामाजिक कार्यकर्त्या अरुणा सबाने यांच्या हस्ते दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कथालेखक, कादंबरीकार प्रा. नवनीत देशमुख राहणार असून निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष वृक्षमित्र मुरलीधर बेलखोडे, सार्वजनिक बांधकाम विभागातील उपविभागीय अभियंता महेश मोकलकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या समारोहात विदर्भ साहित्य संघाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अरुणा सबाने यांचा वि.सा. संघाच्या वर्धा शाखेद्वारे सत्कार करण्यात येईल.लेखक निखिल अवथनकर व्यवसायाने वास्तुशास्त्रज्ञ असून नवोदित चित्रकार तसेच स्थापत्य शास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांचे 'ए स्केचर्स बुक' हे पुस्तक उपयुक्त ठरणारे आहे. या कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांसाठी रेखाटनाची प्रात्यक्षिकेही सादर करणार आहेत.

तर, सुगतो या टोपणनावाने लिहिणारे राहुल राऊत हे व्यावसायिक प्रकाशक व पुस्तक विक्रेते असून त्यांनी 'अ कप ऑफ टी' या पुस्तकातून जपानी जीवनविषयक सिद्धांतांची सोप्या भाषेत मांडणी केली आहे.


निसर्गाच्या सान्निध्यात आयोजित या कार्यक्रमाला सुजाण नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विदर्भ साहित्य संघाचे शाखाध्यक्ष संजय इंगळे तिगावकर, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र मुंढे, सचिव रंजना दाते, सहसचिव प्रा. पद्माकर बाविस्कर तसेच कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

## मोबाईलच्या पडद्याआड बालपण

**साहूर/जनमाध्यम**

एक काळ होता... उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या की घराघरांत मुलांच्या आनंदाचा कल्लोळ उसळायचा. कधी एकदा मामाच्या गावाला जातो याचीच ओढ लेकरांच्या डोळ्यांत दिसायची. रेल्वेच्या झुकझुक गाडीत बसून मामाच्या गावाकडे निघालेली बच्चे कंपनी म्हणजे जणू आनंदाचीच यात्रा असायची. पण आता काळ बदलला हातात मोबाईल आला आणि मुलांच्या मनातून मामाच्या गावाची मातीच हरवली!

साहूर परिसरातील शाळांच्या परीक्षा संपल्या असून विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्ट्या लागल्या आहेत. मात्र पूर्वीसारखा सुट्ट्यांचा उत्साह आता दिसत नाही. अंगणात खेळणारी, नदीत पोहणारी, आमराईत धुडगूस घालणारी लेकरं आता मोबाईलच्या पडद्यामागे कैद झाली आहेत. लहानग्यांपासून तरुणांपर्यंत सर्वजण मोबाईल, व्हिडिओ गेम, कार्टून आणि सोशल मीडियात इतके गुरफटले आहेत की 'मामा' हे नातंच जणू आठवणीत उरलं आहे.पूर्वी मामाच्या गावाला गेल्यावर मुलांच्या चेहऱ्यावर वेगळंच चैतन्य फुलायचं. नदीच्या थंड पाण्यात



'मामाच्या गावाची' वाट आता ओस पडली

पोहणे, उन्हात मोकळं बागडणे, आजीच्या हातचं जेवण, मामीच्या प्रेमाने वाढलेले पदार्थ आणि आमराईतील रसाळ गावरान आंबे... या सगळ्यांत बालपण फुलून यायचं. निळंशार आकाश, हिरवागार निसर्ग आणि गावची मोकळी हवा मुलांच्या मनावरचा ताण क्षणात दूर करायची.मात्र आता परिस्थिती पूर्ण बदलली आहे.

सुट्टी लागली की मुलांना मामाच्या गावाला पाठवण्याऐवजी पालक त्यांना कम्प्युटर क्लास, कोचिंग आणि विविध कोर्सेसमध्ये गुंतवून ठेवत आहेत. 'करिअर'च्या शर्यतीत बालपण हरवत चाललं आहे. लपाछपी, गिल्ली-दांडा, कबड्डी, चोर-पोलीस यांसारखे मैदानी खेळ इतिहासजमा झाले असून त्यांची जागा मोबाईल आणि क्रिकेटने घेतली आहे.विशेष म्हणजे, बदल फक्त मुलांमध्येच नाही तर नात्यांतही झाला आहे. मुलांच्या शिक्षणासाठी मामा-मामीसुद्धा गाव सोडून शहरात स्थायिक झाले आहेत. त्यामुळे गावातील घरं ओस पडली आणि नात्यांतील ऊबही कमी झाली.

आज मोबाईलच्या चमकदार पडद्याने मुलांच्या चेहऱ्यावरचं निरागस हास्य हिरावून घेतलं आहे. उन्हाळी सुट्ट्यांतील मामाच्या गावाची सैर आता आठवणींच्या कप्प्यात बंदिस्त झाली असून, आधुनिकतेच्या वेगात बालपण हरवल्याची हळहळ समाजमनातून व्यक्त होत आहे.

# साहूरमध्ये पाणीटंचाई तीव्र; दहा दिवसांपासून नळ कोरडे

## दूषित पाणीपुरवठ्यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप; जीवन प्राधिकरणाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**साहूर/जनमाध्यम**

साहूर, सावंगा (पुनर्वसन) आणि धाडी या गावांमध्ये गेल्या दहा दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प झाल्याने ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. जीवन प्राधिकरणाच्या जलशुद्धीकरण योजनेतील बिघाड, देखभाल-दुरुस्तीकडे झालेले दुर्लक्ष आणि वर्धा नदीतील घटलेली पाणीपातळी यामुळे परिस्थिती गंभीर बनली आहे. दरम्यान, फिल्टर प्लांटमधून दुर्गंधीयुक्त व गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे.

तीस ते पस्तीस वर्षांपूर्वी वर्धा नदीवरून या तिन्ही गावांसाठी जलशुद्धीकरण योजनेद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला होता. मात्र, गेल्या काही वर्षांत जलशुद्धीकरण केंद्राच्या



देखभाल आणि दुरुस्तीकडे पुरेसे लक्ष न दिल्याने संपूर्ण यंत्रणा अडचणीत आली आहे. सध्या नदीची पाणीपातळी कमी झाल्यामुळे फिल्टर प्लांटच्या विहिरीत पाणी येत नसल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.साहूरचे सरपंच प्रकाश गायकवाड, सावंगाचे सरपंच विनोद सोनोने, सामाजिक कार्यकर्ते गजानन भोरे तसेच ग्रामपंचायत सदस्यांनी जीवन प्राधिकरणाचे अधिकारी गढवे आणि कंत्राटदार राजीव देशमुख यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. मात्र, याबाबत समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.दरम्यान, ग्रामपंचायत प्रशासनाने पर्यायी उपाययोजना म्हणून जेसीबी आणि पोकलँडच्या सहाय्याने विहिरीत पाणी आणण्यासाठी खोदकाम सुरू केले आहे. मात्र अद्याप त्यातून अपेक्षित यश मिळालेले नाही. पाणीटंचाईमुळे महिलांना आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून गावात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.दूषित पाण्यामुळे साथीचे आजार पसरण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे जलशुद्धीकरण केंद्राची तातडीने दुरुस्ती करून नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करावा, तसेच संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत प्रशासनाने केली आहे.

## भारतीय तरुणांना जर्मनीमध्ये रोजगार आणि उच्च प्रशिक्षणाची संधी

**वर्धा / जनमाध्यम**

मॅजिक बिलीयन या सरकारमान्य आंतराष्ट्रीय टॅलेंट मोबिलिटी संस्थेमार्फत जर्मनीमध्ये विविध तांत्रिक आणि सेवा क्षेत्रात करीअर घडवू इच्छिणा-या तरुणांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या संधीचा तरुणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यामध्ये प्रामुख्याने नर्सिंग, फुड, प्रोसेसिंग, लॉजिस्टिक्स, प्लबींग, मेकॅट्रॉनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि एअर कंडिशनिंग यासारख्या महत्वाच्या क्षेत्राचा समावेश असणार आहे. या उपक्रमांतर्गत उमेदवारांना थेट नोकरी न देता प्रथम तीन वर्षाचे उच्च दर्जाचे सवेतन व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. सदर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर उमेदावारांना जर्मनीमध्येच कायस्वरुपी नोकरीची खात्री दिली जाते.रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन घेण्यासाठी तरुणांचे वय १८ ते २८ वर्षाच्या दरम्यान असणे आवश्यक असून महिला व पुरुषांना समान संधी उपलब्ध आहे. नर्सिंग क्षेत्रासाठी एएनएम पदवी अनिवार्य आहे. तर मेकॅट्रॉनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि प्लबींगसाठी १२ वी गणित विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे किंवा १० वी नंतर दोन वर्षाचा आयटीआय अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे.

जर्मनीमध्ये काम करतांना जर्मनी भाषेचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक असून त्यासाठी गोएथे संस्थेचे बी-१ स्तरावरील प्रमाणपत्र असणे अनिवार्य करण्यात आले आहे.तीन वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना दरमहा विद्यावेतन दिले जाणार आहे. पहिल्या वर्षी १,०४८ युरो, दुस-या वर्षी १,१०० युरो आणि तिस-या वर्षी १,१५० युरो इतकी रक्कम प्रति महिना दिल्या जाणार आहे. भारतीय रुपयांमध्ये ही रक्कम प्रति महिना ९४ हजार ते १ लाख ३ हजार रुपयापर्यंत जाते. प्रशिक्षण यशस्वीपूर्ण केल्या नंतर जेव्हा उमेदवार पूर्णवेळ कामावर रुजु होईल तेव्हा दरमहा २,२०० ते २,५०० युरो भारतीय चलनानुसार २ लाख ते २ लाख २५ हजार रुपये सुरवातीला पगार मिळेल.

## गुन्हेगारी वार्ता

### सांडपाण्याच्या वादातून महिलेस मारहाण

**समुद्रपूर -** तालुक्यातील उब्दा येथे सांडपाण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका महिलेला वीट मारून जखमी करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात महिलेच्या पतीलाही मारहाण करण्यात आली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उब्दा येथील नीलेश दवंडे याच्यासोबत सांडपाणी वाहण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला होता. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपीने संतापाच्या भरात महिलेकडे वीट फेकली. यात ती जखमी झाली. यावेळी मध्यस्थी करण्यासाठी पुढे आलेल्या तिच्या पतीलाही मारहाण करण्यात आली.घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पीडित महिलेच्या तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### युवकावर चाकूने हल्ला; दोघांविरुद्ध गुन्हा

**वर्धा -** शहरातील इतवारा बाजार परिसरात युवकावर चाकूने वार करून मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, विकास सूरज पांडे याला सुजल पाटील याने अमोलसोबत बोलण्यासाठी बोलावले होते. त्यानंतर विकास हा भेटण्यासाठी गेला असता 'येथे कशासाठी आला असा जाब विचारत अमोल गेडाम याने त्याच्यावर चाकूने हल्ला केला. चाकू अडविताना त्याच्या हाताला दुखापत झाली. यावेळी मंगेश मडावी यानेही मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. तक्रारीवरून पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### महिलाश्रम परिसरात युवकास मारहाण

**वर्धा -** स्थानिक महिलाश्रम परिसरात एका युवकाला मारहाण करून चाकूचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इतवारा बाजार येथील सुजल पाटील हा महिलाश्रम परिसरात गेला होता. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या विकास पांडे याच्यासोबत त्याचा वाद झाला. वाद वाढल्यानंतर विकास पांडे याने सुजलला मारहाण केली. तसेच चाकूचा धाक दाखवत शिवीगाळ करून त्याला जीवे मारण्याची धमकी दिली.घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पीडित युवकाच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### दौलतपूर शिवारात आगीने शेतीसाहित्य भस्मसात

**सेलू -** तालुक्यातील दौलतपूर शिवारात लागलेल्या आगीत शेतातील प्लास्टिक पाईप व लिंबाची झाडे जळून सुमारे ७० हजार रुपयांचे नुकसान झाले. या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.गिरोली (ढगे) येथील नितीन विलास ढगे यांच्या शेतात ही घटना घडली. शेजारील शेताच्या धुऱ्याकडून आग पसरून ती ढगे यांच्या शेतापर्यंत पोहोचल्याचे सांगण्यात आले. या आगीत शेतातील प्लास्टिक पाईप तसेच २५ ते ३० लिंबाची झाडे पूर्णपणे जळून खाक झाली.घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी आग विझविण्यासाठी धाव घेतली. याप्रकरणी सेलू पोलिसांनी संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

### आजाराला कंटाळून तरुणाची आत्महत्या

**वर्धा -** दीर्घकालीन आजाराला कंटाळून एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना सेलू तालुक्यातील आकोली हेटी येथे घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.सुनील कृष्णाजी बेले (वय ३६) असे मृत तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनील हे काही दिवसांपासून आजाराने त्रस्त होते. मानसिक तणावातून त्यांनी घरात कोणी नसताना गळफास घेत जीवन संपविले. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी धाव घेतली; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता.या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे. याप्रकरणी सेलू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली.

### अपघातातील जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा -** दुचाकी अपघातात गंभीर जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.सौरव मेघराज चलाख (वय २९, रा. तामसवाडा) असे मृत युवकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आंजी ते सेवा मार्गावर त्यांच्या दुचाकीचा अपघात झाला होता. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांना तातडीने सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.उपचार सुरू असताना त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही आणि अखेर त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेतली. याप्रकरणी पोलिसांनी नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १६२

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल**-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# जिल्ह्यातील अनेक शाळांचा निकाल १०० टक्के

## सरहद गांधी उर्दू हायस्कूलचा निकाल

**कुऱ्हा**-नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात सरहद गांधी उर्दू हायस्कूल, कुऱ्हा येथील तालुक्यात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली असून, यंदाही दहावीचा निकाल १००% टक्के लागला आहे. जुबिया फातेमा अब्दुल जमीर ८९.००% गुण मिळवून पहिला क्रमांक पटकावला. जैनब फातेमा अब्दुल सईद ८५.६० % गुणांसह द्वितीय आणि अशमीरा कशफ अब्दुल रईस ८१.२० गुणांसह तिसरा क्रमांक प्राप्त



केला.तर सना अंजुम मोहम्मद अनिस ७७.६० गुणांसह चौथा क्रमांक मिळविला.रुमाना परवीन शेख सलीम ७७.०% गुणांसह पाचवा प्राप्त करून विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले आहे. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष मोहम्मद हारून मो. मुश्ताक, सचिव मो. अहफाज मो. अशफाक आणि प्राचार्य अनीस अहमद खान आणि सर्व शिक्षकांना दिले.संस्थेचे अध्यक्ष मो. हारून मो. मुश्ताक, सचिव मो. अहफाज मो. अशफाक, प्राचार्य अनिस अहमद खान आणि सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## शहीद पांडुरंग यशवंत दिंडेकर निवासी मूकबधिर माध्यमिक विद्यालय


**आसेगाव पूर्णा** - माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (दहावी) २०२६ च्या निकालात कुरळपूर्णा येथील सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचालित शहीद पांडुरंग यशवंत दिंडेकर निवासी मूकबधिर माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाने यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली.यंदा २४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले.



त्यापैकी १४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य (Distinction) तर १० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत यश मिळवले.गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये विठ्ठल दहिकर यांनी ८४.६० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. सुरेश अळासे (८४ टक्के) द्वितीय, तर मंत्री जाधव (८०.६० टक्के) यांनी तृतीय क्रमांक मिळवला.या यशाबद्दल माजी राज्यमंत्री तथा दिव्यांग मंत्रालयाचे जनक आ. बच्चुभाऊ कडू, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. नयना ओमप्रकाश कडू, सचिव राहुल म्हाला तसेच प्रशासकीय अधिकारी चंद्रशेखर मोहोड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. 'विद्यार्थ्यांनी आपल्या मर्यादांवर मात करून मिळवलेले यश प्रेरणादायी आहे,' असे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले.विद्यार्थ्यांच्या यशामागे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन आणि परिश्रम महत्त्वाचे ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

## यश धनंजय देशमुख राजेश्वरी विदया मंदिर शाळेतून प्रथम

**अमरावती**-वर्ग दहाविच्या नुकत्याच लागलेल्या निकालात यश धनंजय देशमुख यांना ९८.८० % गुण प्राप्त चि.यश देशमुख हा श्री.शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात कार्यरत धनंजय देशमुख यांचा मुलगा असुन तो राजेश्वरी विदया मंदिरात वर्ग १० विला शिक्षकत होता.



यश धनंजय देशमुख याला दहावित ९८.८०% गुण प्राप्त झाले असुन गणित व संस्कृत या विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केलेले आहेतङ यश आपल्या यशाचे श्रेय आई, वडील डधनंजय देशमुख व प्रिती धनंजय देशमुख,तर राजेश्वरी विद्या मंदिरा च्या शिक्षिका सुनिता चव्हान, तसेच शिक्षक, शिक्षिका त्याप्रमाणे राजेश्वरी विद्या मंदिर परिवाराला,सोबत च साई क्लासेस शिकवणि चे संचालक हटवार, तर इंग्रजी चे जळीत व सर्व गुरुजनांना व मित्र परिवारासह कुंटुबाला देत आहे.

यशचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातुन त्याच्या यशप्राप्ती साठी भरभरुण कौतुक होत असुन यशला आय टी क्षेत्रा सोबतच रिसर्च क्षेत्रात आपल करीयर घडवायचे आहे.

## जिल्ह्यात पुन्हा 'Merit Maker Project' चा दबदबा!

**अमरावती**-यावर्षीच्या दहावी बोर्ड परीक्षेत पुन्हा एकदा Merit Maker Project ने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत संपूर्ण अमरावती जिल्ह्यात मोठे लक्ष वेधून घेतले आहे.मार्गदर्शक संदीप सर यांच्या नियोजनबद्ध अभ्यास पद्धतीमुळे आणि सातत्यपूर्ण मेहनतीमुळे यंदा १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.विशेष म्हणजे जिल्ह्यातील अनेक नामांकित शाळांचे टॉपर विद्यार्थी हे Merit Maker Project शी जोडलेले असल्याचे समोर आले आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे 'Think Like a Topper' ही संकल्पना, नियमित Study Workshop, ब्रह्ममुहूर्त अभ्यास प्रकल्प आणि मानसिक तयारीवर दिलेला भर हे महत्त्वाचे घटक ठरले.

तसेच ९० ते ९५% गुण मिळवणारे शेकडो विद्यार्थी असून त्यांच्या या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे, पालकांचे, शिक्षकांचे तसेच संबंधित शाळांचे मनापासून कौतुक करण्यात आले.'प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये टॉपर बनण्याची क्षमता असते. योग्य मार्गदर्शन, योग्य मानसिकता आणि सातत्यपूर्ण सराव मिळाला तर कोणताही विद्यार्थी ९०ङ पेक्षा जास्त गुण मिळवू शकतो.'यंदाच्या निकालामुळे Merit Maker Project ची अमरावती जिल्ह्यात पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू झाली असून, पुढील शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता दिसून येत आहे.



## श्रुतिका सु.सरवटकर श्री भगवंतराव कळसकर विद्यालयातून प्रथम

**पूर्णानगर**-आज नुकताच माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून भातकुली तालुक्यातील पूर्णानगर येथील श्री भगवंतराव कळसकर विद्यालयाने आपली परंपरा कायम ठेवली असून याही वर्षी उत्तमरित्या निकाल लागला आहे. या वर्षी या विद्यालयातून श्रुतिका सूर्यप्रकाश सरवटकर हिने ९२% गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकवला.



श्रुतिका ही इयत्ता पाचवीपासून ते दहावीपर्यंत तिने शाळेतून प्रथम क्रमांक मिळवत आल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. श्रुतीका आपल्या येशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष रामकृष्ण कळसकर, सचिव मधुसूदन कळसकर, मुख्याध्यापक सोनार, नारोळकर, व सर्व शिक्षक तथा शिक्षिकावृंद तसेच आई अश्विनी सरवटकर वडील सूर्यप्रकाश सरवटकर, विनायक सरवटकर यांना देते. श्रुतिका हिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## गांधी विद्यालयाचे ३० विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत

**अंजनगाव बारी**-न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा संचालित गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. यंदा विद्यालयाचा एकूण निकाल तब्बल ९२.१७ टक्के लागला असून एकूण ११५ विद्यार्थी परीक्षेस बसले होते.यापैकी ३० विद्यार्थी प्राविण्यासह, ५० विद्यार्थी प्रथम श्रेणीत, तर १५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. प्रथम क्रमांक-कल्याणी संतोष हजारे



(९०%),द्वितीय क्रमांक – मेघना रत्नाकर मोडक (८९%),तृतीय क्रमांक-खुशी गजानन अंबाडकर (८९%) यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष डॉ. हेमंतजी देव, उपाध्यक्षराजेश टारपे, ॲड. आनंदराव इंगोले, शाळा समिती सभापती रामेश्वर लाड तसेच सर्व कार्यकारिणी सदस्यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले.विद्यालयाच्या प्राचार्या वंदना टिक्कस, पर्यवेक्षक दिगंबर करडे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शन व परिश्रमामुळे हा झळाळता निकाल साध्य झाल्याचे सांगण्यात आले. विद्यालयाच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या आहेत.



## विद्यानिकेतन कुऱ्हाचा निकाल

**कुऱ्हा**-इयत्ता १०वि परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या मध्ये व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ़ हायर एज्युकेशन नागपुर, द्वारा संचालित विद्यानिकेतन व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय कुऱ्हा येथील इयत्ता १० वि च्या विद्यार्थ्यांनी प्रविण्यासह यश संपादन केले. सोबतच विद्यालय चा ९०.१४ % निकाल जाहिर झाला यात प्राविण्यासह यश प्राप्त करणारे विद्यार्थी प्रथम क्रमांक संकेत कैलास असोडे द्वितीय क्रमांक वंशिका बाबाराव वानखडे तृतीय क्रमांक दिव्या अश्विन झरपुरे चतुर्थ क्रमांक वेदांती योगेश ठाकरे पाचवी चेतना हरिश्चंद्र ठाकरे विद्यार्थ्यांनी उत्तम गुणांकन प्राप्त केले.नेत्रदिपक यश संपादन करणाऱ्या विद्यालयाच्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनदंन मा.श्री.प्रकाशभाऊ मक्रमपुरे पालक संचालक विद्यानिकेतन कुऱ्हा तथा सहकार्यवाह व्हिएसपिएम नागपुर व मुख्याद्यपिका मॅडम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सावरखेड पिंगळाई साफल्य विद्यालयाचे यश

**लेहेगाव**-फेब्रुवारी /मार्च २०२६ मध्ये झालेल्या एस. एस.सी. परीक्षेमध्ये साफल्य विद्यालय सावरखेड चा निकाल ९५.४५ङ एवढा लागलेला आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये दहावीच्या परीक्षेला एकूण ४४ विद्यार्थी विद्यार्थिनी प्रविष्ट झालेले होते. यापैकी ४२ विद्यार्थी विद्यार्थिनी उत्तीर्ण झालेले असून प्राविण्यश्रेणीमध्ये ०६, प्रथम श्रेणीमध्ये १७, द्वितीय श्रेणीमध्ये १५ तर तृतीय श्रेणीमध्ये ०४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केलेले आहे. प्रावीणप्राप्त विद्यार्थ्यांमध्ये विद्यालयामधून श्रावणी दीपकराव वानखडे, चंचल रवींद्र बादशे श्रावणी मनोहर राऊत, सार्थक महेंद्र वानखडे, प्रज्वल महादेव भुंबर,माही पिंटू धिमान या सहा विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त करून विद्यालयाच्या यशामध्ये मानाचा तुरा फडकविलेला आहे. एस .एस. सी. परीक्षेमध्ये गुणवंत उत्तीर्ण विद्यार्थी विद्यार्थिनींचे साफल्य ग्रामीण विकास



शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विजय मडके, उपाध्यक्ष डॉ. विनोदजी भोजने, सचिव संजय नानासाहेब मंगळे .शाळा समितीचे सदस्य व पत्रकार कैलाससिंह ठाकुर तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, शाळा समिती, शाळा व्यवस्थापन समिती,माता पालक समिती, मुख्याध्यापढक .शिक्षक. शिक्षकेतर कर्मचारी.विद्यार्थी शिक्षक- पालक समिती मधील सर्व सदस्यांनी, तसेच सर्व गावकरी मंडळींनी उत्तीर्ण विद्यार्थी विद्यार्थिनींचे अभिनंदन केलेले आहे तसेच पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या आहेत.

# चांदूरबाजार तालुक्याचा दहावीचा निकाल ९४.६० टक्के

### २२ शाळांनी ठोकले गाठले शतक

**चांदूरबाजार** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने, दहावीचा ऑनलाईन निकाल जाहीर केला. यात चांदूरबाजार तालुक्याचा दहावीचा निकाल, ९४.६० टक्के इतका लागला आहे . २२ शाळांनी, निकालाचे शतक गाठले आहे. यावेळी २७२६ विद्यार्थ्यांपैकी, २५७९ विद्यार्थी परीक्षेत यशस्वी झाले आहेत. शंभर टक्के निकाल लागलेल्या शाळेमध्ये जी. आर. काबरा विद्यालय चांदूरबाजार, शंकर विद्यालय तळवेल, ढेवले विद्यालय खराला, आदर्श विद्यालय जवळा शहापूर ,हाजी शकूर उर्दू हायस्कूल शिरजगाव कसबा,एम आर देशमुख स्मृति हायस्कूल बोदड, जे. के खापरे विद्यालय थुगाव, माध्यमिक विद्यालय बेलज, मौलाना आझाद उर्दू हायस्कूल घाटलाडकी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय पिंपरी, नगर परिषद उर्दु विद्यालय चांदुर बाजार, त्रिवेणी संगम हायस्कूल तोंडगाव, पंचशील आदिवासी आश्रम शाळा कारंजा बहिरम, हजरत मुकबुल बाबा उर्दू हायस्कूल ब्राह्मणवाडा थडी, एपीजे अब्दुल कलाम उर्दू हायस्कूल खरपी, आर एल कोठारी इंग्लिश मीडियम स्कूल अबदलपुर, ऊरुज ए मिलाद उर्दू हायस्कूल शिरजगाव बंड, ज्ञानोदय विद्यामंदिर प्रल्हादपूर, ऑरेंज लाईन इंग्लिश स्कूल चांदूरबाजार, परशुराम विद्यालय सर्फापूर, निर्मिती पब्लिक स्कूल नानोरी, श्री संत गाडगेबाबा प्रायमरी इंग्लिश स्कूल करजगाव, या शाळांनी निकालाचे शतक ठोकले आहे.तसेच शंकरराव विद्यालय करजगाव ९१. ४६ टक्के, शामरावजी सोनार कन्या विद्यालय ९८.८२ टक्के, बालमुकुंद राठी विद्यालय शिरसगाव कसबा ९१. २१ टक्के, गंगाबाई गनोसकर विद्यालय शिरजगावं कसबा ९२. ८५ टक्के, कस्तुरबा माध्यमिक विद्यालय माधान ९० टक्के, श्री नागनाथ विद्यालय ब्राह्मणवाडा थडी ८९. १८ टक्के, शिवाजी महाविद्यालय शिरजगाव बंड ९७. २९ टक्के, श्री गुरुदेव चोघामाल मालू विद्यालय कुऱ्हा ८५ टक्के, शिवराय विद्यालय घाटलाडकी ८४. ५३ टक्के, व्यंकटराव कडु विद्यालय आसेगाव पूर्णा ८७. ८३, व्यंकटेश विद्यालय देउरवाड़ा ९०. ९० टक्के, नगर परिषद विद्यालय चांदुर बाजार ९५. ६५ टक्के, तुळशीरामजी मडगे कविठा ९८. २७, तिवसेकर विद्यालय सोनोरी ८८ टक्के, श्री गाडगे महाराज आश्रम विद्यालय नागरवाडी ९३. ३३ टक्के, सावित्रीबाई फुले विद्यालय हिरुळ कसबा ८३. ७८ टक्के, महाराष्ट्र विद्यालय राजना पूर्णा ८४. ८४ टक्के, जी एम पेठे विद्यालय ब्राह्मणवाडा थडी ९७. ५३ टक्के, जिजामाता विद्यालय चांदुर बाजार ८४ टक्के, देवकीनंदन विद्यालय सुरळी ९१. ६६ टक्के , श्री संत गुणवंत बाबा विद्यालय तळेगाव मोहना ८९. ८३ टक्के, कुरल पूर्णा विद्यालय, कुरळ पूर्णा ८८. ४६ टक्के, वसुंधरा विद्यालय दहिगाव पूर्ण ९०. ९० टक्के, शामकांत बोबडे विद्यालय विरूळ पूर्णा ८७. ५० टक्के, राणी लक्ष्मीबाई विद्यालय चांदुर बाजार ७७. ४१ टक्के, सरिफा बी उर्दू हायस्कूल करजगाव ९७. ३४ टक्के, अहिल्याबाई होळकर कन्या विद्यालय आसेगाव पूर्णा ९३.८४ टक्के, नारायण विद्यालय टाकरखेडा पूर्ण ५० टक्के, स्वर्गीय द्रोपदाबाई देशमुख कन्या विद्यालय बेलोरा ८४. ७८ टक्के, अलखैर उर्दू हायस्कूल तळेगाव मोहना ९५. ५५ टक्के, दौलतराव सितारामजी काळे विद्यालय ९६. ६६ टक्के, अ यम उर्दू हायस्कूल थुगाव पिपरी ९४. ७३ टक्के, पुण्यश्लोक अहिल्यादेवी आश्रम शाळा बोराळा ९५ टक्के, शाहिद पी.वाय. दिंडेकर निवासी मूकबधिर माध्यमिक विद्यालय ९६ टक्के, याप्रमाणे इतर शाळांचा निकाल लागला आहे.

## संस्कृती सोळंके हिने मिळविले घवघवीत यश

**अमरावती** -सर्वसामान्य कुटुंबातिल व आई वडिलांच्या अपार मेहनत व मार्गदर्शनात वाढलेली व माध्यमिक विद्यालय परलाम ता.भातकुलीची विद्यार्थीनी परलाम सारख्या छोट्याश्या गावातील संस्कृती अतुल सोळंके (पाटील) हिने SSC परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आणि सुविधांचा अभाव असताना संस्कृतीने अभ्यास करत मेहनत व जिद्दच्या बळावर ध्येय गाठले त्यात तिचे आई वडील यांचा खूप मोठा त्याग आहे कुटुंबातील पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी स्वतः कष्ट करत असतात यशासाठी पैशापेक्षा चिकाटी आणि कठोर परिश्रम जास्त महत्त्वाचे आहेत हे संस्कृतीने आज दाखवून दिले.ग्रामीण भागात राहून तिने अफाट मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर हे यश मिळवले.तसेच तिच्या आईच्या मेहनत, मार्गदर्शन आणि संस्कारांचे तिने खऱ्या अर्थाने आज चीज केले सोबतच शाळेतील शिक्षकांचे बहुमोल मार्गदर्शन तिला लाभले त्यामुळे तिला एएण परीक्षेत ९०.२०% गुण मिळाल्याबद्दल तिचे माध्यमिक विद्यालय परलामच्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व स्थरातून अभिनंदन होत आहे.



## शांतीदेवी पब्लिक स्कूलची संपूर्ण यशाची परंपरा कायम

**अमरावती/का.प्र.**

शहरात १९९५ पासून सतत कार्यरत असणारी तसेच शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थी विद्यार्थिनींना उत्कृष्ट योगदान देणारी महिला संचालित संस्था श्रीमती शांतीदेवी एज्युकेशन सोसायटी अंतर्गत शांतीदेवी पब्लिक स्कूल प्रशांत नगर, अमरावती. मध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही सगळ्यांना सूचित करण्यात आनंद होत आहे की सत्र २०२५ -२६ च्या बोर्डाचा परीक्षेचा निकाल १००% sलागला असून विद्यालयाने आपल्या यशाची परंपरा कायम ठेवलेली आहे .विद्यालयाने बोर्डाचा निकाल शंभर टक्के लावला असून ही परंपरा आता अखंडित राहिलेली आहे . शाळेतून प्रथम क्रमांकावर इशिता प्रमोद वानखडे ९५.४०% ,द्वितीय क्रमांक तृप्ती हरीश वाघमारे ९२.४०% तसेच तृतीय क्रमांक कृष्णा विनोद सावरकर ९२.२०% यांनी मिळविला आहे.विद्यालयाच्या या यशस्वी परंपरेत शांतीदेवी एज्युकेशन सोसायटी संस्थापक आदरणीय दिलीप गणेश मुदलियार सर तसेच संस्था सचिव दुर्गेश्वरी दिलीप मुदलियार यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.या यशाचे मानकरी मुख्याध्यापिका, शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन . तसेच सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना हार्दिक



अभिनंदन तसेच त्यांच्या यशस्वी वाटचाली करता त्यांना भरपूर शुभेच्छा. सत्र २०२६- २७ करिता प्रवेश सुरू झालेले आहेत तरी कृपया पालकांनी लवकरात लवकर आपले प्रवेश करून घ्यावे.

## श्री देवरावदादा हायस्कूलचे पूर्वा पखाले व नैतिक आमले प्रथम

**तिवसा**-येथील श्री देवरावदादा हायस्कूलचा दहावीचा निकाल ८१.६५ङलागलेला आहे. दहावीला एकुण १६९ विद्यार्थी होते त्यापैकी १६९ विद्यार्थीपरीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी नैतिक उमेशराव आमले व पूर्वा हेमंत पखाले यांनी ८८.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. प्राविण्य श्रेणीत २३ विद्यार्थी व प्रथम श्रेणीत ४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.तर दिशा गजानन लांडे ८७.४०%घेवून दुसरी व आयुष सुधीरराव सोमवंशी ८६.४०%गुण घेऊन विद्यालयात



गुणानुक्रमे तिसरा आलेला आहे. अशा पध्दतीने विद्यालयाने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.या अभुतपुर्व यशाबद्दल श्री गणेश दास राठी छात्रालय समिती अमरावती चे अध्यक्ष वसंतबाबु मालपाणी,संस्थेचे उपाध्यक्ष जुगलकिशोर गट्टाणी,सचिव डॉ गोविंद जी लाहोटी, कोषाध्यक्ष प्रकाश जी हेडा,सहसचिव मोहन कुमार कलंत्री, प्रशासकीय अधिकारी डॉ आभा लाहोटी, महाविद्यालयाचे प्राचार्य चौधरी, पटेल पंचारीया,पवन हेडा ,वर्ग शिक्षक तायडे,गांधी व तालन ,जोशी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पैशाच्या वादातून उत्सव मेळयात पश्चिम बंगालच्या व्यापाऱ्याची हत्या

## सायन्स कोर मैदानावर तणाव; हिंदुत्ववादी संघटना आक्रमक, एका आरोपीला अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सायन्स कोर मैदानावर सुरू असलेल्या 'उत्सव मेळ्या'त शुक्रवारी रात्री पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादाचे पर्यावसान हत्येत झाले. पश्चिम बंगालमधील वर्धमान येथील ५३ वर्षीय व्यापारी अभिजीत सुकुमार कर यांची हत्या करण्यात आली. उत्सव मेळ्यातील अंतर्गत वादातून आरोपीने व्यापाऱ्याच्या पोटात चाकूने सपासप वार केले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर शनिवारी शहरात तणावपूर्ण शांतता असून, हिंदुत्ववादी संघटनांनी उर्वरित आरोपींच्या अटकेसाठी आंदोलन पुकारल्याने सायन्स कोर परिसराला छावणीचे स्वरूप आले आहे. पोलिसांनी याप्रकरणी मुख्य आरोपीला जेरबंद केले असून सुरक्षिततेचा उपाय म्हणून सध्या हा उत्सव मेळा सील करण्यात आला आहे.

सायन्स कोर मैदान परिसरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त सुरक्षेच्या दृष्टीने लावण्यात आला. अभिजीत सुकुमार कर



(वय ५३, वर्धमान, पश्चिम बंगाल) असे मृतक व्यापाऱ्याचे नाव आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी अजीज खान युसुफ खान (वय ३८, रतनगंज )याला ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून उत्सव मेळयाला सील केले आहे. तक्रारदार तमरेज आलम मोहम्मद इक्बाल (रूडकी, पश्चिम बंगाल) यांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्सव मेळया मध्ये त्यांनी झोके लावले आहे. गुरुवारी रात्री ते मजुरांसोबत तेथेच होते. त्यावेळी आरोपी अजिज खान तिथे आल, त्याने व्यापारी अभिजीत कर यांना शिवीगाळ केली. वाद वाढल्याने आरोपीने कमरेमधील चाकू काढून अभिजीत कर यांच्या पोटात सपासप वार केले. या हल्ल्यात अभिजीत गंभीर जखमी झाले, तिथे उपस्थित मजुरांनी त्यांना तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल केले. जिथे उपचारा दरम्यान ☞(पान २ वर)

# खंडवा मार्गावर कार उलटून 'स्पा' संचालकाचा मृत्यू

## मौजमस्ती दरम्यान स्टिअरिंगला लागला धक्का; कार तीनदा पलटी

### दोन तरुणींसह चालक जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** उज्जैन येथे दर्शनासाठी निघालेल्या अमरावतीतील एका तरुणाच्या प्रवासाचा अत्यंत भीषण शेवट झाला आहे. अमरावती-खंडवा राष्ट्रीय महामार्गावरील गुंडी जवळ 'नेक्स्ट लेव्हल' मॉल मधील स्पा संचालक गौतम राजेश सेवानी (वय २३) यांच्या कारला भीषण अपघात झाला. धावत्या कारमध्ये मौजमस्ती सुरू असताना अचानक स्टिअरिंगला धक्का लागल्याने कारचे नियंत्रण सुटले आणि ती तब्बल तीनदा उलटली. या





भीषण अपघातात गौतम यांचा जागीच मृत्यू झाला असून, कारमधील चालक आणि दिल्ली येथील दोन तरुणी किरकोळ जखमी झाल्या आहेत. या घटनेवरून उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

अधिक माहितीनुसार, उज्जैन दर्शनासाठी जाणाऱ्या स्पा संचालकाची कार खंडवा अमरावती राष्ट्रीय महामार्गावर गुंडी मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती समोर स्टिअरिंगला धक्का लागल्याने पलटी झाली. यामध्ये संचालक गौतम राजेश सेवानी (वय २३) यांचा जागीच मृत्यू झाली☞(पान २ वर)

# प्रसिद्ध व्याख्याते भावेश भाटिया यांचे सोमवारी अमरावतीत व्याख्यान

### तरुण उद्योजकांसाठी उलगडणार प्रेरणादाई जीवन प्रवास

**अमरावती/प्रतिनिधीः-** शून्यातून विश्व निर्माण करणारे आणि केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर उद्योजकतेचे शिखर गाठणारे प्रसिद्ध मोटिव्हेशनल स्पीकर भावेश भाटिया यांचे परवा, ११ मे सोमवार रोजी अमरावतीत आगमन होत आहे. शहरातील सांस्कृतिक भवन येथे सायंकाळी ६.३० वाजता त्यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले असून, या निमित्ताने अमरावतीकरांना एका विलक्षण जीवनप्रवासाचा साक्षीदार होण्याची संधी मिळणार आहे.



आज दुपारी आयोजित एका पत्रकार परिषदेत शाश्वत कॉन्सेप्ट स्कूलचे संचालक अतुल गायगोले यांनी माहिती दिली की, हा कार्यक्रम केवळ व्याख्यानापुरता मर्यादित नसून यात सामाजिक ऋणाची जोडही दिली जाणार आहे. दिवंगत अशोक गायगोले यांच्या जयंतीनिमित्त, दिशा इंटरनॅशनल आय बँक ला एक अद्ययावत रुग्णवाहिका (ॲम्बुलन्स) भेट देण्यात येणार आहे.आयोजनात अमरावती मॅनेजमेंट असोसिएशन , क्रेडाई , महाराष्ट्र केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन, मराठा उद्योजक कक्ष, घरकुल मसाले, विदर्भ महारोगी सेवा मंडळ (तपोवन), प्रयास, सेवांकुर, समर्पण प्रतिष्ठान, शाश्वत कॉन्सेप्ट स्कूल आणि सुशीलाबाई सुरवंशी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, संत गाडगे महाराज रक्तपेढी, वंदे मातरम रक्तदान समिती आणि चाणक्य फाउंडेशन या संस्थांचा सक्रिय सहभाग आहे.भावेश भाटिया हे 'सनराईज कँडल्स' या कोट्यवधींच्या उलाढाली असलेल्या कंपनीचे संस्थापक आहेत. दृष्टी गमावलेली असतानाही त्यांनी ज्या जिद्दीने उद्योग उभा केला, तो प्रवास तरुणांसाठी आणि उद्योजकांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. 'अडचणींवर मात करून यशाची शिखरे कशी सर करावीत,' या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत. या पत्रकार परिषदेला डॉ. अविनाश सावजी, नीलेश ठाकरे, रंजीत बंड, प्रकाश बनारसे, स्वप्निल गावंडे, तुषार वरणगांवकर, संजय शेळके, रवि पाटिल, अमित वसु, अभिषेक देशमुख,अतुल गायगोले आदि उपस्थित होते. अमरावतीतील प्रबुद्ध नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी आणि उद्योजकांनी या व्याख्यानाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# औषध विक्रेत्यांचा देशव्यापी बंद २० रोजी



## ऑनलाईन औषध विक्रीला विरोध

**अमरावती/प्रतिनिधीः-** अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कॉर्पोरेट द्वारा अव्यवसायिक स्पर्धेच्या विरोधात बुधवार २० मे रोजी देशव्यापी बंद पुकारला आहे. एमएससीडीएच्या आज शनिवार ९ मे रोजी झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेला आहे. बैठकीत अध्यक्ष जगन्नाथ शिंदे म्हणाले की, औषध व्यवसाय हा ड्रग अँड केमिस्ट १९४० व १९४५ अंतर्गत चालवला जातो. ऑनलाईन औषध विक्री बाबत ड्रग्स अँड कमर्शिअल ॲक्ट मध्ये कोणतीही तरतूद नाही. केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाइन औषध विक्री बाबत जीएसआर २८ ऑगस्ट २०१८ अंतर्गत नोटिफिकेशन जारी केले होते. परंतु त्यांचे अघाप कायद्यात रूपांतरण झालेले नसताना देशभरात बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरू आहे. याबाबत दिल्ली उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल असून न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगिती दिलेली आहे. याकडे सरकार दुर्लक्ष करत आहे. संघटनेने ☞(पान २ वर)

# ९ कोटींच्या निधी गैरवापर प्रकरणाने यवतमाळ न.प. हादरली

## मुख्याधिकारी क्यातमवार रजेवर, बदलीच्या चर्चांना उधाण

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** यवतमाळ नगर परिषदेत सध्या प्रशासकीय अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असून, विकासकामांच्या निधीच्या कथित गैरवापर प्रकरणामुळे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार वादाच्या केंद्रस्थानी आले आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या ९ कोटी रुपयांच्या विशेष निधीच्या विनियोगावरून सुरू झालेला वाद आता विधानसभेपासून नगर परिषदेच्या दैनंदिन कामकाजापर्यंत पोहोचला आहे.

शहरातील क्षतिग्रस्त अंतर्गत रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाने हा विशेष निधी मंजूर केला होता. मात्र, नियमानुसार शहरातील मुख्य रस्त्यांवर खर्च होणे अपेक्षित असताना, हा निधी शहराबाहेरील काही लेआऊटमधील रस्त्यांच्या कामांकडे वळवण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकारामुळे नगर परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणाची दखल घेत आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी विधानसभेत मुद्दा उपस्थित करत संबंधित मुख्याधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, मुख्याधिकारी क्यातमवार यांच्यावर कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, निलंबनाची शक्यता ☞(पान २ वर)

# समग्र शिक्षाचे विजय दामले यांचे हृदय विकाराने निधन

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** समग्र शिक्षा अभियान जिल्हा अकोलाचे माजी जिल्हाध्यक्ष विजय बापुराव दामले (वय ५१) यांचे आकस्मिक हृदय विकाराचे झटक्याने दिनांक ९ मे रोजी निधन झाले. आझाद मैदान मुंबई येथील समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांचे आंदोलन दिनांक ९ मार्च २०२६ पासून सुरू आहे. दीर्घकाळ आझाद मैदानावरील आंदोलनात विजय दामले यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. प्रकृती अस्वास्थ्यमुळे ते घरी परतले असता अचानक हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे ९ में रोजी सकाळी साडे सात वाजता निधन झाले.

विजय दामले हे गटसाधन केंद्र धारणी येथे विषय साधनव्यक्ती पदावर कार्यरत होते. यापूर्वी त्यांनी अंजनगाव, अकोट येथे सेवा ☞(पान २ वर)












# सारांश

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

रविवार, १० मे २०२६ E-paper - www.janmadhyam.com


# रक्ताची 'बंगाली' चटक

## हिंसाचाराच्या आगीत होरपळणारा बंगाल

एका बाजूला ममता बॅनर्जी यांचा पराभवानंतरचा थयथयाट आणि दुसऱ्या बाजूला प्रशासनाच्या निर्नायकीचा फायदा उचलून समाजकंटकांनी घातलेला गोंधळ, हिंसाचाराचा आगडोंब हे पश्चिम बंगालच्या बहुचर्चित व वादग्रस्त विधानसभा निवडणुकीचे वेदनादायी कवित्व आहे. ही हिंसा अजिबात अनपेक्षित नाही. तथापि, तिचे स्वरूप वेगळे आहे. निवडणुकीत धक्कादायक पराभव झाल्यानंतर तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते नैराश्यापोटी हिंसा घडवून आणतील, असा अंदाज होताच. काही ठिकाणी ते नैराश्य दिसूनही आले. पण, त्यासोबतच भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष साजरा करताना उन्मादात हिंसा घडविली, राजधानी कोलकाता व अनेक जिल्ह्यांमध्ये तृणमूलच्या कार्यालयांची तोडफोड केली. अल्पसंख्याकबहुल वस्त्यांवर हल्ले झाले. प्रत्युत्तरात





तृणमूलच्या टोळ्यांनी भाजप कार्यकर्त्यांवर हल्ले चढविले. या हिंसाचारात आतापर्यंत चौघांचा मृत्यू झाला आहे आणि त्यात भाजप व तृणमूलचे प्रत्येकी दोन कार्यकर्ते आहेत. बुधवारी रात्री भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे तरुण स्वीय सहायक चंद्रनाथ रथ यांची कोलकाताजवळच्या मध्यमग्राम येथे अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडून हत्या केली. या हत्येमागेही राजकीय वैमनस्य असल्याचा आरोप होत आहे.

'आम्ही पश्चिम बंगालमधील निवडणूक हिंसाचार कमी करून दाखवला', असा दावा करणारे भाजपचे नेते या हत्येमुळे चिंतित आहेत. पक्षाच्या कार्यकर्त्यांना तृणमूल कार्यकर्त्यांपासून संरक्षण देण्यात पक्षाचे नेते कमी पडत असल्याचा आरोप होऊ लागला आहे. निवडणुकीच्या काळात निमलष्करी दलाचे जवळपास पावणेतीन लाख जवान हिंसाचार रोखण्यासाठी तैनात करण्यात आले होते. त्या जवानांच्या कंपन्या अजूनही बंगालमध्येच आहेत आणि काही ठिकाणी त्या जवानांच्या हजेरीतच तोडफोड व जाळपोळ होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे बंगालमधील हिंसाचाराची तुलना ईशान्य भारतातील मणिपूरच्या हिंसाचाराशी केली जात आहे. खरेतर, तशी ती व्हायला नको. यावेळची विधानसभा निवडणूक तृणमूलचा पराभव व भाजपचा विजय या कारणाने वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण ठरली खरे. परंतु, नव्या सत्ताधाऱ्यांपुढे हिंसाचाराचा डाग पुसण्याचे आव्हान किती मोठे असेल, याची ही चुणूक आहे. कारण, बंगालमधील हिंसाचार या निवडणुकीपुरता आणि भाजप किंवा तृणमूल या पक्षांपुरता मर्यादित विषय नाही. स्वातंत्र्यानंतरच्या सगळ्याच लोकसभा, विधानसभा निवडणुकांमध्ये आणि अगदी जिल्हा परिषद, ग्रामपंचायत यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही हिंसा झाली नाही, असे कधीच घडले नाही.बंगालच्या राजकारणाला जणू रक्ताची चटक लागली आहे. काही किरकोळ राजकीय पक्ष भलेही शांततेचा दावा करोत, या राजकीय हिंसेला कोणताही पक्ष प्रत्यक्षात अपवाद नाही. किंबहुना, सत्तेवर आलेला पक्ष अधिक हिंसा घडवितो, असा आतापर्यंतचा अनुभव आहे.

**बंगालच्या राजकारणाला जणू रक्ताची चटक लागली आहे. काही किरकोळ राजकीय पक्ष भलेही शांततेचा दावा करोत, या राजकीय हिंसेला कोणताही पक्ष प्रत्यक्षात अपवाद नाही. किंबहुना, सत्तेवर आलेला पक्ष अधिक हिंसा घडवितो, असा आतापर्यंतचा अनुभव आहे. साडेतीन दशके डाव्यांची सत्ता होती तेव्हा ते एका हातात शस्त्र किंवा बॉम्बगोळे आणि दुस-या हातात पक्षाचा झेंडा घेऊन सत्ता राबवत होते.**

साडेतीन दशके डाव्यांची सत्ता होती तेव्हा ते एका हातात शस्त्र किंवा बॉम्बगोळे आणि दुस-या हातात पक्षाचा झेंडा घेऊन सत्ता राबवत होते. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने डाव्यांची सद्दी संपविली आणि शस्त्राचा हात व झेंड्याचा रंग बदलला इतकेच. गेली पंधरा वर्षे प्रत्येक निवडणुकीत जाळपोळ, तोडफोड, रक्तपात होत राहिला. ममता बॅनर्जी विरोधकांवर आरोप करीत राहिल्या. आता ममता बॅनर्जींच्या गुंडांना उलटे टांगून सरळ करण्याचा शब्द देत भारतीय जनता पक्ष सत्तेत आला आहे. गुंडांच्या टोळ्या आता भाजपचे झेंडे घेऊन तृणमूल काँग्रेसची कार्यालये फोडत आहेत. भाजपचे प्रदेश अध्यक्ष समिक भट्टाचार्य, मुख्यमंत्री बनू पाहणारे सुवेंदू अधिकारी यांनी पक्षावरील हिंसाचाराचा आरोप फेटाळला आहे. आमचे झेंडे घेऊन गुंडांच्या टोळ्या हिंसा घडवित असल्याचा प्रत्यारोप हे नेते करीत आहेत.

नवी विधानसभा शुक्रवारी अस्तित्वात येईपर्यंत प. बंगालची कायदा-सुव्यवस्था ही केंद्रीय निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे.

निवडणुकीआधी निष्पक्षपणाचा हवाला देत आयोगानेच राज्याचे मुख्य सचिव व पोलिस महासंचालक बदलले होते. त्यामुळे आयोगावरील शांततेची जबाबदारी आणखी वाढते.

अर्थात, निवडणूक आयोगाला या हिंसाचाराबद्दल जबाबदार धरण्याची कोणतीही व्यवस्था देशात नाही. राजकीय पक्षांना मात्र हात झटकता येणार नाहीत. उद्या सत्तेत येणा-या भाजपला हिंसा का घडली आणि भविष्यात ती थांबणार आहे की नाही, याचे उत्तर द्यावेच लागेल. सत्तांतरानंतर तरी बंगालमधील राजकीय हिंसाचाराचा डाग पुसला जातो की, आधीच्या हिंसेविरुद्ध रान पेटविणारे नवे सत्ताधारीदेखील आधीच्या सगळ्याच सत्ताधाऱ्यांप्रमाणे सत्ता राबविण्यासाठी, टिकविण्यासाठी हिंसेचाच आधार घेतात हे लवकरच कळेल.



# आमच्या संधी मारल्या ही मतलबी ओरड कशासाठी?

रक्षणांतर्गत उपवर्गीकरणाच्या चर्चेने महाराष्ट्रात सध्या उग्र स्वरूप धारण केले. अनुसूचित जातीतल्या संख्येने मोठ्या असलेल्या दोन जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात आणि बाजूने, विविध माध्यमांमध्ये एकमेकांवर अत्यंत त्वेषाने तुटून पडत आहेत. उपवर्गीकरणावरून भांडणाऱ्या या जातींना हे दाखवून देणे गरजेचे आहे की ते नक्की किती टक्क्यांसाठी आणि का भांडत आहेत. त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेला अनुसूचित जातींसाठीच्या आरक्षणाचा रोजगारातील खरा टक्का किती आहे ते समजून घेतले पाहिजे.

इथल्या जातिवादी व्यवस्थेने शतकानुशतके पशुपेक्षाही हीन असे

**खुल्या वर्गातील लोकांची (मुस्लिम धरून) लोकसंख्या अंदाजे २५ टक्के. म्हणजे, या २५ टक्के खुल्या वर्गातील लोकांना ९८ टक्के रोजगार उपलब्ध आहेत, तर ७५ टक्के बहुजनांना फक्त २ टक्के. मग आमच्या संधी मारल्या ही मतलबी ओरड कशासाठी?**

अस्पृश्यतेचे जीवन ज्या लोकांवर लादले त्या महाराष्ट्रातील पूर्वास्पृश्य ५९ जातींना व्यवस्थेत प्रतिनिधित्व, संधी, न्याय देण्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात, म्हणजे १३ टक्के आरक्षण संविधानाने लागू केले. हे आरक्षण फक्त सरकारी क्षेत्रातच उपलब्ध आहे. सरकारी क्षेत्रात आरक्षणाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार असलेल्या यंत्रणेवर कट्टर आरक्षण-विरोधकांचा ताबा राहिल्याने अनुसूचित जातींच्या (खरे तर आरक्षणाच्या सर्वच लाभधारक जातींच्या) लोकांसाठी असलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी करताना त्यांचा दृष्टिकोन कायम पूर्वग्रहदूषित राहिलेला आहे.

तसेच, शक्यतो या जागा भरल्याच जाऊ नयेत किंवा कमी भरल्या जाव्यात यासाठी त्यांच्या लटपटी चालू असतात, हे वेळोवेळी उजेडात आलेल्या बॅकलॉगच्या मोठ्या आकड्यांवरून लक्षात येते.

एकेकाळी रोजगाराच्या बाबतीत समृद्ध असलेले सरकारी क्षेत्र १९९१ साली आलेल्या 'खाउजा' धोरणामुळे आक्रसू लागले. २०१४ साली सत्तेत आलेल्या संघ पुरस्कृत भाजप सरकारने तर सरकारी उपक्रम, उद्योग विकण्याचा, सरकारी कामांचे कंत्राटीकरण, आऊटसोर्सिंग करण्याचा सपाटाच लावल्यामुळे हे क्षेत्र एवढे रोडावले आहे की सध्या या सरकारी क्षेत्रातील रोजगाराचा एकूण रोजगारात वाटा उरला आहे अंदाजे चार टक्के. उर्वरित ९६ टक्के रोजगार खासगी क्षेत्रात आहेत.

सरकारी क्षेत्रातील रोजगारांपैकी निम्मा म्हणजे ५० टक्के रोजगार आरक्षित (अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी आणि अन्य) असतो, कारण सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा साहनी खटल्यातील निर्णयानुसार आरक्षणावर ५० टक्क्यांची मर्यादा घातलेली आहे. उर्वरित ५० टक्के रोजगार खुल्या वर्गासाठी असतो.

याचा अर्थ, एकूण रोजगाराच्या तुलनेत या चार टक्के असलेल्या सरकारी रोजगारात दोन टक्के आरक्षित आणि दोन टक्के खुल्या प्रवर्गासाठी असे प्रमाण पडते. त्यात अनुसूचित जातींसाठी १३ टक्के आरक्षण आहे. म्हणजे एकूण रोजगारात ५९ अनुसूचित जातींसाठी राखीव जागा आहेत फक्त ०.५२ टक्का. यावरून हे स्पष्ट होते की १३ टक्के लोकसंख्या असलेल्या अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व, संधी, न्याय वगैरे देण्यासाठी रोजगार उपलब्ध आहे .

फक्त ०.५२ टक्के. मग साधे अंकगणित मांडले तर प्रश्न असा पडतो, हा सध्याचा ०.५२ टक्का रोजगार अनुसूचित जातींना त्यांच्या १३ टक्के लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व, संधी, न्याय वगैरे देतो का? हा आकडा एवढा कमी का? यातून आरक्षणाचा उद्देश कसा सफल होणार?

या सरकारी क्षेत्रातल्या आरक्षित जागांवर अनुसूचित जातींचे लोक येऊ नयेत म्हणून की काय, नोकर भरती जवळपास बंद किंवा अत्यल्प प्रमाणात होत असल्याने नवीन रोजगार फारसे उपलब्ध नाहीत. याशिवाय आरक्षण हा जुलमाचा रामराम वाटत असल्याने बऱ्याच आरक्षित जागा जाणीवपूर्वक रिक्त ठेवल्या जातात.

# प्रादेशिक पक्षांचा दिवा विझण्याच्या मार्गावर

पाच राज्यांच्या निवडणूक निकालांकडे दोन रीतीने पाहता येऊ शकते. एक म्हणजे भाजपच्या बाजूने आणि दुसरे विरोधकांच्या बाजूने. विरोधक म्हणून सत्ता कशी मिळवावी आणि सत्ताधारी असताना ती वर्षानुवर्षे कशी राखावी याचा धडा भाजपने पुन्हा एकदा या निवडणुकीतून घालून दिला आहे.

बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला हरवण्यासाठी भाजपचे प्रयत्न गेल्या पाच सात वर्षापासून चालू आहेत. यावेळी त्यांनी अभूतपूर्व अशी ताकद लावली. हिंदुत्वाचा मुद्दा होताच. त्याला पूरक ठरेल अशी मतदार परीक्षणाची मोहीम निवडणूक आयोगामार्फत हाती घेतली. यामुळे बंगालमध्ये बेकायदा बांगलादेशी मतदार असल्याचा खूप मोठा बोभाटा करण्यात आला. निवडणूक आयोगाच्या या कार्यक्रमावर सर्वोच्च न्यायालयाकडून शिक्कामोर्तब होईल याची काळजीही भाजपच्या महाधिवक्त्यांनी व कायदेशीर सल्लागारांनी घेतली.

नंतर नरेंद्र मोदी व अमित शहा यांनी झंझावाती प्रचार करून हिंदू विरुद्ध मुस्लिम असे वातावरण तयार होईल अशी व्यवस्था केली. ममता बॅनर्जींनी गेल्या वेळी माँ, माटी, मानुष म्हणत अत्यंत यशस्वीपणे बंगाली अस्मितेचा प्रभावी वापर केला होता. पण यावेळी ही अस्मिता निष्प्रभ होऊन हिंदू अस्मिता प्रबळ व्हावी यासाठी भाजपने जबर प्रयत्न केले व ते अखेर यशस्वी झाले.

या प्रयत्नांमधून त्यांनी बंगालसारखे अवघड राज्य ममतांच्या हातातून खेचून आणले, तर शेजारच्या आसाममध्ये याच मुद्द्यावर त्यांनी विरोधकांना कोंडीत पकडले व पुन्हा एकदा सत्ता मिळवली.

केरळमध्ये भाजपला यश मिळाले नसले तरी निवडणूक प्रचारात भाजप हाच प्रचाराचा मध्यवर्ती मुद्दा होता. कम्युनिस्ट व काँग्रेस हे दोन मुख्य प्रतिस्पर्धी पक्ष एकमेकांवर भाजपची बी टीम असल्याचा आरोप करीत होते. दहा वर्षे सत्तेत असलेल्या डाव्यांना आपल्या राज्यकारभाराच्या आधारे किंवा केलेल्या कामांच्या आधारे मते मागता आली नाहीत. त्यासाठी त्यांना भाजपचा आधार घ्यावा लागला. डाव्यांचा परंपरागत विरोधक म्हणून काँग्रेसने बाजी मारली असली तरी वेगळ्या प्रकारे सरकार चालवण्याची कोणतीही योजना त्यांनी लोकांसमोर मांडलेली नाही. याउलट भाजप मात्र केरळी राजकारणात आजवर नसलेले हिंदू संस्कृतीचे मुद्दे हळूहळू प्रस्थापित करीत चालला आहे. शबरीमालाच्या मंदिरातील प्रवेशावरून चाललेला वाद किंवा केरळात नुकताच भरवण्यात आलेला कुंभमेळा, नायर समाजामध्ये घडवून आणलेली फूट ही त्याची उदाहरणे आहेत.

तमिळनाडूमध्ये याच रीतीने शिरकाव करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी कधी अण्णा द्रमुकला सोबत घेऊन तर कधी स्वतंत्रपणे

**प्रादेशिक पक्षांचे राजकारण गेल्या काही काळापासून कमजोर झाले होतेच. चार मेच्या निवडणूक निकालांनी याला आणखी एक धक्का दिला आहे. यातून सावरणे हे विरोधकांसाठी सोपे नसेल.**



राजकारण करून भाजपची वाटचाल चालू आहे. आज तमिळनाडूमध्ये भाजपला यश मिळाले नसले तरी ते तेथे कधीच शिरकाव करू शकणार नाहीत असा दावा द्रवीड पक्षही करू धजावणार नाहीत. कारण त्यांना भविष्य दिसते आहे. इतकी आपली राजकीय चर्चा होईल याची तजवीज भाजपने केली आहे. शेजारच्या केरळमध्ये सत्तेतून जाताच आज अनेकांनी कम्युनिस्ट पक्षाचे मृत्युलेख लिहिले आहेत. तमिळनाडू किंवा केरळमधील भाजपबाबत असे कोणी करू शकणार नाही.

आपला कार्यक्रम, प्रचाराचे मुद्दे याबाबतची स्पष्टता व रेटून नेण्याचा ठामपणा अथवा निर्धार ही भाजपची वैशिष्ट्ये आहेत. यांना तोंड देऊ शकण्याची क्षमता विरोधकांमध्ये कमी होत चाललेली आहे. काँग्रेस अजूनही इंदिरा गांधींच्या जमान्यातल्या मानसिकतेमध्ये आहे. विरोधकांपैकी केवळ ममतांचा तृणमूल, तमिळनाडूमधील द्रमुक आणि केरळमधील सत्तेच्या बळाने उभे असलेले डावे हेच भाजपच्या या झंझावातासमोर स्थानिक पातळीवर काही आव्हान निर्माण करू शकण्याच्या स्थितीत होते. पण या निवडणुकीतून याच पक्षांवर घाला पडला आहे. त्यामुळे विरोधकांची आघाडी आणखी दुबळी झाली आहे.

यातून सावरणे विरोधकांना सोपे जाणार नाही. भाजप आपल्या राजकीय विरोधकांना प्रतिस्पर्धी न मानता शत्रू मानतो. शत्रूचा पूर्ण निःपात करणे हेच त्यांचे ध्येय असते. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांची राष्ट्रवादी व ठाकरे यांची शिवसेना ही निष्प्रभ झाली तरीही अजूनही त्यांचे आमदार फोडले जाणार, अशा बातम्या येत असतात. यामागचे इंगित हेच आहे. बंगालमध्ये ममता व तमिळनाडूतील स्टालीन यांचे पक्ष तर अजूनही बऱ्याच मजबूत स्थितीत आहेत. अशा स्थितीत हे पक्ष फोडणे किंवा त्यांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लावणे हे प्रकार येत्या काळात सुरू होतील. जेणेकरून २०२९ च्या लोकसभा निवडणुकांपर्यंत विरोधकांची ताकद आणखी क्षीण होईल.

आजच्या निवडणुकांकडे विरोधी पक्षांच्या नजरेतून पाहायचे झाल्यास दोन-तीन रुपेरी किनारी दिसतात. एक म्हणजे बंगालमध्ये भाजपने युद्धासारखी स्थिती निर्माण करूनही ममतांचा पक्ष भुईसपाट वगैरे झालेला नाही. हा मजकूर लिहीत असताना ममतांना किमान ८० किंवा अधिक जागा मिळतील असे चित्र आहे. बंगालमध्ये मोदींनी २९, तर शहा यांनी ३९ सभा घेतल्या होत्या. शिवाय, मतदार परीक्षणाच्या निमित्ताने ममता व काँग्रेसच्या लक्षावधी मतदारांना काढून टाकले गेले. प्रचारात भाजपने प्रचंड पैसा व ताकद वापरली. तरीही ममता यांनी त्याला चांगली टक्कर दिली.

ममता बॅनर्जी या रस्त्यावर लढणाऱ्या कार्यकर्त्या आहेत. पूर्वी त्यांनी याच वैशिष्ट्याच्या जोरावर डाव्यांची ३४ वर्षांची सत्ता उलथून टाकली होती. आता त्या पुन्हा विरोधी पक्षनेत्याच्या भूमिकेत शिरून सरकारला सळो की पळो करतील यात शंका नाही. शिवाय आता त्या सत्तेत नसल्याने कम्युनिस्ट व काँग्रेस या विरोधकांना त्यांच्याशी जुळवून घेणे अधिक सोपे जाईल.

तमिळनाडूमध्ये द्रमुकला धक्का बसला आहे. भूतकाळात अनेकदा अण्णा द्रमुककडून द्रमुकचा याच रीतीने पराभव झाला असला तरी यावेळी अभिनेता विजय यांच्या पक्षाचा उदय ही मोठी घटना आहे. विजय यांनी पेरियार व आंबेडकरांची नावे घेऊन द्रमुकचीच विचारसरणी अंगिकारली आहे. भाजप हा आपला वैचारिक विरोधक आहे, असे विजय यांनी जाहीर केले आहे. इथून पुढे सत्तेत आल्यावर विजय यांना केंद्रातील भाजपच्या सत्तेशी जुळवून घ्यावे लागेल. यापूर्वी एमजी रामचंद्रन, जयललिता किंवा करुणानिधी यांनी हेच केले होते. विजय यांना राजकारणाचा व कारभाराचा कोणताही अनुभव नाही. अशा स्थितीत द्रमुक विरोधी पक्ष म्हणून प्रभावी कामगिरी करू शकेल.

केरळमध्ये सत्ता गेली असली तरी डावे तेथे संपलेले नाहीत. कारण तेथील त्यांची संघटना मजबूत आहे. बंगालपेक्षा तेथील डाव्यांची स्थिती भिन्न आहे. शिवाय त्या राज्याची जनताही अधिक जागृत आहे. म्हणूनच तिने अजूनही भाजपला थारा दिलेला नाही. अशा स्थितीत काँग्रेस व डावे यांना हुशारीने डावपेच लढवावे लागतील. एकमेकांविरुद्ध लढत असतानाच भाजपचा शिरकाव होणार नाही याची खबरदारी घ्यावी लागेल. या निवडणुकांनंतरही भाजपला केरळी मतदारांनी तिय्यम स्थानावर ठेवले आहे. ही काँग्रेस व डाव्यांनी सुवर्ण नाही तरी किमान चांगली संधी मानली पाहिजे.ममतांचा तृणमूल व द्रमुक हे प्रादेशिक अस्मितेचे राजकारण करणारे मजबूत पक्ष होते. आज भाजपच्या हिंदुत्वाने त्यांना शह दिला आहे. हेच महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत घडले होते. आंध्रमध्ये चंद्राबाबू नायडू, ओदिशातील बिजू जनता दल हेही भाजपपुढे निष्प्रभ होत असल्याचे दिसले आहे.

# कंगना रणौतच्या ‘भारत भाग्य विधाता’ चे पोस्टर समोर



बॉलिवूडची ‘क्वीन’ अर्थात अभिनेत्री कंगना रणौत सध्या राजकारण आणि अभिनय अशा दोन्ही आघाड्यांवर सक्रिय असल्याचे पाहायला मिळत आहे. ‘इमर्जन्सी’ चित्रपटानंतर आता कंगना तिच्या आगामी सिनेमाच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. या सिनेमाची गेल्या काही महिन्यांपासून चर्चा सुरू होती. अखेर या सिनेमाचे पहिले पोस्टर आता समोर आलं आहे. तसंच सिनेमाच्या रिलीज डेटचीही घोषणा करण्यात आली आहे.

एका अत्यंत संवेदनशील आणि साहसी विषयावर आधारित चित्रपट घेऊन कंगना प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. तिच्या आगामी ‘भारत भाग्य विधाता’ या चित्रपटाचे पहिले पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले असून, प्रदर्शनाची तारीखही जाहीर झाली आहे.

मुंबईवर झालेल्या २६/११ च्या हल्ल्याच्या कटू आठवणी आजही ताज्या आहेत. याच घटनेवर आधारलेला हा सिनेमा असणार आहे.

या घटनेतल्या खऱ्या हिरोंची कथा या सिनेमात पाहायला मिळणार आहे.सिनेमाची कथा २००८ मधील मुंबईवर झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. विशेष म्हणजे, यात कामा घडलेल्या थरारक घटनांवर प्रकाश टाकण्यात आलाय.

# ‘खिलाडी’चा कामातून ब्रेक



बॉलिवूडचा सुपरस्टार अक्षय कुमार या ना त्या कारणामुळे चर्चेत असतो. आता त्याच्या तब्येतीसंदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. त्याच्या डोळ्यांवर छोटी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. यामुळे त्याने आगामी सिनेमाच्या शूटिंगमधून ब्रेक घेतल्याचे म्हटले जातंय.

नुकतीच अक्षयच्या डोळ्यांची दृष्टी सुधारण्यासाठी एक छोटी शस्त्रक्रिया करण्यात आहे. शस्त्रक्रिया यशस्वी झाली असून डॉक्टरांनी त्याला काही दिवस विश्रांतीचा सल्ला दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अक्षयला गेल्या काही दिवसांपासून डोळ्यांचा थोडा त्रास जाणवत होता. ही एक ‘व्हिजन करेक्शन’ शस्त्रक्रिया असून ती ६ मे रोजी सकाळी मुंबईतील एका खासगी रुग्णालयात पार पडली. ही शस्त्रक्रिया नियोजित होती आणि सध्या अभिनेत्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

**केरळमधील शूटिंग पूर्ण करून मुंबईत दाखल**

शस्त्रक्रियेच्या एक दिवस आधीच अक्षयने चित्रपट दिग्दर्शक अनीस बज्मी यांच्या आगामी चित्रपटाचं केरळमधील चित्रीकरण पूर्ण केलं. या चित्रपटात त्याच्यासोबत विद्या बालन आणि राशी खन्ना मुख्य भूमिकेत आहेत. शूटिंगचे शेड्युल संपवून मुंबईत परतल्यानंतर लगेचच त्याच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली, आता त्यानं काही दिवस आरोग्याकडे लक्ष देण्याचा निर्णय घेतला.

**आगामी चित्रपट आणि बॉक्स ऑफिसवरील यश**

अक्षय कुमारसाठी २०२६ हे वर्ष आतापर्यंत अत्यंत यशस्वी ठरले आहे.भूत बंगला या हॉरर-कॉमेडी चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली आहे. बॅक टू बॅक फ्लॉप दिल्यानंतर अक्षयसाठी हा मोठा दिलासा ठरला.याशिवाय अक्षयचे ‘वेलकम टू द जंगल’, ‘हैवान’ आणि ‘गोलमाल ५’ यांसारखे मोठे चित्रपट रांगेत आहेत.




## १६ वर्षांनी लहान अभिनेत्रीसोबत रोमान्स करणार शाहिद कपूर!

चॉकलेट बॉय म्हणून ओळखला जाणारा अभिनेता शाहिद कपूर त्याच्या अभिनयासह चित्रपटांमुळे देखील चर्चेत असतो. सध्या तो ‘कॉकटेल २’ या चित्रपटामुळे प्रसिद्धीझोतात आला आहे. एकीकडे या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट बघत असताना शाहिदीच्या आगामी प्रोजेक्टबद्दल मोठी अपडेट हाती आली आहे.लवकरच शाहिद कपूर दिग्दर्शक अमित शर्मा यांच्या एका नवीन रोमँटिक-कॉमेडी चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात मुख्य अभिनेत्री भूमिकेत कोण दिसणार, याबद्दल आता एक नाव चर्चेत आले आहे.

मिडिया रिपोर्टनुसार, बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर या रोमकॉम चित्रपटात शाहिद कपूरसोबत स्क्रिन शेअर करताना दिसणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या चित्रपटाचं दिग्दर्शन प्रसिद्ध दिग्दर्शक अमित शर्मा करणार आहेत.हा चित्रपट एक रोमँटिक कॉमेडी असून, त्यात आधुनिक नातेसंबंधावर भाष्य करणारा आहे.या प्रोजेक्टसंदर्भात जान्हवीसोबत चर्चा सुरु असल्याचंही बोलले जात आहे. विशेष म्हणजे, जान्हवी आणि शाहिद या प्रोजेक्टच्या माध्यमातून पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र दिसतील. दरम्यान, याबाबत निर्मात्यांनी कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.

## ‘तुंबाड २’ मध्ये ‘या’ आघाडीच्या बॉलिवूड अभिनेत्रीची लागली वर्णी!



दरवर्षी बॉक्स ऑफिसवर अनेक चित्रपट प्रदर्शित असतात, बऱ्याचदा हे चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचत नाही. मात्र, त्यांच्या कथानकामुळे हळूहळू लोक चित्रपटाला पसंती देतात. असाच एक चित्र पट म्हण जे ‘तुंबा ड’. सोहम शाह दिग्दर्शित‘तुंबाड’ हा हॉरर चित्रपट २०१८ साली प्रदर्शित झाला होता.या चित्रपटाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता. दरम्यान, नुकतीच या चित्रपटाच्या सीक्वलची घोषणा झाल्याने प्रेक्षकांमध्ये याबद्दल आणखी उत्सुकता वाढली आहे. अशातच या चित्रपटाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे.

‘तुंबाड २’ ची घोषणा झाल्यापासून यामध्ये कोणते कलाकार झळकणार असा प्रश्न प्रेक्षकांना देखील पडला होता. त्यात आता या हॉरर चित्रपटामध्ये एका बॉलिवूड सुंदरीची वर्णी लागल्याचं बोललं जात आहे. त्याचबरोबर आता सिनेमात कोणती अभिनेत्री मुख्य भूमिका साकारणार आहे, याबद्दल देखील एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. मिडिया रिपोर्टनुसार, ‘तुंबाड’ च्या सीक्वलमध्ये अभिनेत्री आलिया भट्टची एन्ट्री झाल्याची अपडेट मिळते आहे.

आलियाला पटकथा इतकी आवडली की तिने लगेचच होकार दिला. ‘तुंबाड २’ च्या शूटिंगची तयारी सध्या मुंबईत सुरु आहे.

# प्रीती झिंटाने शेअर केला बॉबी देओलबरोबरचा ‘तो’ व्हिडीओ



प्रीती झिंटाने सोशल मीडियावर नुकतीच एक पोस्ट शेअर केली आहे. तिने बॉबी देओलबरोबरचे काही फोटो शेअर केले आहेत. तसेच तिने तिच्या भावनाही व्यक्त केल्या आहेत.

अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवर सोल्जर या सिनेमातील सीनचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. तसेच, चित्रपटातील महफिल में बार बार हे गाणे ऐकायला मिळत आहे. कुमार सानू व अलका याग्निक यांनी हे गाणे गायले आहे. प्रीती झिंटा व बॉबी देओल यांनी या सिनेमात एकत्र काम केले होते. आता अभिनेत्रीने पोस्ट शेअर करीत त्या सिनेमाच्या शूटिंगची आठवण सांगितली आहे.

प्रीती झिंटाने बॉबी देओलला टॅग करीत एक मजेशीर किस्सा सांगितला. तसेच, तिने लिहिले की, बॉबी देओल व त्याची पत्नी तान्या देओलच्या हनिमूनदरम्यान ती त्यांच्याबरोबर होती.

**‘त्याबद्दल मी तुझी कायम आभारी’**

तिने लिहिले, ‘हे बघ बॉबी मला काय मिळाले. ऑस्ट्रेलियातील माझ्या पहिल्या आऊटडोअर शूटिंगला तू इतके मजेशीर बनवलेस, त्याबद्दल मी तुझी कायम आभारी राहीन.’ पुढे तिने असेही लिहिले, ‘तुझ्या हनिमूनला मी तिथे होते. त्यामुळे तुमच्यातील तिसरी व्यक्ती होऊन मला खूप आनंद झाला.’

प्रीतीच्या या पोस्टवर अनेकांनी कमेंट्स केल्या आहेत. अनेकांनी सिनेमाचे कौतुक केले आहे.

## आयकॉनिक बाइक्सची सफर



बाइक्सच्या बाबतीतले मला फारसे काही कळत नसले, त्या चालवताही येत नसल्या, तरी कुठल्याही चित्रपटात पहिल्या त्याच नोटिस होतात. काही चित्रपट बाइक्स मुळे लक्षात राहिले, तर काही बाइक्स चित्रपटां मुळे... बाइक चालवणं तर सोडाच, पण बाइकवर मागं बसायलाही न आवडणाऱ्या माझ्यासारख्या मुलीला बाइक्स ‘बघायला’ शिकवले ते या चित्रपटांनीच! बॉलिवूड आणि हॉलिवूडमध्ये आजवर भरपूर प्रयोग झाले. त्यातले काही फसले तर काही अजरामर झाले. अजरामर प्रयोगांतून अनेक ट्रेंडही सेट झाले. बाइक्स हा दर्दी बाइकप्रेमींचा जिव्हाळ्याचा विषय, त्यामुळे साहजिकच प्रयोगांच्या नावाखाली चित्रपट सृष्टीनंही या विषयाला हात घालत बाइक्सशी मैत्री केली. कधी कस्टमाइज्ड बाइक्स, कधी क्लासिक बाइक्स, तर कधी कथानकां मध्येच बाइकला महत्त्वाची भूमिका देऊन सिनेसृष्टीनं बाइकला आणि बाइकप्रेमींना आपलंसं केलं. आपल्या आवडत्या बाइकला मोठ्या स्क्रीनवर बघण्यासाठी चित्रपटगृहांत होऊ लागलेली गर्दी आजही ओसरायचं नाव घेत नाही. अशा काही बाइक्सची सफर, ज्यांनी मोठ्या पडद्यावरून थेट चाहत्यांच्या मनात स्टंट जंप मारली!

## शेखर सुमन यांनी चेक नाकारल्यानंतर शाहरुख खानने...



शाहरुख खान हा बॉलीवूडचा किंग खान म्हणून ओळखला जातो. त्यानं आजवर अनेकविध भूमिका साकारत प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले आहे. शाहरुख खान फक्त त्याच्या अभिनयामुळेच नाही तर त्याच्या स्वभावामुळेदेखील सर्वांचा लाडका आहे. तो सर्वांशी नम्रतेने वागतो, आदराने वागवतो, मान-सन्मान देतो, तो त्याच्या कामाप्रति समर्पित असतो अशा अनेक गोष्टींमुळे शाहरुख खान फक्त चाहत्यांचाच नाही, तर कलाकारांचादेखील आवडता आहे.


अनेक कलाकार शाहरुख खानबरोबर काम करण्याचा अनुभव सांगतात. त्याच्याबरोबर काम करताना तो इतर कलाकारांना कसे वागवतो, याबद्दल ते सांगतात.

आता अभिनेते शेखर सुमन यांनी शाहरुख खानबद्दल वक्तव्य केले आहे. त्यांनी नुकतीच



‘बॉलीवूड हंगामा’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत ते म्हणाले, ‘मला आठवतं की, शाहरुख खान चलते चलते हा सिनेमा बनवत होता. चित्रपटातील कॉमेंट्रीसाठी त्याला माझ्या आवाजाची गरज वाटत होती. जेव्हा चित्रपटाचा टीझर आला, तेव्हा त्यानं मला फोन केला. तो म्हणाला की, तू यासाठी व्हॉइसओव्हर करावास, असे मला वाटते. त्यावर मी होकार दिला. मी गेलो आणि माझं काम पूर्ण केलं.’शेखर सुमन पुढे म्हणाले, ‘त्यांनी मला मोठी रक्कम असलेला चेक पाठवला. मी म्हणालो की, हे बघ ही दोन मित्रांमधील गोष्ट आहे. तुला माहीत आहे की, मी हे पैशांसाठी केले नाही; पण त्याने ते ऐकले नाही. त्याने मला एक महागडं घड्याळ दिले.

## सलमान व प्रभासची टक्कर



साउथ सुपरस्टार प्रभासच्या बहुप्रतिक्षित चित्रपट ‘स्पिरिट’ बद्दलच्या शक्यतांवर निर्मात्यांनी अपडेट जारी केले आहे. सोशल मीडियावर बातम्या होत्या की चित्रपटाची रिलीज डेट पुढे ढकलली जाऊ शकते.

अधिकृत निवेदनात स्पष्ट करण्यात आले की ‘स्पिरिट’ ठरलेल्या वेळेवरच प्रदर्शित होईल.

निर्मात्यांनुसार, ‘स्पिरिट’ ५ मार्च २०२७ रोजी जगभरातील चित्रपटगृहा मध्ये प्रदर्शित होईल. प्रोडक्शन टीमने सांगितले की चित्रपटाचे काम नियोजनानुसार पुढे जात आहे.

रिलीज डेटमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

गेल्या काही दिवसांपासून चर्चा होती की प्रभासचा हा चित्रपट सलमान खानच्या ईद २०२७ रोजी प्रदर्शित होणाऱ्या SVC६३ (वर्किंग टायटल) या चित्रपटाशी टक्कर देऊ शकतो. अहवालांमध्ये दावा करण्यात आला होता की निर्माते बॉक्स ऑफिसवरील संघर्ष टाळण्यासाठी ‘स्पिरिट’ डिसेंबर २०२७ पर्यंत पुढे ढकलण्याचा विचार करत आहेत.

आता निर्मात्यांच्या निवेदनानंतर हे स्पष्ट झाले आहे की चित्रपट ठरलेल्या तारखेलाच प्रदर्शित होईल.

# मिसाईल हल्ल्यांत अडकली अमिषा पटेल!



मध्यपूर्वेतील इस्त्रायल, इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीचा फटका आता सर्वसामान्यांसह बॉलिवूड सेलिब्रिटींनाही बसू लागला आहे. बॉलिवूड अभिनेत्री अमिषा पटेल हिचा विमान प्रवास याच युद्धजन्य तणावामुळे थरारक ठरला. युएई च्या हवाई हद्दीत झालेल्या मिसाईल हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर अमिषाचे विमान मस्कटच्या दिशेला वळवण्यात आले असून ती तिथे अडकली आहे.

अमिषा पटेल न्यूयॉर्कहून एमिरेट्स एअरलाईन्सच्या विमानाने मुंबईला परतत होती. हे विमान दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणार होते आणि तिथून तिची मुंबईसाठी कनेक्टिंग फ्लाईट होती. मात्र, युएईमध्ये झालेल्या मिसाईल हल्ल्यांच्या घटनांमुळे सुरक्षेच्या कारणास्तव तिथली हवाई हद्द तातडीने बंद करण्यात आली.

यामुळे जगातील सर्वात व्यस्त समजल्या जाणाऱ्या दुबई विमानतळावरील वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे.विमान हवेत असतानाच युएईमधील धोक्याची सूचना मिळाल्याने अमिषाच्या विमानाचा मार्ग तातडीने बदलण्यात आला. हे विमान ओमानमधील मस्कट विमानतळाकडे वळवण्यात आले. अमिषाने स्वतः आपल्या फेसबुक आणि ट्विटर अकाऊंटवरून या घटनेची माहिती दिली आहे. तिने आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, आम्हाला आता मस्कटच्या दिशेला वळवण्यात आले असून आम्ही पुढील माहितीची वाट पाहत आहोत.

विमानाचा मार्ग बदलल्याने निर्माण झालेला ताण आणि युद्धजन्य परिस्थिती पाहून अमिषाने सोशल मीडियावर सर्वांच्या सुरक्षेसाठी प्रार्थना केली आहे. तिने या कठीण प्रसंगी देवाकडे साकडे घातले असून सध्या सुरू असलेल्या संघर्षा मुळे ती

# साध्वी सैलच्या शिरपेचात मानाचा तुरा!

फेमिना मिस इंडिया २०२६ चा ग्रँड फिनाले सोहळा आज भुवनेश्वर मधील कलिंगा इन्स्टिटयूट ऑफ इंडस्ट्रियल टेक्नॉलॉजी येथे दिमाखात पार पडला. यासाठी खास भव्य स्टेज उभारण्यात आले होते, जिथे देशभरातील ३० राज्य विजेत्यांनी आपल्या सौंदर्य, आत्मविश्वास आणि प्रतिभेची जोरदार झुंज दिली.

या ग्लॅमरस सोहळ्यात टाइम्स ग्रुपचे एमडी विनीत जैन यांच्यासह अमाल मलिक, जीनत अमान, टेरेंस लेविस, नेहा धूपिया, ईशान खट्टर, सेलिना जेटली आणि मधुर भंडारकर यांसारख्या बॉलिवूड स्टार्सनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

दरम्यान, आता सर्वांच्या उत्सुकतेचा शेवट करत फेमिना मिस इंडिया २०२६ च्या विजेतीचे नाव जाहीर करण्यात आले आहे.

फेमिना मिस इंडिया २०२६ च्या स्पर्धेत गोव्याची साध्वी सैल हिने शानदार विजय मिळवत ‘फेमिना मिस इंडिया वर्ल्ड २०२६’चा मानाचा मुकुट पटकावला. तिच्या या यशामुळे देशभरात आनंदाची लाट पसरली आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्राची राजनंदिनी पवार हिने फर्स्ट रनरअपचा किताब जिंकला, तर जम्मू-काश्मीरची श्री अद्वैता सेकंड रनरअप ठरली. तिन्ही स्पर्धकांनी आपल्या सौंदर्य, बुद्धिमत्ता आणि आत्मविश्वासाने परीक्षकांची मने जिंकली. आता साध्वी सैल मिस वर्ल्ड स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार असून, तिच्या विजयामुळे चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे.

**या स्पर्धकांना पहिल्या ८ मध्ये स्थान**

फेमिना मिस इंडिया २०२६ च्या ग्रँड फिनालेमध्ये देशभरातील ३० राज्य विजेत्यांनी आपली छाप पाडली, मात्र अंतिम टप्प्यात केवळ टॉप ८ स्पर्धकांनीच बाजी मारली. यामध्ये याशिका शर्मा, श्रेया ठाकूर, धनुश्री चौहान, परी कूपर, अद्वैता, राजनंदिनी पंवार, तरु शीरा आणि साध्वी सैल यांनी टॉप ८ मध्ये स्थान मिळवत आपल्या दमदार परफॉर्मन्सने सर्वांचे लक्ष वेधले. या स्पर्धकांनी सौंदर्य, आत्मविश्वास आणि टॅलेंटच्या जोरावर अंतिम फेरी गाठत स्पर्धेला अधिक रंगतदार बनवले.

**या कलाकारांनी केले सादरीकरण**

फेमिना मिस इंडिया २०२६ च्या ग्रँड फिनालेला अधिक रंगतदार आणि अविस्मरणीय बनवण्यासाठी अनेक सेलिब्रिटींच्या शानदार परफॉर्मन्सची मेजवानी पाहायला मिळाली.ईशान खट्टर आणि लॉरेन गॉटलिब यांनी आपल्या दमदार डान्स परफॉर्मन्सने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

तर जुबिन नौटियाल यांनी आपल्या सुरेल आवाजात गाणी सादर करत संध्याकाळी चार चाँद लावले. या ग्लॅमरस सादरीकरणांमुळे फिनालेची रंगत आणखी वाढली आणि प्रेक्षकांसाठी हा सोहळा खऱ्या अर्थाने संस्मरणीय ठरला.





# सुंदर दिसायचं तर 'ही' जेली खा

त्वचा सुंदर, चमकदार आणि निरोगी ठेवण्यासाठी फक्त बाहेरुन स्किनकेअर पुरेसं नसतं, तर आतूनही योग्य पोषण मिळणं गरजेचं असतं. म्हणूनच Eat Your Skincare ही संकल्पना खूप लोकप्रिय होत आहे. विविध प्रकारच्या रेसिपी आता लोकं करतात. त्यापैकीच एक प्रसिद्ध रेसिपी म्हणजे गाजर, बीट, संत्री, लिंबू आणि डाळिंब यांसारख्या पोषक घटकांपासून तयार केलेली जेली ही त्वचेसाठी अतिशय फायदेशीर ठरते. लहान मुलांनाही चॉकलेटऐवजी देता येते.

ही जेली तयार करण्यासाठी सर्वप्रथम गाजर आणि बीट स्वच्छ धुऊन त्यांचे छोटे तुकडे करून घ्या. त्यानंतर हे तुकडे थोड्या पाण्यात शिजवून मऊ करून घ्या आणि मिक्सरमध्ये फिरवून त्याचा स्मूथ पल्प तयार करा. आता संत्र्याचा रस आणि डाळिंब्याचे दाणे मिक्सरमध्ये फिरवून त्यांचा रस काढून घ्या. हे सर्व रस एकत्र करून गाळून घ्या, जेणेकरून मिश्रण एकसारखं होईल. चवीनुसार थोडासा लिंबाचा रस आणि हवे असल्यास मध किंवा गूळ घालू शकता.

आता एका भांड्यात थोडं पाणी घेऊन त्यात अगर-अगर घालून ते पूर्णपणे विरघळेपर्यंत गरम करा. अगर-अगर नीट वितळल्यावर त्यात तयार केलेलं फळांचे मिश्रण घाला आणि हलक्या आचेवर एक-दोन मिनिटं ढवळा. हे मिश्रण साच्यात किंवा बाऊलमध्ये ओतून थंड होऊ द्या आणि नंतर फ्रिजमध्ये सेट होण्यासाठी ठेवा. काही वेळातच तुमची हेल्दी जेली तयार होईल.

या जेलीचे फायदे खूपच महत्त्वाचे आहेत. गाजर आणि बीटमध्ये असलेले अँटी ऑक्सिडंट्स आणि व्हिटीमिन्स त्वचेला नैसर्गिक चमक देतात आणि त्वचा तजेलदार ठेवतात. संत्री आणि लिंबामधील व्हिटामिन सी कोलेजन तयार होण्यास मदत करते, ज्यामुळे त्वचा टवटवीत आणि तरुण दिसते. डाळिंबामध्ये असलेले घटक त्वचेचे नुकसान होण्यापासून संरक्षण करतात आणि त्वचेला आतून पोषण देतात.

# उन्हाळ्यात ताक प्यावे की लस्सी

ताक उन्हाळ्यासाठी एक हलकं आणि रिफ्रेशिंग ड्रिंक आहे. ताक दह्यापासून तयार होतं पण यात पाणी मिसळून पातळ केलं जातं. जेणेकरून ते सहज पचू शकेल. ताकात बरेच प्रोबायोटीक्स असतात. ज्यामुळे पचनक्रिया चांगली राहण्यास मदत होते. याव्यतिरिक्त तुम्ही यात मीठ, जीरं, पुदिना मिसळू शकता ज्यामुळे शरीराला कुलिंग इफेक्ट मिळतो. ताक शरीराला गारवा देते, ताकामुळे डिहाड्रेशनपासून बचाव होतो, उन्हाळ्याच्या दिवसांत ताक प्यायल्यानं पचनक्रिया चांगली राहते. ताक लोक कॅलरीयुक्त असल्यामुळे वजन कमी होण्यासही मदत होते.लस्सी दह्यापासून तयार केला जाणारा आहे घट्ट आणि क्रिमी पदार्थ आहे. जो उत्तर भारतात खूप लोकप्रिय आहे. गोड आणि खारट अशा दोन्ही प्रकारच्या लस्सी उन्हाळ्यात प्यायल्या जातात. यामुळे शरीराला एनर्जी मिळते. तसंच लस्सी शरीराला ताकद आणि एनर्जी देण्यास मदत करते. लस्सी शरीराला इंस्टट एनर्जी देते. लस्सी उन्हाळ्याच्या दिवसांत शरीराला गारव देते. लस्सी हे एक हेवी ड्रिंक आहे जे दीर्घकाळ भूक लागू देत नाही.

जर तुम्हाला उन्हाळ्याच्या दिवसांत पचनासाठी उत्तम ड्रिंक हवं असेल तर तुम्ही ताक पिऊ शकता. जर तुम्हाला लवकर एनर्जी हवी असेल तर तुम्ही लस्सी पिऊ शकता. ज्यामुळे डायजेशन चांगले राहते तसंच हायड्रेशनसाठी ताक उत्तम ठरतं.



एनर्जी आणि चवीसाठी लस्सी उत्तम ठरते. उन्हाळ्याच्या दिवसांत फिट,फ्रेश राहण्या साठी ताक आणि लस्सी दोन्ही उत्तम पर्याय आहेत. तुमच्या शरीराच्या गरजेनुसार तुम्ही ताक किंवा लस्सीची निवड करू शकता.

# चिनी महिला चाळिशी ओलांडली तरी दिसतात विशीतल्या तरुणी!



महिलांनी वयाची चाळिशी ओलांडल्यानंतर शरीरात अनेक नैसर्गिक बदल घडू लागतात. हार्मोनल बदल आणि वाढते वय यामुळे वयाच्या चाळिशीनंतर स्वतःला फिट ठेवणे हे एक मोठे आव्हानच असते. मेटाबॉलिझम कमी होणे, थकवा जाणवणे, वजन वाढणे आणि सांधेदुखी यांसारख्या समस्या हळूहळूडोके वर काढतात. अशावेळी फिट आणि निरोगी राहण्यासाठी केवळ आधुनिक उपचारांसोबतच पारंपारिक पद्धतींकडेही लक्ष देणं गरजेचं ठरतं. पारंपारिक चिनी औषधशास्त्र फिटनेसकडे बघण्याचा एक वेगळा आणि सोपा दृष्टिकोन देते. चिनी संस्कृतीत फिटनेस म्हणजे केवळ जिममध्ये जाणे नव्हे, तर शरीराचा अंतर्गत समतोल राखणे होय

नुकतेच लाईफस्टाईल कोच सारा जेन हो यांनी या विषयावर मोकळेपणाने आपले विचार मांडले आहे आणि चिनी पारंपारिक पद्धतींचा अवलंब करून त्यांनी वयाची चाळिशी ओलांडल्यानंतरही स्वतःला कसं मेंटेन ठेवलं आहे, हे सांगितलं आहे. चिनी औषधशास्त्रानुसार, फिटनेस म्हणजे फक्त मसल्स बनवणे नसून शरीरातील उर्जेचा समतोल राखणे होय. प्रसिद्ध कोच सारा जेन हो यांनी सांगितलेले हे पारंपारिक चिनी मार्ग वापरून तुम्ही वयाच्या ४० व्या वर्षीही विशीतल्या तरुणहीसारखेच फिट दिसू शकता. पारंपारिक चिनी औषधशास्त्रानुसार शरीर, मन आणि ऊर्जा यांचा समतोल राखणं हे आरोग्याचं मुख्य रहस्य आहे. योग्य आहार, दिनचर्या, औषधी वनस्पती आणि विशिष्ट थेरपींच्या मदतीने शरीराची कार्यक्षमता सुधारण्यावर या पद्धतीत भर दिला जातो. विशेषतः चाळीशी नंतर शरीरातील बदल लक्षात घेऊन जीवनशैलीत केलेले छोटे बदल दीर्घकाळ फिट राहण्यासाठी मदत करू शकतात. जर तुम्हालाही वाढत्या वयानुसार फिट, अॅक्टिव्ह आणि ऊर्जावान राहायचं असेल, तर पारंपारिक चिनी औषधशास्त्र काय सांगतं हे जाणून घेणं नक्कीच उपयुक्त ठरेल. १. दिवसभर कोमट पाणी प्या :- चिनी आरोग्य परंपरेत 'कोमट पाण्याला' एका औषधाप्रमाणे मानले जाते. दिवसभर कोमट पाणी प्यायल्यामुळे तुमची पचनसंस्था अॅक्टिव्ह राहते. यामुळे तुमचे पोट नियमितपणे साफ होण्यास मदत होते, जी वजन कमी करण्याच्या प्रवासातील पहिली पायरी मानली जाते. याशिवाय, कोमट पाणी शरीराचे तापमान संतुलित राखते आणि मेटाबॉलिझम वाढवते, ज्यामुळे शरीरात विषारी घटक किंवा घाण जमा होत नाही. २. सकाळी उठून एक्सरसाइज करा :- वर्कआऊटचा अर्थ नेहमी हेवी वजन उचलणे किंवा स्वतःला पूर्णपणे थकवून टाकणे असा होत नाही. सकाळच्या वेळी हायकिंग पिलेट्स किंवा टेनिस यांसारखे खेळ खेळून देखील आपण वेगवेगळ्या प्रकारच्या अॅक्टिव्हीटी करु शकता. वयाची चाळिशी ओलांडल्यानंतर शरीराला रिकव्हरीसाठी जास्त वेळेची गरज असते, त्यामुळे खूप जास्त तीव्र वर्कआऊट करण्याऐवजी सातत्य राखण्यावर भर द्या. सकाळी उठल्या उठल्या एक्सरसाइज पूर्ण करा. बाहेरच्या आर्द्रतेपासून शरीराचा बचाव करा :- चिनी वैद्यकीय पद्धतीमध्ये ओलावा हे शरीरातील सूज आणि सुस्तीचे मुख्य कारण मानले जाते. आंघोळीनंतर तुमचे केस ब्लो-ड्राय करून नीट सुकवा. ओले केस शरीरात थंडावा आणि आर्द्रता निर्माण करू शकतात. याशिवाय, पायांच्या माध्यमातूनही बाहेरची थंडावा आणि ओलावा शरीरात प्रवेश करतो, ज्यामुळे ब्लोटिंग (पोट फुगणे) आणि शरीरात जडपणा जाणवू शकतो.

# डायबिटीजच्या लोकांनी आंबा कसा खावा?

आंबा हे पोषक तत्त्वांनी भरलेले फळ असले तरी मधुमेहींसाठी त्याचे सेवन करताना काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स मध्यम असल्यामुळे तो रक्तातील साखर वाढवू शकतो, पण योग्य प्रमाणात खाल्ल्यास तो सुरक्षित ठरतो. आंबा पाण्यात भिजवून खाल्ल्याने त्याची उष्णता कमी होते आणि काही हानिकारक घटक दूर होतात. मधुमेहींनी आंबा जेवणासोबत न खाता मधल्या वेळेत खावा आणि त्यासोबत प्रथिने किंवा हेल्दी फॅट्स घ्यावेत. दिवसाला अर्धा किंवा एक छोटा आंबा पुरेसा असतो. नियमित शुगर तपासणी आणि व्यायाम यामुळे साखर नियंत्रणात ठेवता येते.आंबा हे पोषक तत्त्वांनी भरलेले फळ असले तरी मधुमेहींसाठी त्याचे



सेवन करताना काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स मध्यम असल्यामुळे तो रक्तातील साखर वाढवू शकतो, पण योग्य प्रमाणात खाल्ल्यास तो सुरक्षित ठरतो. आंबा पाण्यात भिजवून खाल्ल्याने त्याची उष्णता कमी होते आणि काही हानिकारक घटक दूर होतात. मधुमेहींनी आंबा जेवणासोबत न खाता मधल्या वेळेत खावा आणि त्यासोबत प्रथिने किंवा हेल्दी फॅट्स घ्यावेत. दिवसाला अर्धा किंवा एक छोटा आंबा पुरेसा असतो. नियमित शुगर तपासणी आणि व्यायाम यामुळे साखर नियंत्रणात ठेवता येते.

आंब्याला 'फळांचा राजा' म्हटले जाते कारण त्यात व्हिटॅमिन A, C, E आणि भरपूर अँटी-ऑक्सिडंट्स असतात.

आंब्यातील फायबर (इगं) किंवा चोथ्याचे प्रमाण जे आहे ते पचनसंस्थेचे आरोग्य सुधारते. जीवनसत्व अ हे डोळ्यांच्या आणि त्वचेच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे तर जीवनसत्व सी (C) आणि ई (E) शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. आंब्याचा ग्लायसेमिक इंडेक्स' ५१ ते ५६ च्या दरम्यान असतो, जो मध्यम श्रेणीत येतो. याचा अर्थ असा की, आंबा रक्तातील साखर वाढवू शकतो, पण तो मर्यादेत खाल्ल्यास घातक ठरत नाही. 'क्लेव्हलँड क्लिनिक'च्या संशोधनानुसार,आंब्यातील फायबर साखरेचे शोषण मंदावण्यास मदत करतात. मात्र, मधुमेही व्यक्तींनी आंबा खाताना 'कार्बोहायड्रेट मोजून घेणं' आवश्यक आहे. आंब्याची उष्णता आणि त्यातील साखरेचे प्रमाण संतुलित करण्यासाठी जुन्या घरगुती पद्धतींना आता वैज्ञानिक आधारही मिळाला आहे. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात आंबा खाल्ल्यास रक्तातील साखरेची पातळी न वाढवता फळाचा आनंद घेता येतो.आंब्यात जशी जीवनसत्वे भरभरून आहेत तशीच फळांतील साखर फ्रुक्टोज सुद्धा मुबलक प्रमाणात आहे. यासोबतच आंब्यात ग्लुकोजचे प्रमाणही काही अंशी आढळते. आंबा जेवढा गोड आणि पिकलेला तेवढेच त्यातील फ्रुक्टोजचे प्रमाण जास्त असते. त्यामुळेच आंबा जेवढा पिकलेला व केशरी तेवढा तो रुचकर आणि गोड लागतो. डायबिटीजच्या लोकांनी आंबा अतिप्रमाणात खाल्ल्यास रक्तातील साखरवाढू शकते. आंबा जेवढा गोड व पिकलेला तेवढा त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असतो.

# 'या' जादुई पाण्याने रोज गुळण्या करा

दातांची स्वच्छता आपण अगदी रोजच न चुकता करतो. बहुतांश लोक तर दिवसातून दोन वेळा ब्रश करतात. पण तरीही त्यांच्या दातांवर एक पिवळट झाक असते. रोज घासूनही दात स्वच्छ होत नसतील, पांढरेशुभ्र दिसत नसतील तर पुढे सांगितलेला एक उपाय अगदी रोजच्या रोज करायला सुरुवात करा. यामुळे दातांचा पिवळटपणा कमी होऊन त्यांच्यावर छान चमक तर येईलच पण दात




दुखणे, दाढा ठणकणे असे त्रासही कमी होतील आणि दात बळकट होण्यास मदत होईल.हा उपाय करण्यासाठी आपल्याला पाणी आणि इतर फक्त २ पदार्थ लागणार आहेत. त्यासाठी सगळ्यात आधी तर एक काचेची बरणी घ्या. ती घासून स्वच्छ धुवून घ्या आणि तिच्यामध्ये अर्धा लीटर पिण्याचे पाणी घाला.

आता या पाण्यामध्ये तुरटीचे २ लहान खडे घाला आणि १२ ते १५ लवंग घाला. यानंतर बाटलीचं झाकण लावून पाणी हलवून घ्या. साधारण एक दिवस झाल्यानंतर पाण्यातली तुरटी विरघळलेली असेल आणि लवंगाचा अर्कही पाण्यात उतरलेला असेल. हे झालं तुमचं पाणी तयार. आता त्याचा वापर कसा करायचा ते पाहुया..दातांच्या स्वच्छतेसाठी आपण जे पाणी तयार केलेलं आहे त्याचा वापर करणं अतिशय सोपं आहे. रात्री झोपण्यापुर्वी एकदा टुथब्रश दातांवर फिरवून दात स्वच्छ करून घ्या.यानंतर आपण तयार केलेलं पाणी तोंडात घ्या. ३० सेकंद ते तसंच तोंडात राहू द्या आणि आतल्या आत सगळीकडे फिरवा.


# जेवणाआधी आल्याचा छोटासा तुकडा चावून खा

आले पदार्थाला अतिशय खमंग चव देतं. म्हणूनच तर चायनिज पदार्थ असो किंवा मग आपले पारंपरिक वाटून केलेले पदार्थ असो.. आल्याची पेस्ट कित्येक पदार्थांमध्ये असतेच...आल्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. थंडीच्या दिवसांत तर आलं सर्दी, खोकला, कफ यासारखे कित्येक त्रास कमी करण्यासाठीही मदत करतं. आल्यामध्ये भरपूर प्रमाणात अॅण्टीऑक्सिडंट्सही असतात..



आता याच आल्याचा आणखी एक मोठा फायदा पाहुया...ब-याच लोकांना पोटाचे वेगवेगळे त्रास असतात. काही जणांना नेहमीच अपचन होतं तर काही जणांना अॅसिडीटी, ब्लोटिंग, पोट जड होणं असे त्रास असतात. हे सगळे त्रास कमी करायचे असतील तर आल्याचा एक छोटासा तुकडा काही दिवस एका विशिष्ट पद्धतीने खाऊन पाहा. तुमच्या पचनाच्या कित्येक तक्रारी दूर होतील.त्यावर थोडं मीठ आणि काही थेंब लिंबाचा रस घालून आलं अगदी बारीक चावून चावून खा. हा उपाय सगळ्यांसाठीच उत्तम आहे. वात, पित्त, कफ अशा तिन्ही प्रकृतीचे लोक हा उपाय करू शकतात.यानंतर मग जेवण करा. तुमच्या पचनाच्या अनेक समस्या कमी होतील. कारण यामुळे शरीरात अनेक चांगले पाचक रस तयार होतात जे पचन क्रिया सुरळीत करण्यासाठी मदत करतात. जर या पद्धतीने आलं खाताना ते खूप तिखट लागत असेल तर तुम्ही सुंठही वापरू शकतात.

# शहाळ्याची मलई कोलेस्टेरॉल वाढवतेय का?



उन्हाळ्यात शहाळ्याचं पाणी पिणं शरीरासाठी अत्यंत फायदेशीर मानलं जातं. त्यासोबतच अनेकांना शहाळ्याची मऊ, चविष्ट मलई खायलाही खूप आवडते. मात्र आरोग्याची काळजी घेताना मनात एक प्रश्न नेहमी पडतो की, शहाळ्याची मलई खाल्ल्याने कोलेस्टेरॉल वाढतं का? विशेषतः ज्यांना आधीपासूनच कोलेस्टेरॉलची समस्या आहे, त्यांनी ही मलई खावी की टाळावी याबाबत अनेकदा संभ्रम निर्माण होतो. 'कोलेस्टेरॉल' हा शब्द ऐकताच आपण चरबीयुक्त पदार्थ खाणंच सोडून देतो. अशातच शहाळ्याची मलई, जी दिसायला पांढरी आणि घट्ट असते, तिला आपण 'बॅड फॅट' समजून अनेकदा खाणं टाळतो. परंतु शहाळ्याच्या मलईमध्ये असलेले फॅट्स हे शरीरासाठी नेहमीच वाईट नसतात? शहाळ्याच्या मलईमध्ये नैसर्गिक फॅट्स, कॅलरीज आणि काही महत्त्वाचे पोषक घटक असतात. त्यामुळे तिचा शरीरावर नेमका कसा परिणाम होतो, हे जाणून घेणं महत्त्वाचं ठरतं. योग्य प्रमाणात ही मलई खाल्ल्यास ती फायदेशीर ठरू शकते, पण जास्त प्रमाणांत खाणं आरोग्यासाठी नुकसानकारकही ठरू शकतं. डाएटिशियन श्वेता जे. पांचाल यांच्या मते, प्रत्येक फॅटयुक्त पदार्थ नुकसानदायक नसतो आणि योग्य प्रमाणात खाल्लेल्या नारळाच्या मलईला घाबरण्याची गरज नाही. महत्त्वाची गोष्ट ही आहे की आपण कोलेस्टेरॉलशी संबंधित योग्य माहिती समजून घेतली पाहिजे आणि आपला आहार संतुलित ठेवला पाहिजे.

# जीवनशैलीत 'या' ५ सवयी लावा



आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत उच्च रक्तदाब ही समस्या एका शांत शत्रूप्रमाणे वाढताना दिसत आहे. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे ही समस्या आता फक्त वयस्करांपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर तरुणांनाही मोठ्या प्रमाणात याचा त्रास होत आहे. अनेकदा लोकांना सुरुवातीला याची जाणीवही होत नाही आणि अचानक शरीरावर त्याचे गंभीर परिणाम दिसू लागतात.

डॉक्टरांच्या औषधांशिवायही काही नैसर्गिक पद्धतींचा अवलंब करून उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवता येऊ शकतो, असा अनेक अभ्यासांचा निष्कर्ष आहे. जर तुम्हालाही सतत वाढणाऱ्या ँइ चा त्रास होत असेल, तर खाली दिलेले ५ घरगुती उपाय तुमच्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. हे उपाय नियमितपणे केल्यास शरीरात सकारात्मक बदल दिसू लागतात, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे.

**आंबट फळांचा समावेश** – संत्रा, लिंबू, मोसंबी व द्राक्षे यांसारखी आंबट चवीची फळे शरीरासाठी अत्यंत फायदेशीर मानली जातात. त्यामध्ये असलेले व्हिटॅमिन ण आणि अँटीऑक्सिडंट्स रक्तवाहिन्यांना लवचिक ठेवण्यास मदत करतात.

रक्तप्रवाह सुरळीत राहिला की, रक्तदाब कमी होण्यास मदत होते. दिवसातून एक ग्लास ताजे लिंबूपाणी किंवा संत्र्याचा रस घेतल्यास शरीराला नैसर्गिक ऊर्जा मिळते आणि उच्च रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होऊ शकते. मात्र, पॅकेज ज्यूसऐवजी ताज्या फळांचा वापर करणे अधिक योग्य ठरते.

**नट्स आणि सीड्स** – बदाम, अक्रोड, चिया सीड्स, जवस व भोपळ्याच्या बिया हे छोटे पदार्थ दिसायला साधे असले तरी त्यात पोषणमूल्यांचा खजिना असतो. त्यामध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम व फायबर मोठ्या प्रमाणात असते, ज्यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत मिळते.

संध्याकाळच्या वेळी अस्वास्थ्यकर स्नॅक्सऐवजी एक मूठभर नट्स खाल्ल्यास शरीराला ऊर्जा मिळते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते. रक्तदाबावर याचा दीर्घकाळपर्यंत सकारात्मक परिणाम दिसू शकतो.

शरीर आणि मन शांत ठेवण्यासाठी नियमित व्यायाम अत्यंत महत्त्वाचा आहे. दररोज किमान ३० मिनिटे वेगाने चालणे किंवा हलका व्यायाम केल्यास रक्तदाब कमी होण्यास मदत होते.

विशेषतः अनुलोम-विलोम आणि भ्रामरी प्राणायाम हे ताण कमी करून मन शांत ठेवतात. तणाव कमी झाला की, आपोआपच उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळण्यास मदत होते. त्यामुळे या दोन्ही प्राणायामाच्या श्वासोच्छ्वासाच्या प्रक्रियांना दैनंदिन जीवनाचा भाग बनवणे आवश्यक आहे.

पालक, मेथी, कोबी, ब्रोकोली यांसारख्या हिरव्या भाज्या शरीरासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. त्यामध्ये असलेले पोटॅशियम आणि फायबर शरीरातील सोडियमचे प्रमाण संतुलित ठेवतात.

सोडियम कमी आणि पोटॅशियम योग्य प्रमाणात असेल, तर रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. रोजच्या आहारात किमान एक वाटी हिरव्या भाज्यांचा समावेश करणे आवश्यक आहे. सलाड किंवा सूपच्या स्वरूपातही या भाज्या घेतल्या जाऊ शकतात.

**किवी** – किवी हे फळ दिसायला लहान असले तरी त्यात व्हिटॅमिन सी, पोटॅशियम व फायबर मोठ्या प्रमाणात असते. काही संशोधनांनुसार, किवीच्या नियमित सेवनाने रक्तदाब कमी करण्यास मदत मिळू शकते.

दररोज एक किवी खाल्ल्यास केवळ रक्तदाबच नाही, तर शरीराची रोगप्रतिकार शक्तीही वाढते. त्यामुळे हे फळ आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक मानले जाते.उच्च रक्तदाब ही गंभीर समस्या असली तरी जीवनशैलीत छोटे छोटे बदल करून, त्यावर नियंत्रण ठेवता येऊ शकते.

# यंदाच्या मान्सूनवर 'सुपर एल निनो'चे सावट

**यंदा हवामानात झपाट्याने होणारे बदल हा चिंतेचा विषय ठरत असून प्रशांत महासागरात होणाऱ्या बदलाकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले आहे. येथील हवामान स्थितीचा परिणाम जागतिक हवामानावर होत असतो. प्रशांत महासागरात यंदा 'एल निनो' विकसित होण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केली आहे.**



काही हवामान अभ्यास कांच्या मते यंदा 'एल निनो'ची तीव्र स्थिती म्हणजेच 'सुपर एल निनो' असण्याची शक्यता आहे. ही मागील तीन दशकांतील सर्वात तीव्र स्थिती असण्याचीही शक्यता आहे. 'एल निनो'च्या प्रभावामुळे जागतिक पातळीवर तापमान वाढ, चक्रीवादळे, कमी पाऊस तसेच काही भागात दुष्काळसदृश स्थिती निर्माण होऊ शकते. जाणून घेऊया या सुपर एल निनोबाबतष्ठ

**भारतावर 'एल निनो' चा काय परिणाम?**

भारतात वर्षभर पडणाऱ्या पावसाच्या ७५ टक्क्यांहून अधिक पाऊस हा नैर्ऋत्य मान्सूनमुळे पडत असतो. या पावसावर 'एल निनो' ही स्थिती प्रभाव टाकत असते. तर 'ला निना' स्थितीत मादागास्करकडे उतरलेले थंड वारे अरबी समुद्रातून आणि बंगालच्या उपसागरातून भारतात मान्सून आणतात. त्यामुळे 'ला निना' स्थिती भारतासाठी पोषक आहे. याउलट 'एल निनो'चा परिणाम भारतातील मान्सूनवर होऊन पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता असते. यामुळे या वर्षीच्या हंगामात सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

'स्कायमेट' या खासगी हवामान संस्थेनेही प्रशांत महासागरात 'एल निनो' अपेक्षेहून लवकर विकसित होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. यामुळे सध्या साऱ्या जगाचे लक्ष प्रशांत महासागराकडे आहे. मात्र, मान्सूनवर केवळ या एकाच स्थितीचा प्रभाव नसतो तर त्यावर इतर हवामान प्रणालींचाही परिणाम होत असतो.

**'सुपर एल निनो' काय आहे?**

'एल निनो' निर्धारित करण्यासाठी मध्य आणि पूर्व प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान मोजले जाते. त्याची तुलना दीर्घकालीन सरासरीशी केली जाते. साधारणपणे तापमान २ अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक वाढते तेव्हा काही वेळेला त्या स्थितीला 'सुपर एल निनो' स्थिती असे म्हटले जाते.

म्हणजेच एल निनोची अधिक तीव्र स्थिती. जागतिक हवामान संघटनेकडून अधिकृतरित्या 'सुपर एल निनो' हा शब्दप्रयोग वापरला जात नाही. मात्र, माध्यमांमध्ये त्या स्थितीची तीव्रता दर्शविण्यासाठी हा शब्दप्रयोग वापरला जातो.पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या माहितीनुसार, १९५० पासून १६ वेळा एल निनो वर्षांची नोंद झाली आहे. मात्र, त्यापैकी फक्त सात वर्षेच भारतात सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली. १९९७ या वर्षात 'एल निनो' स्थिती असतानाही भारतात सरासरीहून २ टक्के अधिक पाऊस झाला होता. त्यावर्षी पॉझिटिव्ह इंडियन ओशन डायपोल (आयोडी) मजबूत होता आणि यामुळे 'एल निनो'चा परिणाम कमी झाला होता.

आयोडी का महत्त्वाचे?

पॉझिटिव्ह इंडियन ओशन डायपोल किंवा सकारात्मक हिंदी महासागर डायपोलला कधीकधी 'भारतीय निनो' ही म्हटले जाते. सकारात्मक आयओडीच्या दरम्यान मान्सूनमधील पावसावर अनुकूल, तर नकारात्मक आयओडीच्या दरम्यान मान्सूनमधील पावसावर प्रतिकूल परिणाम होतो

. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या अहवालांच्या अंदाजानुसार, नैर्ऋत्य मान्सून हंगामाच्या अखेरच्या टप्प्यात सकारात्मक आयओडी स्थिती विकसित होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

# मानवी अवयवांचे थ्री-डी

विज्ञानाने आजवर अनेक अशक्य गोष्टी शक्य करून दाखवल्या आहेत. एकेकाळी सायन्स फिक्शन चित्रपटात दिसणा?या कल्पना आज आपल्या वास्तवाचा भाग होत आहेत. त्यापैकीच एक क्रांतिकारी तंत्रज्ञान म्हणजे थ्री-डी बायोप्रिंटिंग.

ज्याप्रमाणे आपण कागदावर शाईने मजकूर प्रिंट करतो, त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून आता शास्त्रज्ञ प्रयोगशाळेत मानवी शरीराचे जिवंत अवयव तयार करत आहेत.

ही केवळ तांत्रिक प्रगती नसून मानवी अस्तित्वासाठी एक मोठी संजीवनी ठरणार आहे.

थ्री-डी बायोप्रिंटिंगमध्ये सामान्य प्रिंटरसारखी शाई वापरली जात नाही, तर त्याऐवजीबायो इंकवापरली जाते. ही शाई म्हणजे रुग्णाच्या स्वतच्या जिवंत पेशी आणि त्यांना आधार देणारे विशेष स्मार्ट जेल असते. प्रथम रुग्णाच्या शरीरातील स्टेम सेल्स घेतल्या जातात आणि प्रयोगशाळेत त्यांची संख्या वाढवली जाते. त्यानंतर म्प्युटरवर त्या अवयवाचे एक त्यंत सूक्ष्म त्रिमितीय (३अ) मॉडेल तयार केले जाते. प्रिंटर या बायो इंकचा वापर करून थरावर थर रचत हुबेहुब जिवंत अवयव तयार करतो.



आज जगभरात किडनी, हृदय किंवा यकृत निकामी झाल्यामुळे लाखो लोक मृत्यूच्या दारात उभे आहेत. हिंदुस्थानातही अवयवदानाची मोठी कमतरता आहे. बायोप्रिंटिंगचा सर्वात मोठा फायदा म्हणजे हा अवयव रुग्णाच्या स्वतच्या पेशींपासून बनवलेला असल्याने शरीर तो परका मानून नाकारत नाही सध्याच्या ट्रान्सप्लांटमध्ये रुग्णाला आयुष्यभर जी इम्युनोसप्रेसंट औषधे घ्यावी लागतात, त्यांची गरज या तंत्रज्ञानामुळे उरणार नाही. कारण तो अवयव त्या रुग्णाच्या स्वतच्या डीएनएचा भाग असेल.

सध्या शास्त्रज्ञांनी मानवी त्वचा, कानाची कूर्चा आणि रक्तवाहिन्या यशस्वीरीत्या प्रिंट केल्या आहेत. काही वर्षांपूर्वी इस्त्रायलमधील संशोधकांनी पेशी आणि रक्तवाहिन्यांसह एक छोटे मानवी हृदय प्रिंट करून जगाला चकित केले होते.

मात्र पूर्ण आकाराचे क्रियाशील हृदय, फुप्फुसे किंवा यकृत प्रिंट करणे अद्याप आव्हानात्मक आहे. या अवयवांची रचना अत्यंत गुंतागुंतीची असते आणि त्यातील कोटय़वधी पेशींना सतत ऑक्सिजन पुरवणे ही मोठी तांत्रिक अडचण आहे. तरीही ज्या वेगाने संशोधन सुरू आहे, ते पाहता पुढील दशकात हे सर्वसामान्य रुग्णांसाठी उपलब्ध होईल अशी दाट शक्यता आहे.

जसा एखादा अवयव प्रिंट करणे सोपे होईल, तसे काही गंभीर नैतिक प्रश्नही उभे राहतील. हे तंत्रज्ञान केवळ श्रीमंतांच्याच हातात राहील का?

डिझायनर ऑर्गन्स वापरून मानवी क्षमता वाढवण्याचे प्रयत्न होतील का? ज्या पिढीला आपण आज होमो स्मार्टफोन्स म्हणतो, जी पिढी मान खाली घालून केवळ आभासी जगात जगतेय, ती पिढी या तंत्रज्ञानाचा वापर प्रगतीसाठी करेल की स्वतच्या स्वार्थासाठी, हा मोठा प्रश्न आहे. मात्र जर या विज्ञानाचा योग्य आणि नैतिक वापर झाला, तर मानवी समुदायासाठी हे खरोखरच एक वरदान ठरेल.

हे तंत्रज्ञान केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित न राहता आता एक मोठी जागतिक बाजारपेठ बनू पाहत आहे. अमेरिका, चीन आणि इस्त्रायलसारखे देश या संशोधनात अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करत आहेत. हिंदुस्थानसारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशासाठी तर हे तंत्रज्ञान वरदान ठरू शकते. जर आपण स्वस्त दरात बायो इंक आणि प्रिंटिंग तंत्रज्ञान विकसित केले, तर जगासाठी आपण पुन्हा एकदा आरोग्य केंद्र बनू शकतो. आज आपण औषधांची निर्यात करतो, उद्या कदाचित आपण प्रिंटेड अवयवांची निर्यात करू शकू.

मात्र हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी केवळ बाजारपेठ असून चालणार नाही, तर आपल्याला मूलभूत संशोधनात मोठी झेप घ्यावी लागेल. अन्यथा आपण फक्त परदेशी कंपन्यांनी बनवलेल्या अवयवांचे ग्राहकच राहू.

थोडक्यात सांगायचे तर बायोप्रिंटिंग हे तंत्रज्ञान माणसाला देवाच्या भूमिकेत नेऊन ठेवणारे आहे.

ज्याप्रमाणे आपण खराब झालेला मोबाईल दुरुस्त करतो किंवा त्याचे सुटे भाग बदलतो, तसेच काहीसे मानवी शरीराच्या बाबतीत घडताना दिसत आहे. हा मानवी बुद्धिमत्तेचा एक सकारात्मक कळस आहे, जो भविष्यात मृत्यूलाही काही काळ थोपवून धरण्याची ताकद ठेवतो.

# आजचे काम 'उद्या करू' म्हणणारे मागे पडतात

आचार्य चाणक्य हे इतिहासातील सर्वात बुद्धिमान आणि धूर्त रणनीतिकारांपैकी एक मानले जातात. त्यांनी शिकवलेली नीतिमूल्ये आणि जीवनाचे नियम शतकांपूर्वी होते तितकेच आजही खरे आणि प्रभावी आहेत. चाणक्य नीतीमध्ये, आचार्य चाणक्य सांगतात की, 'जो व्यक्ती वेळेचे महत्त्व समजते, तीच व्यक्ती जीवनात यशस्वी आणि समृद्ध होऊ शकतो.'

चाणक्यांनी आपल्या नीतिमूल्यांमधून हा संदेश दिला आहे की, 'एक यशस्वी व्यक्ती आपली महत्त्वाची कामे कधीही नशिबावर सोडत नाही.'

चाणक्याच्या मते, 'यशासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेणे आणि आळस टाळणे आवश्यक आहे. अशा प्रकारे, जर आपण त्यांनी सांगितलेले हे विशेष नियम आपल्या दैनंदिन जीवनात अमलात आणले, तर यश आणि आनंदाचे मार्ग आपोआप खुले होतील.



चाणक्याच्या मते, यशस्वी व्यक्तीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तो आपली प्राथमिक कामे प्राधान्यक्रमानुसार त्वरित पूर्ण करतो. आचार्य चाणक्याच्या मते, कोणतेही काम उद्यासाठी सोडू नये. चाणक्याच्या मते, वेळ ही सर्वात मौल्यवान संपत्ती आहे; कामे पुढे ढकलल्याने केवळ दबावच वाढत नाही, तर भविष्यात मोठ्या समस्याही निर्माण होतात.

चाणक्याच्या तत्त्वज्ञानानुसार, ज्ञान ही माणसाची खरी शक्ती आहे. यशस्वी लोक कधीही शिकणे थांबवत नाहीत. ते दररोज काहीतरी नवीन शिकण्याचा आणि आपली कौशल्ये सुधारण्याचा प्रयत्न करतात, कारण त्यांना माहित असते की आज मिळवलेले ज्ञान यशाचा पाया बनेल.

यशाच्या मार्गावर कठोर परिश्रम हाच एकमेव पर्याय आहे. यशस्वी लोक अत्यंत कठीण कामालाही ओझे मानत नाहीत, तर त्याकडे एक संधी म्हणून पाहतात. आचार्य चाणक्याच्या मते, आळस आणि दिरंगाईची सवय माणसाला पतन पावण्यास कारणीभूत ठरते. म्हणूनच चाणक्य प्रत्येक आव्हानात्मक काम वेळेवर पूर्ण करण्याचा सल्ला देतात.आचार्य चाणक्य म्हणतात की चुका टाळणे हे अपयशाचे लक्षण आहे. एक शहाणा आणि यशस्वी माणूस आपली चूक कबूल करतो आणि वेळ न घालवता ती सुधारतो. जर चुका वेळेवर सुधारल्या नाहीत, तर त्या पुढे जाऊन मोठ्या समस्या बनतात.

# आयटी व्यावसायिकांची झोप उडाली?

सध्या आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची झोप उडाली असून, मोबाईलवर मेसेज आला तरी काळजाची धडधड वाढत आहे.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात सुरू असलेल्या कर्मचारी कपातीचा हा परिणाम आहे. यामध्ये आता आणखी एका नावाचा समावेश झाला आहे. क्लाउडफ्लेअर या इंटरनेट इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रातील दिग्गज कंपनीने 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' युगाशी जुळवून घेण्यासाठी आपल्या जागतिक मनुष्यबळापैकी १,१०० हून अधिक कर्मचाऱ्यांची कपात करण्याची घोषणा केली आहे. कंपनीचे सीईओ मॅथ्यू प्रिन्स आणि सीओओ मिशेल झॅटलिन यांनी एका अंतर्गत मेमोद्वारे ही माहिती दिली.

**कर्मचारी कपातीचे मुख्य कारण?**

कंपनीच्या मते, ही कपात खर्च वाचवण्यासाठी नसून एआय-आधारित भविष्यासाठी कंपनीची पुनर्रचना करण्यासाठी आहे. गेल्या तीन महिन्यांत क्लाउडफ्लेअरमध्ये एआयचा वापर ६०० टक्क्यांनी वाढला आहे.

विविध विभागांतील कर्मचारी दररोज हजारो एआय एजंट सेशन्सचा वापर करत असल्याचे कंपनीने स्पष्ट केलं.

**२० टक्के कर्मचाऱ्यांचा रोजगार जाणार**

क्लाउडफ्लेअरच्या एकूण ५,१५६ पूर्णवेळ कर्मचाऱ्यांपैकी सुमारे २० टक्के कर्मचाऱ्यांवर या निर्णयाचा परिणाम होईल. ही कर्मचारी कपात जागतिक स्तरावर विविध विभागांमध्ये केली जाणार आहे.

**आर्थिक स्थिती आणि खर्च**

विशेष म्हणजे, कंपनीने पहिल्या तिमाहीत ६३ कोटी ९८ लाख डॉलर्सचा महसूल मिळवला आहे, जो वॉल स्ट्रीटच्या अपेक्षेपेक्षा जास्त होता. या नोकरकपातीसाठी कंपनीला सुमारे १४ ते १५ कोटी डॉलर्स खर्च करावा लागण्याची शक्यता आहे, ज्यामध्ये प्रामुख्याने सेव्हरन्स पॅकेजचा समावेश असेल.

**कर्मचाऱ्यांना काय लाभ मिळणार?**

प्रभावित कर्मचाऱ्यांना २०२६ च्या अखेरीपर्यंतच्या पूर्ण मूळ पगाराच्या बरोबरीचे पॅकेज दिले जाईल. अमेरिकेतील कर्मचाऱ्यांना वर्षाच्या अखेरीपर्यंत आरोग्य सुविधा पुरवल्या जातील, तर इतर देशांतील नियम स्थानिक कायद्यांनुसार असणार आहेत.

आयटी क्षेत्रावर कर्मचारी कपातीची टांगती तलवार

केवळ एप्रिल २०२६ च्या अहवालानुसार, मेटा, ओरॅकल आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या दिग्गज कंपन्यांनी सुमारे ४६,७५० कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. तर २०२६ च्या पहिल्या तीन महिन्यांत जगभरात ९५ हून अधिक कंपन्यांनी ७३,००० हून अधिक कर्मचाऱ्यांना नोकरीवरून कमी केले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर यांचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

कारण, भारताचा मोठा महसूल हा आयटी क्षेत्रातून येत असून कर्मचाऱ्यांमुळे स्थानिक अर्थव्यस्थेस हातभार लागण्यासही मदत होते.

# तिवऱ्याची गंगा....

**राजापूरची अकस्मात प्रकट होणारी प्रसिद्ध गंगा असो किंवा देवगड तालुक्यातल्या दहिबाव इथे प्रकट होणारी गंगा असो. या गंगेचे आगमन कायमच आनंददायी ठरले आहे. तशीच चिपळूणजवळ असलेल्या तिवरे इथे प्रकट होणारी गंगा, जी ठरावीक वेळी येतेच येते.**

गंगेबद्दल प्रत्येक भारतीयाच्या मनात अपार श्रद्धा भरून राहिलेली आहे. 'काशीस जावे नित्य वदावे' असे प्रत्येक जण म्हणत असतोच. प्रत्येकालाच काही काशीला जाऊन गंगेचे दर्शन होऊ शकत नाही, पण ही गंगासुद्धा आपल्या भक्तांना निराश करत नाही. वेगवेगळ्या गावी अकस्मात प्रकट होणा-या पाण्याला गंगा असेच संबोधले जाते. मग ती राजापूरची केव्हाही अकस्मात प्रकट होणारी प्रसिद्ध गंगा असो किंवा ती आल्यावर देवगड तालुक्यातल्या दहिबाव इथेसुद्धा प्रकट होणारी गंगा असो. या गंगेचे आगमन कायमच आनंददायी ठरले आहे. राजापूर आणि दहिबावच्या गंगा बेभरवशी आहेत, पण चिपळूणजवळ असलेल्या तिवरे इथे प्रकट होणारी गंगा मात्र ठरावीक वेळी येतेच येते.

चिपळूणजवळ असलेल्या तिवरे गावात एक नवल आहे. पाटणजवळचे दातेगड-गुणवंतगड, मग पुढे कुंभार्ली घाटातून दिसणारा जंगली जयगड. घाट उतरल्यावर तसेच पुढे जाऊन चिपळूणच्या अलीकडे ६ कि.मी. वर उजवीकडे तिवरे गावचा फाटा आहे. इथून कळकवणे, दसपटी, दादर, आकले मार्गे रस्ता वळत वळत तिवरे गावी येऊन पोहोचतो. हे अंतर २० कि. मी. चे आहे. हाच रस्ता पुढे चोरवणे गावी जाऊन संपतो. चोरवणे नाव वाचूनसुद्धा वासोटा आणि नागेश्वरची तीव्र आठवण होते.

हा सगळा परिसर हिरवागार आहे. तिवरे गाव सह्याद्रीच्या ऐन कुशीत वसलेले आहे. इथून पूर्वी तिवरे घाटाने बैलाच्या पाठीवरून वाहतूक चाले. कोयनेच्या खो?यात असलेल्या माळदेव इथे याच वाटेने जाता यायचे. आता कोयना व्याघ्रप्रकल्प झाल्यामुळे घाटावरची ती गावेही उठली आणि हे घाटरस्ते बंद झाले, पण ऐन सह्याद्रीच्या कुशीत शिरणे म्हणजे काय हे अनुभवायचे असेल तर तिवरे इथे जायला हवे. आपल्या तीनही बाजूंनी उंचच उंच हिरवेगार डोंगर, त्यातून अजूनही काही धबधबे कोसळताना दिसतात. सह्याद्रीमधल्या अनगड घाटवाटा नजरेस पडतात. इतके सुंदर हे तिवरे गाव. गावची वस्ती बेताचीच. जेमतेम २०० उंब?याचे हे गाव.

या तिवरे गावात एक निसर्ग नवल दडले आहे. राजापूरला जशी अनपेक्षित आणि अनियमित काळानी गंगा येते, तशीच या तिवरे गावीसुद्धा गंगा येते. इथे गंगा येते म्हणजे काय तर त्रिपुरी पौर्णिमा झाली की, या ठिकाणी असलेला पाण्याचा प्रवाह दुधी रंगाचा होऊन वाहायला लागतो. पाण्याचा हा दुधी रंग जवळ जवळ देवदिवाळीपर्यंत टिकतो. देवदिवाळीच्या दिवशी गंगेची पूजा होते आणि गंगा विसर्जित केली असे समजले जाते. देवदिवाळीनंतर परत पाणी पूर्वीसारखे पारदर्शक दिसू लागते. हे नवल अनियमित नसून दर तीन वर्षांनी घडत असते. गावक?यांच्या सांगण्यानुसार गेली अनेक वर्षे हे नवल घडत आहे. नियमित तीन वर्षांच्या कालावधीनंतर इथे गंगा येतेच येते.



या ठिकाणी एक छोटेसे गंगेचे मंदिर बांधले असून त्यात एक फूट उंचीची मूर्ती आहे. ग्रामस्थ याच मूर्तीची गंगा म्हणून पूजा करतात. पाण्याच्या प्रवाहाला दोन कुंडांमध्ये खेळवले आहे. एक कुंड आणि त्याच्या खालच्या अंगाला दोन कुंडे अशी इथे बांधीव कुंड दिसतात. दोन्ही कुंडांना गोमुखे केलेली असून त्यातून हे पाणी पुढे जाऊन मुख्य ओढय़ाला जाऊन मिळते. भूशास्त्राचा अभ्यास करणा?या अभ्यासकांनी तसेच संशोधकांनी इथे अवश्य जावे. हे निसर्गनवल का होते याचे शास्त्रीय कारण लोकांसमोर यायला हवे.

एक चांगली गोष्ट इथे जाणवली ती अशी की, गावकरीसुद्धा याला चमत्कार मानत नाहीत. त्यांच्या मतेसुद्धा हे एक नवलच आहे. तीन वर्षांनी घडणारी ही घटना बघायला पंचक्रोशीतून माणसे येतात. इथल्या कुंडात स्नान करतात आणि तीर्थ म्हणून हे पाणी घेऊन जातात, पण या घटनेची माहिती खुद्द चिपळूणमधल्या मंडळींना पण फारशी नाही. स्वच्छ, सुंदर असे हे ठिकाण ऐन निसर्गात वसलेले असल्यामुळे इथून पाय हलत नाहीत. या गावात शिंदे आडनावाची मंडळी मोठ्या संख्येने आहेत. त्यातल्या काहींना तर आदिलशाहीपासून इनाम मिळाल्याचे एका शाळा मास्तरांनी सांगितले. जवळच असलेले दसपटी हे गाव महत्त्वाचे. या गावातला जवळ जवळ घरटी एक माणूस सैन्यात भरती झालेला आहे. शांत निवांत ठिकाण, चौफेर हिरवीगार वनश्री आणि पाठीशी सह्याद्रीचे अजस्त्र कडे.

अशी पार्श्वभूमी लाभलेल्या या आडवाटेच्या तिवरे गावाला अवश्य भेट द्यावी. तीन वर्षांनी प्रकट होणारी गंगा बघण्याचा योग जुळवून आणलाच पाहिजे. त्रिपुरी पौर्णिमा ते देवदिवाळी एवढा काळ ही गंगा इथे असते.

त्या काळात मुद्दाम या आडवाटेला असलेल्या निसर्ग नवलाचे दर्शन घ्यायला हवे. सोबतीला रांगडा सह्याद्री आणि इथला सदाहरित निसर्ग आपली भटकंती अजून समृद्ध करतो. मात्र तो अनुभव घेण्यासाठी मुद्दाम वाट वाकडी केली पाहिजे.